सुट्टीची सूचना

१७ सप्टेंबर २०२३ रोजी गणपती विसर्जनाची 'सोलापूर तरूण भारत' कार्यालयास सुट्टी असल्यामुळे १८ सप्टेंबर २०२३ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही याची सर्व वाचक, एजंट, जाहीरातदार यांनी नोंद घ्यावी.

– व्यवस्थापक

सोलापूर

तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, १७ सप्टेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक १७६ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

भारत २१व्या शतकातील सर्वोत्तम दावेदार असल्याचा संपूर्ण जगाचा विश्वास : पंतप्रधान

गांधीनगर : भारत २१व्या शतकातील सर्वोत्तम दावेदार आहे, असा फक्त भारताचाच नाही, तर संपूर्ण जगाचा विश्वास असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. आज गुजरातमधील गांधीनगर येथील महात्मा मंदिर येथे चौथ्या जागतिक नवीकरणीय ऊर्जा गुंतवणूकदार परिषद आणि एक्स्पो चे उद्घाटन केले. ही तीन-दिवसीय शिखर परिषद भारताच्या २०० त्रथ पेक्षा जास्त स्थापित बिगर-जीवाश्म इंधन क्षमता साध्यतेच्या उल्लेखनीय कामगिरीसाठी महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्यांचा सन्मान करत आहे. मोदी यांनी यावेळी सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील कंपन्या, स्टार्ट-अप आणि प्रमुख उद्योग क्षेत्रातील अत्याधुनिक नवोन्मेषाचे दर्शन घडवणाऱ्या प्रदर्शनास्थळी पायी चालत आढावाही घेतला.

या कार्यक्रमाला संबोधित करताना पंतप्रधानांनी सर्व मान्यवरांचे रि-इन्व्हेस्ट शिखर परिषदेमध्ये स्वागत केले आणि पुढील तीन दिवसात ऊर्जा, तंत्रज्ञान आणि धोरणांच्या भवितव्यावर गंभीर चर्चा होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या परिषदेतील चर्चा आणि अध्यनामुळे संपूर्ण मानवतेला फायदा होईल, असे मोदी यांनी सांगितले.या परिषदेत यशस्वी चर्चेसाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या.

पंतप्रधानांनी तब्बल ६० वर्षांनी एकाच सरकारला विक्रमी तिसऱ्यांना निवडून देण्याच्या जनमताचे महत्त्व अधोरेखित केले. सरकारला सलग तिसऱ्या कार्यकाळासाठी निवडून देण्यामागे भारतीय जनतेच्या आकांक्षा हे कारण आहे, मोदी यांनी नमूद केले. त्यांनी

१४० कोटी नागरिक, युवा आणि महिलाचा विश्वास आणि आत्मविश्वास अधोरेखित केला, ज्यांची अशी धारणा आहे की त्यांच्या आकांक्षा या तिसऱ्या कार्यकाळात एक नवीन झेप घेतील. गरीब, दलित आणि वंचित यांना असा विश्वास वाटत आहे की सरकारचा तिसरा कार्यकाळ त्यांना सन्मानजनक जीवनाची हमी देणारा असेल, असे पंतप्रधानांनी अधोरेखित केले. भारताचे १४० कोटी नागरिक भारताला जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनवण्याच्या संकल्पाने काम करत आहेत, असे ते म्हणाले.

आजचा कार्यक्रम हा एक अलिप्त कार्यक्रम नसून २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्याचा मोठा दृष्टीकोन, ध्येय आणि कृती योजनेचा एक भाग असल्याचे नमूद करून पंतप्रधानांनी सरकारने आपल्या कार्यकाळातील पहिल्या १०० दिवसांत घेतलेल्या निर्णयांवर प्रकाश टाकला.

पहिल्या १०० दिवसांतील सरकारचे काम त्याच्या प्राधान्यक्रमांना अधोरेखित करते आणि त्यांची गती आणि प्रमाण यांना प्रतिबिंबित करते भारताच्या गतिमान विकासाकरता आवश्यक असलेल्या सर्व क्षेत्रांवर भर देण्यात आला आहे, अशी माहिती देत त्यांनी नमूद केले. या १०० दिवसांमध्ये, पंतप्रधान म्हणाले की, देशाच्या भौतिक आणि सामाजिक पायाभूत सुविधांचा विस्तार करण्यासाठी अनेक निर्णय घेतले गेले आहेत. भारत ७ कोटी घरे बांधण्याच्या मार्गावर आहे, जो आकडा काही देशांच्या लोकसंख्येपेक्षा जास्त आहे. तर गेल्या दोन कार्यकाळामध्ये ४ कोटी घरे लोकांना देण्यात आली आहेत, अशी माहिती त्यांनी दिली. त्यांनी पुढे बोलताना, नवीन औद्योगिक शहरे निर्माण करण्याचा निर्णय, ८ हाय-स्पीड रोड कॉरिडॉर प्रकल्पांना मंजुरी, १५ पेक्षा जास्त सेमी-हाय स्पीड वंदे भारत गाड्यांचे लोकार्पण, संशोधनाला चालना देण्यासाठी १ ट्रिलियन रुपयांच्या संशोधन निधीची स्थापना, ई-मोबिलिटी चालविण्यासाठी विविध उपक्रमांची घोषणा, उच्च-कार्यक्षमता जैवनिर्मितीला प्रोत्साहन आणि बायो-ई३ धोरणाला मान्यता, या विषयी माहिती दिली.

गेल्या १०० दिवसातील हरित ऊर्जा क्षेत्रातील विकासावर प्रकाश टाकताना पंतप्रधानांनी, किनारपट्टीवरील पवनऊर्जा प्रकल्पांसाठी रु. ७ हजार कोटींची व्यवहार्यता तफावत निधीपुरवठा योजना सुरू केल्याची माहिती दिली. येत्या काही काळात भारत रु. १२ हजार कोटी खर्चाने ३१ हजार मेगावॉट जलविद्युतनिर्मिती करण्यासाठी काम करत आहे, असे त्यांनी सांगितले.

भारताची विविधता, प्रमाण, क्षमता आणि कार्यप्रदर्शन हे सर्व अद्वितीय असून भारतीय उपायांचे जागतिक उपयोजनेसाठी मार्ग प्रशस्त करणारे आहेत, असे पंतप्रधान म्हणाले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा जिल्हा दौरा

छत्रपती संभाजीनगर, दि.१६ – मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे मंगळवार दि.१७ रोजी जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम याप्रमाणे- मंगळवार दि.१७ रोजी रात्री सव्वा १२ वा. छत्रपती संभाजीनगर विमानतळ येथे आगमन व मोटारीने शासकीय विश्रामगृहाकडे प्रयाण. रात्री साडेबारा वा. शासकीय विश्रामगृह येथे आगमन व मुक्काम. सकाळी साडेआठ वा. शासकीय विश्रामगृह येथून मोटारीने सिद्धार्थ उद्यानकडे प्रयाण, सकाळी पावणे नऊ वा. सिद्धार्थ उद्यान येथे आगमन, सकाळी ९ वा. मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त ध्वजारोहण कार्यक्रम. सकाळी साडेनऊ वा. मोटारीने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाकडे प्रयाण, सकाळी पावणे दहा वा. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाची पाहणी, सकाळी साडेदहा वा. मोटारीने विमानतळाकडे प्रयाण,

एमजीएममध्ये अभियंता दिन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि.१६ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या वतीने अभियंता दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे रुक्मिणी सभागृहात आयोजन करण्यात आले होते. 'ड्रायव्हिंग सस्टेनेबिलिटी विथ इंजिनियरिंग सोल्युशन्स इम्ब्रेसिंग दि लेटेस्ट एआय ड्रिव्हन टेक्नॉलॉजीस' ही थीम घेऊन यंदाचा अभियंता दिवस साजरा केला जात आहे. यावेळी,उद्योजक सुनील किर्दक, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ. एच. एच. शिंदे, संचालिका परमिंदर कौर धिंग्रा, गणेश महाजन, अनिकेत चौधरी, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित उपस्थित होते. यावेळी उद्योजक सुनील किर्दक यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

यावेळी बोलताना उद्योजक सुनील किर्दक म्हणाले, तुम्ही आज विद्यार्थी म्हणून एमजीएममध्ये शिक्षण घेत आहेत. तुमच्यात आणि माझ्यात काही फरक नसून 'अभियंता' म्हणून असलेली आपली ओळख हा आपल्यातील समान धागा आहे. अभियंते जग निर्माण करतात यावर ठाम विश्वास ठेवत, सकारात्मक राहत, मोठी स्वप्ने पाहत, संधीचा योग्य वापर करीत जीवनात पुढे गेले पाहिजे.

पहिल्या पिढीतील उद्योजक म्हणून मी एक मशीन, एक कामगार आणि भाड्याचे शेड घेऊन प्रवासाची सुरुवात केली. आज माझ्या कंपनीमध्ये सुमारे ८०० कर्मचारी, ७ युनिट आणि २०० -२५० कोटी उलाढाल हा प्रवास मी यशस्वीपणे करू शकलो. आज मला मिळालेले यश हे लौकिकअर्थाने जरी असले तरी मला ते यश वाटत नाही. ही भौतिक प्रगती असून ती एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत शिस्त, व्यवस्था, संशोधन वृत्ती, दूरगामी ध्येय, दर्जा आणि ग्राहकांचे समाधान असेल तर आपण म्हणू शकू की, आपण खऱ्या अर्थाने प्रगती करित आहोत. कोणताही व्यवसाय करीत असताना नैतिकता, अध्यात्म आणि सदाचार बाळगत कार्यरत असणे आवश्यक असल्याचे उद्योजक सुनील किर्दक यांनी यावेळी सांगितले.

कुलपती अंकुशराव कदम यावेळी बोलताना म्हणाले, आमच्या काळामध्ये पुणे, छत्रपती संभाजीनगर, कराड, अमरावती, नागपूर अशा काही मोजक्या ठिकाणी अभियांत्रिकी महाविद्यालये होती. तेंव्हा १२ वी नंतर थेट अभियांत्रिकीसाठी प्रवेश मिळत असे. १९८३ साली तत्कालीन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी खाजगी अभियांत्रिकी शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली आणि सर्वसामान्यांचे शिक्षणाचे दार खुले झाले. या अभियांत्रिकीचे जाळे निर्माण करण्याच्या उद्देशाने एमजीएमने जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू केले. आज एमजीएममध्ये शिकलेले हजारो विद्यार्थी जगभर उत्तम आणि प्रतिभासंपन्न काम करीत आहेत. अडचणी सोडविण्याचे काम अभियंते करीत असतात. विद्यार्थी घडण्यासाठी संस्था कार्यरत असतात, हा विचार घेऊन विद्यार्थी घडविण्याचे काम एमजीएम करीत आहे.

'जर्नी ऑफ इंजिनियरिंग एक्सलन्स' या विषयावरील परिसंवादात मान्यवरांनी अभियंता म्हणून आपल्या आयुष्यात आलेले अनुभव यावेळी विद्यार्थ्यांसमोर मांडले. त्याचप्रमाणे या परिसंवादात समकालीन काळामध्ये आर्टिफिशियल इंटेलिजियन्स, नोकरी, कौशल्य, उद्योग अशा विविध विषयांवर मान्यवरांनी आपले विचार मांडले.

अभियंता दिनानिमित्त स्कूल ऑफ इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या संगणक विभागाच्या वतीने वेब डेव्हलपमेंट आणि यांत्रिकी विभागाच्या वतीने टेक्निकल क्वीज अशा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये सुमारे १५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेसाठी विभागप्रमुख प्रा. सारिका राठी आणि विभागप्रमुख प्रा.विकास लोकावर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

१५ सप्टेंबर रोजी देशभरात अभियंता दिन साजरा केला जातो. या दिवशी महान भारतीय अभियंता आणि भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांचा जन्म झाला होता. मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या हे भारतातील महान अभियंत्यांपैकी एक होते. भारताला अधिक आधुनिक बनवण्यात त्यांनी योगदान दिले होते. आज त्यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. आजच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संचालिका डॉ.परमिंदर कौर धिंग्रा यांनी केले, सूत्रसंचालन प्रा.सिमरन कौर यांनी तर आभार प्रा.माधुरी कावरखे यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. पीयूष काळे, प्रा. जावेद सिद्धीकी, सर्व प्राध्यापक व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

अनाधिकृत टपरी चालकाच्या 'आडमुठेपनापुढे एमआयडीसीचे अधिकारी हतबल'

तीन अधिकाऱ्यांसह एक जेसीबी, एक ट्रॅक्टर व पथकाला घ्यावी लागली माघार

तभा. वृत्तसेवा

वाळूज महानगर/दि. १६ (प्रतिनिधी) : गणपती मिरवणुकीच्या आदल्या दिवशी एमआयडीसीच्या वतीने विसर्जन मार्ग मोकळा करण्यासाठी मोहिम राबविण्यात आली. यावेळी हायटेक कॉलेज समोरील अतिक्रमण धारकांना आवाहन करण्यात आले होते या आवाहनाला प्रतिसाद देत बऱ्याच व्यावसायिकांनी आपापली दुकाने व टपऱ्या उचलून घेतल्या परंतु एका अवैध पान टपरीधारकाने स्वतःला टपरी मध्ये कोंडून घेतले अतिक्रमण हटाव पथकाने वारंवार विनंती करूनही टपरी चालक बाहेर येण्यास तयार नव्हता. त्यामुळे पथकाला नाईलाजाने हात हलवत मोहटादेवी चौकाकडे मोर्चा वळवला.

सामाजिक संघटना व गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांनी

एमआयडीसीकडे मिरवणूक मार्ग मोकळा करण्यासाठी विनंती केली होती. त्यामुळे सकाळपासूनच एमआयडीसीच्या वतीने रिक्षाद्वारे परिसरात स्पीकर वरून अतिक्रमण स्वतः काढून घेण्यासाठी आवाहन करण्यात येते होते. दुपारी दोन वाजेच्या सुमारास एक जेसीबी , ट्रॅक्टर , मजूर , व कर्मचारी असा ताफा हायटेक चौकात आला. यावेळी रस्त्यावर टपऱ्या आणि हातगाड्यावर व्यवसाय करणाऱ्यांनी स्वतः व्यवसाय बंद करत टपऱ्या हटवल्या. मात्र रामप्रसाद रंगनाथ परदेसी या टपरी चालकाने पथक येताच स्वतः ला पान टपरीमध्ये कोंडून घेतले. अतिक्रमण हटाव पथक त्या टपरी चालकाला वारंवार विनंती करत होते परंतु टपरी चालक कोणताही प्रतिसाद न देता टपरीमध्ये बसून होता. इतक्यात कारमधून तिन अधिकारी घटनास्थळी आले. त्यांना पथकातील दोघांनी ' एका पान टपरी चालकाने स्वतः ला पान टपरीत कोंडून घेतले आहे. विनंती करूनही बाहेर येत नसल्याचे सांगितले तेव्हा अधिकाऱ्यांनी सदर कर्मचाऱ्यांद्वारे सर्व टपरी चालकांना आवाहन केले की , ही पानटपरी जर आज हटली नाही तर मिरवणुकीनंतर या मार्गावर एका ही व्यवसायिकाला बसू देणार नाही असा दम देताच सर्व व्यावसायिकांनी मिळून त्या टपरी चालकाची विनंती करत त्या टपरी चालकाची मनधरणी करत बाहेर काढले. या पथकाकामध्ये उपअभियंता गणेश मुळीकर , चन्ने, प्रशांत सरोदे तांत्रिक साहाय्य , गौतम मोरे , भरत साळे , राजकुमार साळवे , तुकाराम जाधव , अविनाश मोरे यांच्यासह खासगी पाच कर्मचारी होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

एमजीएममध्ये सिने कलाकार सचिन व सुप्रिया पिळगावकर यांचे संवाद सत्र संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि.१६ : दिग्दर्शन, लेखन, अभिनय आणि इतर कोणत्याही क्षेत्रात आपल्याला जे काही करायचे असेल ते आपण करू शकतो. मात्र, सर्वप्रथम आपल्याला जीवनात काय करायचे आहे? हे निश्चित होणे आवश्यक असून विद्यार्थ्यांनी एका गोष्टीवर आपले लक्ष केंद्रित केले की यश मिळते, असे प्रतिपादन अभिनेते सचिन पिळगावकर यांनी यावेळी केले.

महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित संवाद सत्रात ज्येष्ठ दिग्दर्शक व सिने कलाकार सचिन पिळगावकर आणि सुप्रिया पिळगावकर यांनी शनिवार, दिनांक १४ सप्टेंबर २०२४ विद्यापीठाच्या रुक्मिणी सभागृहात विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना अभिनेते पिळगावकर म्हणाले, आपण ठरविलेल्या क्षेत्रात यशस्वी झाले की मग इतर गोष्टीवर काम करणे आवश्यक आहे. आयुष्यभर एकच गोष्ट करीत रहा असे मला म्हणायचे नसून विद्यार्थ्यांनी एका - एका गोष्टींवर परिपूर्ण आणि यशस्वीपणे काम झाल्यानंतर इतर गोष्टींवर लक्ष देणे आवश्यक आहे. गेली ६१ वर्ष मी हे सूत्र पाळत आलो आहे. विशेषत: चित्रपट सृष्टीत येऊ पाहणाऱ्या विद्यार्थ्यांनी भाषेवर प्रभुत्व मिळवणे गरजेचे आहे. यावेळी सचिन व सुप्रिया पिळगावकर यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. संवाद कार्यक्रमाचा समारोप सचिन यांनी गायलेल्या 'बडे अच्छे लगते हो...'या गीताने झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन विभागप्रमुख डॉ.राजू सोनवणे यांनी केले.

राजू कापसे खून प्रकरणातील मुख्य आरापी गजाआड

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी- धुळे - सोलापूर महामार्गालगत पांढरी पिंपळगावजवळ वादातून आपल्याच मित्राचे डोके धडावेगळे करून त्याचा खून केल्याप्रकरणात पाच दिवसांपासून पसार असलेल्या मुख्य आरोपीला बेड्या ठोकण्यात अखेर करमाड पोलिसांना सोमवारी, १६ रोजी यश आले. दत्ता अमृतकर सुरवसे (रा. विजयनगर, गारखेडा परिसर) असे आरोपीचे नाव असून, त्याला पाचोड परिसरातील बीड हायवे लगत ताब्यात घेत अटक केल्याची माहिती करमाड पोलिसांनी दिली आहे.

दरम्यान गुन्ह्यात यापूर्वी अटक करण्यात आलेला आरोपी संतोष उद्धवराव जगताप (३९, रा. शिवनेरी कॉलनी, गारखेडा परिसर) याच्या पोलीस कोठडीत २० सप्टेंबरपर्यंत वाढ करण्याचे आदेश जिल्हा व सत्र न्यायाधीश एस.के. कऱ्हाळे यांनी सोमवारी दि.१६ दिले. कोठडी दरम्यान आरोपी जगताप याने, आरोपी दत्ता सुरवसे आणि मृत राजेश कापसे यांच्यात पैशांच्या व्यवहारावरून वाद झाला होता, आणि याच कारणावरुन त्याने दत्ताने कापसेचा खून केल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. आरोपी जगताप आणि दत्ता सुरवसे हे दोघे मुळचे बीड येथील असून ते दोघे चांगले मीत्र आहेत. आरोपी दत्ता आपल्या मुळ गावी गेल्या असावा असा पोलिसांना संशय होता, त्यानूसार पोलिसंनी दत्ताचा त्याचा मुळ गावी शोध घेतला असता, तो तेथे आला होता, मात्र पोलिसांची चाहुल लागताच तेथून पसार झाल्याचे सुत्रांनी सांगितले. त्यानंतर पोलिसांनी तांत्रिक दृष्ट्यातपास करुन दत्ताच्या मुसक्या आवळल्या.

आरोपीकडून गुन्ह्यात परिधान केलेले कपडे, वापरलेला मोबाइल आणि दुचाकी हस्तगत करायची आहे. अटक आरोपीकडे पैशाच्या व्यवहारा बाबत तपास करायचा आहे. आरोपींनी गुन्ह्याचा कट कोठे आणि कसा रचल याचा तपास बाकी आहे. आरोपींना गुन्ह्यात आणखी कोणी मतद केली आहे का ? याचा देखील तपास करायचा असल्याने आरोपीच्या पोलीस कोठडीत वाढ करण्याची विनंती सहाय्यक लोकाभियोक्ता अजित अंकुश यांनी न्यायालयाकडे केली होती.

सिद्धिविनायक गणेश मंदिर बजाजनगर येथे सामूहिक अथर्वशीर्ष पठणाला उस्फूर्त प्रतिसाद

छत्रपती संभाजीनगर - दि.१५ : वि.हिं.प.मंदिर अर्चक पुरोहित आयामतर्फे सामूहिक अथर्वशीर्ष पठनाचा कार्यक्रम सोमवार दिनांक १६ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ७ वाजता सिद्धिविनायक गणेश मंदिर त्रिमूर्ती चौक बजाज नगर वाळूज येथे संपन्न झाला यावेळी महिला आणि पुरुष मिळून २०० भाविक उपस्थित होते. अथर्वशीर्ष पठनाच्या पूर्वी व्यासपीठावरील मान्यवर मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे देवगिरी प्रांत संपर्कप्रमुख श्री राजीव जहागिरदार, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे वाळुज जिल्हा मा. अनिल पाटील दामोदर जी घुगे संजयजी तायडे गोरखनाथजी शेळके कैलास चव्हाण यांच्या हस्ते दीप प्रज्वलन संपन्न झाले दीप प्रज्वलनानंतर अथर्वशीर्ष पठणाची ११ आवर्तने श्री मधुकरराव कुलकर्णी व श्री भरगोदेव नरसिंग गुरुजी यांच्या पुढाकारात घेण्यात आली. अथर्वशीर्ष पठनाच्या वेळी सर्वांना गणपती बाप्पा मोरया अशा टोप्या देण्यात आल्या होत्या त्यामुळे वातावरण प्रफुल्लित झाले होते अथर्वशीर्ष पठनानंतर श्रीगणेशाची आरती करण्यात आली सर्वात शेवटी प्रसाद वाटप होऊन कार्यक्रमाची सांगता झाली. सूत्रसंचालन नूतन पाटील यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दामोदरजी घुगे संजयजी तायडे कविता जगदाळे प्रियंका घोरपडे नूतन पाटील यांनी मेहनत घेतली.

मुस्कान अग्रवालचा मेझॉनवर प्रभाव

पुणे - अभियंते नावीन्यपूर्ण चालना देण्यात, तंत्रज्ञानाच्या प्रगतीद्वारे कंपन्या आणि संपूर्ण उद्योगांचे भविष्य घडवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. मेझॉनवर, हजारो अभियंते जटिलता स्पष्ट करण्यासाठी आणि जटिल व्यावसायिक आव्हानांवर स्मार्ट उपाय शोधण्यासाठी समर्पित आहेत. ते नवीनतम तंत्रज्ञानासह कार्य करतात आणि नेहमी प्रक्रिया सुधारण्याचे आणि ग्राहक अनुभव वाढवणारे उपाय तयार करण्याचे मार्ग विकसित करत असतात. मेझॉनमधील सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट इंजिनीअर मुस्कान अग्रवाल, नाविन्यपूर्ण आणि उत्कृष्टतेच्या या वचनबद्धतेचे उदाहरण देतात.

बीएमडब्ल्यू ग्रुपकडून इंडियामध्ये रिटेल डॉट नेक्स्ट चे पदार्पण

बीएमडब्ल्यू ग्रुप इंडियाने भारतात रिटेल डॉट नेक्स्ट डिलरशिप्सच्या लाँचची घोषणा केली आहे. रिटेल डॉट नेक्स्ट मध्ये सर्वोत्तमता देण्यासाठी आणि आधुनिक गरजांची पूर्तता करण्यासाठी क्यूरेट करण्यात आलेल्या रिइमेजिन सेवा व सुविधांचा समावेश असेल. ३६ महिन्यांमध्ये ३३ शहरांमधील ५६ फॅसिलिटीजमध्ये रिटेल डॉट नेक्स्ट ची अंमलबजावणी करण्यात येईल. विक्रम पावाह, प्रेसिडण्ट व चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर, बीएमडब्ल्यू ग्रुप इंडियाचे म्हणाले, '' बीएमडब्ल्यू ग्रुप इंडियामध्ये लक्झरी अनुभवाला नव्या उंचीवर घेऊन जात बदल घडवून आणत आहोत. रिटेल डॉट नेक्स्ट च्या लाँचसह आम्ही अनुभवांना अधिक उत्साहित करण्यासोबत त्यामध्ये परिवर्तन घडवून आणत आहोत. बीएमडब्ल्यू डिलरशिपला प्रत्येक भेटीमधून अद्वितीय विश्वामध्ये प्रवेश केल्यासारखे वाटेल, जेथे आधुनिकता, प्रगती आणि अस्सल लक्झरी कव्हरेजचा अनुभव मिळेल.

रमेश चौधरी यांचे निधन

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.१६ सप्टेंबर

सोयगाव तालुक्यातील जरंडी येथील रमेश नथ्थु चौधरी(वय.७७) यांचे शनिवारी दि.१४ सकाळी आठ वाजता निधन झाले.त्यांचेवर दुपारी तीन वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी,एक मुलगा,दोन मुली असा परिवार आहे.ते शेतकरी दिनेश चौधरी यांचे ते वडील होते.

सिल्लोड शहरात ईद ए मिलादूननबी उत्साहात; टॅक्सी युनियनच्या वतीने अन्नदान

पालकमंत्री ना अब्दुल सत्तार यांनी दिल्या ईद ए मिलादूननबीच्या शुभेच्छा

सिल्लोड प्रतिनिधी- इस्लाम धर्माचे प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर यांची जयंती अर्थात 'ईद-ए-मिलाद'चा सण सोमवार दि १६ रोजी शहरात पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. यानिमित्त शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. यात शहरातील समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

सिल्लोड शहरातील काळी पिवळी टॅक्सी पॉईंटच्या ठिकाणी सालाबादप्रमाणे याही वर्षी काळी पिवळी टॅक्सी युनियनच्या वतीने ईद ए मिलादूननबी सण अन्नदान करून उत्साहात व आनंदात साजरा करण्यात आला. यावेळी

पालकमंत्री ना अब्दुल सत्तार यांनी कार्यक्रम स्थळी भेट देऊन समाजबाधवांना ईद ए मिलादूननबी च्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी माजी नगराध्यक्ष अब्दुल समीर,युनियनचे अध्यक्ष शेख कलिम,नगरसेवक मातीनं देशमुख,कालू दादा,शेख अझर,शेख कदीर,शेख शकील,शेख मतीन,सैय्यद कदीर, शेख बुढन, शेख सरदार,शेख सुभान,शेख सरदार एजंट शेख बदीर, सय्यद शमीम,सिराज भाई, जुम्मा भाई, शेख रफिक, शेख नईम, शेख मन्नाण, याकूब भाई, वृत्तपत्र विक्रेता शेख अफसर,देसाई,शेख कलीम ड्रायवर, शेख सलमान, सैय्यद कदिर, रब्बानी सेठ,आदींची उपस्थिती होती.

याप्रसंगी लहान मुलानी नाताचे गायन केले तर इस्लाम धर्माचे संस्थापक हजरत महंमद पैगंबर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ वचने म्हणण्यात आली.देशावरील संकटे टळून देशातील एकतेसाठी खास दुवापठण झाले.

मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे,पालकमंत्री अब्दुल सत्तार यांचे हात बळकट करण्यासाठी जोमाने कामाला लागा : अब्दुल समीर

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.१६ सप्टेंबर

मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे,पालकमंत्री अब्दुल सत्तार यांचे हात बळकट करण्यासाठी जोमाने कामाला लागा असे आवाहन युवानेते अब्दुल समीर यांनी केले आहे. शिवसेनेच्या गाव संवाद दौरा अभियान अंतर्गत अब्दुल समीर यांनी तालुक्यातील विविध गावात भेटी देवून येथील शिवसेना पदाधिकारी कार्यकर्त्यांशी संवाद साधला यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी शिवसेना तालुकाप्रमुख प्रभाकर काळे, उपसभापती कृउपा दारासिंग चव्हाण,नॅशनल सूतगिरणीचे संचालक मारुती पा.वराडे,विठ्ठल सपकाळ,शहरप्रमुख तथा नगरसेवक संतोष बोडखे,राजू गौर,अकिल देशमुख, सावळदबारा सरपंच शिवाप्पा चोपडे,नगरसेवक अक्षय काळे,राजु दुतोंडे,सांडू तडवी, मोहंमद आरिफ,रुपेश जैस्वाल,राहुल महाजन,सुनील दुधे,हर्षल देशमुख,सरपंच सुरेश चव्हाण,वंदना सावंत,कैलास मुळे,गंगाधर सदाशिवे, संतोष आळेकर,भास्कर सोनोने,नितीन शेळके,पंडित राठोड,मेघराज चव्हान,गुलाब राठोड,करतार चव्हाण, किसन सूर्यवंशी,मोहन सुरडकर,गणेश खैरे,भागवत जाधव, दिलीप जाधव,सीताराम चंडोल,हिरा जाधव,ताराचंद पवार, इम्तियाजबी तडवी,राहुल हेल्लोडे,ईश्वर शेळके,विठ्ठल दांडगे, सुपडा रगड,ज्ञानेश्वर

वारंगणे,इरफान पठाण,स्वानंद पाटील, गुलाब राणा,अमोल शेळके आदी उपस्थित होते.

या संवाद दौऱ्यात अब्दुल समीर यांनी राज्याचे पणन व अल्पसंख्याक विकास मंत्री तथा पालकमंत्री ना.अब्दुल सत्तार यांनी मतदारसंघात केलेल्या विविध विकास कामांची माहिती दिली.मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण,मुख्यमंत्री वयोश्री,तिर्थदर्शन योजना १ रुपयात पीकविमा,शेतकऱ्यांना वीजबिल माफी सह मोफत वीज या सारख्या अनेक क्रांतिकारी निर्णय मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने घेतले ही माहिती लोकांपर्यंत गेली पाहिजे असे अब्दुल समीर म्हणाले.

मुख्यमंत्री ना.एकनाथराव शिंदे यांच्या माध्यमातून व पालकमंत्री ना.अब्दुल सत्तार यांच्या पुढाकाराने सिल्लोड - सोयगाव मतदारसंघात विकासाचे अनेक प्रकल्प उभे राहत आहेत.

मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी घेतलेले जनहितार्थ निर्णय,पालकमंत्री ना.अब्दुल सत्तार यांनी मतदारसंघात केलेल्या विविध विकास कामांची माहिती घरोघरी देवून, आगामी निवडणुकीत शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी शिवसैनिकांनी सज्ज व्हा असे आवाहन अब्दुल समीर यांनी केले.दरम्यान अब्दुल समीर यांनी तालुक्यातील पिंपळवाडी, महालब्धा,देव्हारी,टिटवी,पळासखेडा,सावळद बारा,डाभा, नांदातांडा,घाणेगाव,मोलखेडा,हिवरी या गावांना भेटी दिल्या.

प्रख्यात उद्योगपती श्री रतन टाटा यांना अनुव्रत पुरस्काराने सन्मानित

अनुव्रत विश्व भारती (अनुविभा) तर्फे सन २०२३ चा प्रतिष्ठित अनुव्रत पुरस्कार प्रसिद्ध उद्योगपती आणि परोपकारी श्री रतन टाटा यांना त्यांच्या मुंबईतील निवासस्थानी प्रदान करण्यात आला. श्री अविनाश नहार, अध्यक्ष अनुव्रत विश्व भारती सोसायटी यांच्या नेतृत्वाखाली, शिष्टमंडळाने पुरस्काराचा एक भाग म्हणून स्मृतिचिन्ह आणि सन्मानपत्रासह श्री रतन टाटा यांना रु. १.५१ लाखाची रक्कम दिली. यावेळी अनुविभा सचिव श्री भिखम सुराणा, आयुक्त, मुंबई कस्टम श्री अशोक कुमार कोठारी, उपाध्यक्ष अनुविभा श्री विनोद कुमार आणि सहयोगी सचिव अनुविभा श्री मनोज सिंघवी उपस्थित होते.

श्री रतन टाटा यांना अनुव्रत पुरस्कार प्रदान करताना, श्री नहार यांनी मानवजातीसाठी त्यांच्या सकारात्मक योगदानाचे कौतुक केले आणि मानवता आणि मानवतावादी सेवेचे जगात एक उत्कृष्ट उदाहरण ठेवल्याबद्दल

संपूर्ण अनुव्रभा कुटुंबाच्या वतीने त्यांचे अभिनंदन केले. त्यांनी त्यांच्या निदर्शनास आणून दिले की, अनुव्रत अनुशस्त आचार्य श्री महाश्रमण यांनी त्यांना शुभेच्छा पाठवल्या आहेत आणि त्यांना उत्तम आरोग्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. श्री रतन टाटा यांनी अनुव्रत अनुष्ठानाबद्दल मनापासून आदर आणि कौतुक व्यक्त केले. अनुव्रत चळवळ गेल्या ७५ वर्षांपासून मानवी ऐक्य नैतिकता, अहिंसा आणि सद्भावना या क्षेत्रात प्रशंसनीय कार्य करत आहे, हे विशेष. दिवंगत आचार्य तुलसी यांनी सुरू केलेल्या या चळवळीने संयुक्त राष्ट्रात आपली विशेष ओळख निर्माण केली आहे, अनुव्रत पुरस्कारांच्या मालिकेत आतापर्यंत श्री आत्माराम, श्री जैनेंद्र कुमार, श्री शिवाजी भावे, श्री शिवराज पाटील, श्री शिवराज पाटील यांच्यासह देशातील अनेक मान्यवर सहभागी झाले आहेत. श्री नितीश कुमार, डॉ. एपीजे अब्दुल कलाम, डॉ. मनमोहन सिंग, श्री. टी. एन. शेषन, श्री प्रकाश आमटे, इत्यादींना या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

यावेळी शिष्टमंडळाने अनुव्रत साहित्यावरील काही पुस्तके, मासिक अनुव्रत आणि लहान मुलांचे नियतकालिक बच्चन कास देश ही श्री रतन टाटा यांना भेट दिली आणि अनुविभा यांच्या नेतृत्वाखाली चालवले जाणारे अनुव्रत उपक्रम, निवडणुकीतील साधनांच्या शुद्धतेची मोहीम, अनुव्रत डिजिटल डिटॉक्स, अनुव्रत डिजीटल डिटॉक्स याविषयी त्यांना माहिती दिली. पर्यावरण जनजागृती मोहीम, व्यसनमुक्ती मोहीम, जीवन विज्ञान इ. श्री. रतन टाटा यांनी अनुव्रत चळवळीद्वारे मानवतेच्या उन्नतीसाठी केलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले.

नायजेरिया देशातही गणपती बाप्पा विराजमान

राजधानी लागोसमध्ये महाराष्ट्र मंडळाचा सार्वजनिक गणेशोत्सव दणक्यात साजरा

छत्रपती संभाजीनगर, ता. १६ : नायजेरियात राहणाऱ्या मराठी समुदायासह तेथील भारतीय यंदाचा गणेशोत्सव थाटात साजरा करीत आहेत. स्थानिक नायजेरियन मूर्तिकाराने साकारलेली बाप्पांची मूर्ती अयोध्येच्या राम मंदिराच्या प्रतिकृतीमध्ये विराजमान असून विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांना उधाण आले आहे.

छत्रपती संभाजीनगरचे मूळ रहिवासी आणि गेली पाच वर्षांपासून नायजेरियात राहत असलेले राजेश्वर कुलकर्णी यांनी 'सकाळ'ला माहिती दिली, की राजधानी लागोसमध्ये एक हजारपेक्षा अधिक मराठी लोक राहतात. त्यातील अनेक जण कुटुंबासह येथे राहतात. यातील बहुतेकांकडे घरी गणेशोत्सव असतोच. शिवाय ते सगळे महाराष्ट्र मंडळ नायजेरियाच्या वतीने साजरा

होणाऱ्या गणेशोत्सवातही उत्साहाने सहभागी होतात. महाराष्ट्र मंडळाच्या या गणेशोत्सवाचे हे यंदाचे ३६ वे वर्ष आहे.

आरती, श्लोक, भजने यांनी लागोसचा गणेशोत्सव मंडळाचा परिसर दुमदुमून गेला आहे.

नायजेरियात पारंपरिक पद्धतीने गणेशमूर्ती बनवल्या जातात. काही स्थानिक नायजेरियन मूर्तिकारांनी यंदा गणरायाची मूर्ती साकारली असून तीच मंडळाकडून स्थापित करण्यात आली आहे. महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष गिरीश जयकर यांनी सांगितले, की आमच्या स्वयंसेवकांचा उत्साह, निष्ठा आणि समुदायाच्या सहकार्याने अतिशय प्रभावी काम केले आहे. आपण परदेशी

जरी राहत असलो तरी तेथील स्थानिक लोकांच्या मदतीने व सहकायनि आपण आपल्या संस्कृतीचे दर्शन येथील लोकांनासुद्धा घडवू शकतो.

श्रीराम मंदिराची प्रतिकृती

यंदाच्या गणेशोत्सवात महाराष्ट्र मंडळाने राम मंदिराची थीम ठेवली आहे. त्यासाठी संतोष राऊत, गिरीश जयकर, जितेंद्र मातकर यांच्या नेतृत्वात नितीन नगीने, संकेत कदम, मकरंद दहिदुले आणि स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

भरगच्च कार्यक्रम

महाराष्ट्र मंडळाने सर्व वयोगटातील कलावंतांचा सहभाग राहावा यासाठी विविध कार्यक्रम आयोजित केले आहेत. यात मराठीच नव्हे तर इतर समुदायाचे लोकही सहभागी होत आहेत.

मुंबई कृ.उ.बा.समितीच्या संचालकपदी तालुक्यातील मीना राठोड यांची वर्णी

तभा वृत्तसेवा

कन्नड :- तालुक्यातील श्रीमती मीना महारु राठोड यांची कृषी उत्पन्न बाजार समिती मुंबई वाशी च्या संचालकपदी निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्याचे पणनमंत्री अब्दुल सत्तार यांनी नामनिर्देशित केल्या दोन सदस्यांपैकी महिला जागेसाठी तालुक्यातून श्रीमती मीना महारु राठोड यांची वर्णी लागली आहे,त्या कृषी उत्पन्न बाजार समिती विद्यमान सभापती, शिवसेना उपजिल्हाप्रमुख डॉ.मनोज राठोड यांच्या मातोश्री आहेत, तालुक्यातुन कृषी उत्पन्न बाजार समिती वाशी येथे निवड झालेल्या त्या पहिल्या महिला आहेत त्यांच्या निवडीबद्दल त्यांना कृषी उत्पन्न बाजार समिती, संत सेवालाल महाराज उत्सव समिती पदाधिकारी डॉ. मनोज मारुती काका राठोड मित्र मंडळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक,राजकीय नेते, नागरिकांकडून शुभेच्छा देण्यात येत आहे

शॉट सर्किटच्या आगीत रोख रक्कम सोन्याचे दागिनेसह संसार उपयोगी साहित्य खाक

लक्ष्मीनगर येथील घटना

तभा वृत्तसेवा

पैठण दि १६ :- पैठण शहरातील लक्ष्मीनगर येथे राहणाऱ्या सोनाली भारत शिंदे यांच्या घरात बाहेरील विद्युत तारेच्या घर्षणाने शॉट सर्किट होऊन कपाटात ठेवलेली रोख रक्कम,सोन्याचे दागिने आणि घरातील फ्रीज, टीव्ही,कुलर, दिवान आणि संसार उपयोगी साहित्य जाळून खाक झाले आहे. या आगीत जवळपास तीन लाखांचे नुकसान झाल्याची नोंद करण्यात आली आहे.

सोमवार दिनांक १६ सप्टेंबर रोजी दुपारी शिंदे यांच्या घरात बाहेरील विद्युत तारेच्या घर्षणाने शॉर्ट सर्किट झाल्याने आग लागली.बघता बघता आगीत संसार उपयोगी वस्तू कपाटातील कपडे, रोख रक्कम ३५ हजार,सोन्याचे दागिने जाळून खाक झाले. जाळीत घटने प्रकरणी तलाठी यांनी पंचनामा केला असून याची नोंद करण्यात आली आहे. यावेळी माजी नगरसेवक बजरंग लिंबोरे,संतोष लिंबोरे, कुणाल औटे,कृष्णा हरणार, राहुल पवार आदी उपस्थित होते.

सामाजिक संघटनेच्या नावाखाली तक्रार देऊन २५ लाखांची खंडणी मागणाऱ्या चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

वाळूज महानगर, प्रतिनिधी : गरुड झेप अकॅडमीतील विद्यार्थिनीच्या आत्महत्येच्या प्रकरणात प्रशासकीय कार्यालयांमध्ये तक्रारी देऊन २५ लाखांची खंडणी मागणाऱ्या सामाजिक संघटनेच्या कार्यकर्त्यांविरुद्ध वाळूज एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याचा आरोपींनी शहरातील क्लासेस मध्ये घुसून तोडफोड केली होती.आरोपी फिर्यादींकडून खंडणी घेतानाचा व्हिडिओ फिर्यादीने रेकॉर्ड केला आहे.

याप्रकरणी वाळूज निलेश सोनवणे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार त्यांच्या संस्थेत एका विद्यार्थिनीने आत्महत्या केली होती.या वरील गुन्ह्याचा आधार घेऊन रमेश गायकवाड, रेखा वाहटुळे सचिन मिसाळ, अशोक मोरे यांनी त्यांच्या संघटना व पक्षाच्या नावाने पोलीस आयुक्तालय, जिल्हाधिकारी कार्यालय, शिक्षण अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, धर्मादाय आयुक्त, पोलीस स्टेशन इत्यादी ठिकाणी गरुड झेप अकॅडमीच्या विरोधात खोट्या तक्रारी केल्या. याबाबत फिर्यादी यांनी आरोपींना सांगितले की सदर प्रकरण कोर्टात सुरू आहे तुम्ही तक्रारी देऊ नका यावर आरोपींनी म्हणाले की आमच्या संघटनेला तुम्ही निधी दिला तर आम्ही तुमच्या विरुद्ध तक्रारी करणार नाही. पैसे दिले नाहीत तर आम्ही तुमच्या संस्थेची बदनामी थांबवणार नाही. रमेश गायकवाड याने फिर्यादी निलेश सोनवणे यांना फोन करून सांगितले की, गरुड च्या अकॅडमीची बदनामी थांबवायची असेल तर तुम्हाला २५ लाख रुपये द्यावे लागेल. यावर फिर्यादींनी एवढे पैसे नाही सात लाख रुपये देतो असे सांगितले. यावर सर्व आरोपींनी आकाशवाणी येथील हॉटेलमध्ये भेटायला बोलावले. यावर तडजोडी अगोदर दोन लाख रुपये देण्याचे ठरलं. दोन लाख रुपये देतानाचा व्हिडिओ फिर्यादींनी रेकॉर्ड केला. पैसे दिल्यानंतर तक्रार मागे घेतल्याची ओसी फिर्यादींनी आरोपीकडून घेतली. यावरून वाळूज एमआयडीसी पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खंडणी खोरांविरुद्ध आवाज उठवावा....

छत्रपती संभाजीनगर शहर हे आशा खंडातील सर्वात वेगाने विकसित होणाऱ्या औद्योगिक शहर म्हणून ओळखले जाते. शहरातील छोटे मोठे उद्योग, शैक्षणिक संस्था,हॉस्पिटल सामाजिक संघटनांच्या नावाखाली खंडणी मागणाऱ्यांना त्रस्त आहेत. खंडणी खोरांमुळे अनेक संस्था उद्योग हॉस्पिटल शहरातून पळ काढत आहे. हा प्रकार थांबला पाहिजे शहराचे नुकसान होऊ नये यासाठी आज सामाजिक संघटनांच्या नावाने तक्रारी करून खंडणी वसूल करणाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. खंडणीखोरांना त्रस्त उद्योजक, हॉस्पिटल, शैक्षणिक संस्था चालक यांनी पुढे येऊन खंडणीखोराविरुद्ध तातडीने संबंधित पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करावी असे आवाहन निलेश सोनवणे यांनी केले आहे.

'पुन्हा एकदा चौरंग' चित्रपटाचा टिझर आणि पोस्टर प्रदर्शित

छत्रपती संभाजीनगर - मराठी सिनेसृष्टीला ज्वलंत विषयावर वास्तवदर्शी चित्रपट बनवण्याची फार मोठी परंपरा आहे. आजवर अनेक सिनेमांनी समाजातील दाहक विषय मोठया पडद्यावर मांडत समाजाला आरसा दाखवला आहे. याच वाटेवरील असलेला 'पुन्हा एकदा चौरंग' हा आगामी मराठी चित्रपट एका ज्वलंत विषयाला वाचा फोडणार आहे. 'पुन्हा एकदा चौरंग' या सिनेमाचा टिझर आणि पोस्टर नुकतेच प्रदर्शित करण्यात आले आहे. 'आता मेणबत्ती नाही, होईल तो चौरंग' असे म्हणत या चित्रपटाने जणू अन्यायाविरोधात एक लढाच पुकारला आहे. आरोही फिल्म्सच्या बॅनरखाली निर्माते राजेंद्रकुमार गुलाबराव मोहिते आहेत. ज्योती राजेंद्रकुमार मोहीते सहनिर्मात्या आहेत. सागर दिनकरराव मोहिते यांनी दिग्दर्शनाची धुरा यशस्वीपणे सांभाळली आहे. 'पुन्हा एकदा चौरंग' हे शीर्षक खऱ्या अर्थाने चित्रपटाचा रंग दाखवणारे आहे. ही लढाई न्याय-अन्यायाची असल्याचे पोस्टर पाहिल्यावर सहजपणे जाणवते. 'आता मेणबत्ती नाही...' ही टॅगलाईन थेट हृदयाला भिडते.

सोयगाव - सोयगाव शहरातील डॉ.मोहीतकुमार जोहरे यांच्या घरी महालक्ष्मी स्थापना करण्यात आली आहे.यानिमित्त आकर्षक अशी मकर सजावट करण्यात आली होती महालक्ष्मी मनोभावे पूजन करण्यात आले होते. यावेळी जोहरे कुटुंब सह परिवार उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

संक्षिप्त वृत्त...

लोकमान्य टिळक महाविद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा संपन्न

कदेर, दि.१६ सप्टेंबर -

लोकमान्य टिळक विद्यालय कदेर (ता. उमरगा) या प्रशालेतील १९९५-९६ बॅचच्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा १५ सप्टेंबर रोजी संपन्न झाला. वरिष्ठ शिक्षक गोविंदराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली हा स्नेहमेळावा पार पडला. सूत्रसंचालन चंद्रशेखर गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुधीर चौधरी, अतुल औरादे, संजय पाटोळे, परमेश्वर एकुर्गे, भास्कर मानेगोपाळे, तन्वीर शेख, वर्षा बिराजदार, रेखा स्वामी, सुमन हुग्गे आणि इतर सर्व मित्रांनी परिश्रम घेतले. याप्रसंगी एम.डी. गायकवाड, एन.के. सूर्यवंशी यांनी सुमधुर गीत गायनातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्याचबरोबर देशपांडे, चौधरी, दुर्गे गुरुजी, कलशेट्टी, भोसले यांचेही मार्गदर्शन लाभले.

महिला काँग्रेस जिल्हा कार्याध्यक्षपदी ॲड. तनुजा हेड्डा यांची नियुक्ती

धाराशिव, दि.१६ सप्टेंबर -

महिला काँग्रेसच्या जिल्हा कार्याध्यक्ष पदी ॲड. तनुजा हेड्डा निवड करण्यात आली. जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष धीरज पाटील, ज्येष्ठ नेते विश्वासराव शिंदे यांच्या हस्ते हेड्डा यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. या निवडीबद्दल धाराशिव येथे शहर काँग्रेस तर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हा काँग्रेस मुख्य संघटक राजाभाऊ शेरखाने, जनता बँकेचे संचालक आशिष मोदानी, डीसीसी बँकेचे संचालक मेहबूबपाशा पटेल, जिल्हा काँग्रेस वरिष्ठ उपाध्यक्ष सय्यद खलील, उपाध्यक्ष प्रशांत काका पाटील, उपाध्यक्ष डॉ. स्मिता शहापुरकर, कोषाध्यक्ष बापू शेळके यांच्यासह आदिंनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनी पालकमंत्री प्रा.डॉ. सावंत यांच्या हस्ते ध्वजारोहण

धाराशिव, दि.१६ सप्टेंबर -

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या ७६ व्या वर्धापन दिनानिमित्त १७ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे पालकमंत्री प्रा.डॉ.तानाजीराव सावंत यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येणार आहे. तत्पूर्वी सकाळी ८:४५ वाजता पालकमंत्री प्रा.डॉ.सावंत हे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणातील स्मृतीस्तंभास पुष्पहार अर्पण करतील.

महात्मा बसवेश्वर विद्यालयात हिंदी दिन उत्साहात साजरा

उमरगा, दि.१६ सप्टेंबर -

हिंदी दिना निमित्त श्री महात्मा बसवेश्वर विद्यालय, उमरगा शाळेत शाळेतील हिंदी विषयांच्या शिक्षिका श्रीमती जोत्सना पाटील यांनी सूत्रसंचलन केले. या कार्यक्रमासाठी अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक नेताजी गायकवाड उपस्थित होते. तसेच प्रमुख उपस्थितीत प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका लोहार उपस्थित होते. तसेच प्रमुख मार्गदर्शन प्राथमिक शाळेतील गोपाळ आष्टे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. व मान्यवरांच्या उपस्थितीत भित्तिपत्रकांचे मुख्याध्यापक नेताजी गायकवाड यांच्या हस्ते फित कापून उदघाटन झाले. यामध्ये विद्यार्थ्यांनी हिंदी कविता, हिंदी लेखकांचे जिवन चरीत्र, हिंदी वाक्य प्रचार, दोहे आदी उत्कृष्ट पणे तयार करून लावले होते.

मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनी मध्यवर्ती प्रशासकीय इमारत येथे आज ध्वजारोहण

धाराशिव, दि.१६ सप्टेंबर -

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या ७६ व्या वर्धापन दिनानिमित्त १७ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता मध्यवर्ती प्रशासकीय इमारत येथे प्रभारी अपर जिल्हाधिकारी शिरीष यादव यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येणार आहे.या ध्वजारोहण कार्यक्रमाला प्रशासकीय इमारतीतील सर्व कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन राज्य उत्पादन शुल्कचे अधीक्षक गणेश बारगजे यांनी केले आहे.

सोयाबीन, कांदा याबाबत सरकारचा शेतकऱ्यांना दिलासा : आ. राणाजगजितसिंह पाटील

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१६ सप्टेंबर -

केंद्र सरकारने सोयाबीन तेलावरील आयात शुल्क वाढवण्याचा घेतलेला निर्णय आणि कांदा निर्यातीला दिलेलं प्रोत्साहन या दोन्ही निर्णयामुळे केंद्र आणि राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे असून शेतकऱ्यांच्या फायद्याचे निर्णय घेणारे असल्याचे प्रतिपादन आमदार राणाजगजीत सिंह पाटील यांनी केले ते आज धाराशिव येथे पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी नितीन काळे रामदास कोळगे सतीश दंडनाईक राजसिंहराजे निंबाळकर अजित पिंगळे अभय इंगळे साहेबराव घुगे विजय शिंगाडे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार पाटील पुढे म्हणाले की सोयाबीन दराच्या बाबतीत आम्ही सातत्याने प्रयत्न करत आहोत ,केंद्र सरकारने घेतलेल्या मोठा निर्णय घेत खाद्यतेलावरील आयात शुल्क वाढवण्याचा घेतलेला निर्णय आता शेतकऱ्यांच्या सोयाबीनचा दर वाढवणारा ठरणार आहे. शेतकऱ्यांच्या सोयाबीनला आता नक्कीच पाच हजारांच्या पुढे दर मिळेल असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. धाराशिव जिल्ह्यात सोयाबीन खरेदी आधारभूत केंद्र पुढच्या काही दिवसात सुरू होतील अशी माहिती त्यांनी यावेळी दिली. कांदा निर्यातीलाही सरकारने प्रोत्साहन देण्यासाठी निर्णय घेतला आहे. त्यामुळे आपल्या जिल्ह्यात खूप मोठ्या प्रमाणात लागवड होणाऱ्या कांद्यालाही आगामी काळात चांगला भाव मिळण्याची शक्यता आमदार पाटील यांनी व्यक्त केली. २०२३ च्या अतिवृष्टी नुकसानी पोटी राज्यातील ११ लाख शेतकऱ्यांसाठी अकराशे कोटी रुपये प्रत्येकी ५००० प्रती हेक्टर प्रमाणे मिळणार असून २०२१ - २२ चे पिक विमा नुकसान भरपाई याचिकांवर कोर्टात प्रक्रिया चालू आहे त्याचाही लवकरच निकाल लागेल असे त्यांनी सांगितले. तुळजापूर तीर्थक्षेत्राच्या ठिकाणांची ६० कोटींची कामे आगामी दहा दिवसात सुरुवात होणार असून तुळजापूर तीर्थक्षेत्राचा विकास आराखडा प्रस्तावित आहे, त्याची कामेही लवकरच सुरू होतील, असे त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितले.

उजनीचे पाणी रामदरा तलावात लवकरच येईल, हे पाणी ज्या घाटणे बँरेज मधून उचलले जात आहे त्या भागात पाण्याची आवक

वाढल्यामुळे याला थोडा विलंब लागत आहे. परंतु आगामी काळात हे पाणी लवकरात लवकर रामदरा तलावात आणण्याचा आपला प्रयत्न असल्याचे आमदार राणादादा यावेळी म्हणाले.

पोदार शाळेमुळे नळदुर्गमध्ये शैक्षणिक क्रांती होईल : संजय जाधव

तभा वृत्तसेवा
नळदुर्ग, दि.१६ सप्टेंबर -

नळदुर्ग व परीसरातील ग्रामीण भागात पोदार इंटरनॅशनल शाळेची सुरुवात म्हणजे दर्जेदार शिक्षणाचा लाभ विद्यार्थ्यांना मिळेल असे मत धाराशिव जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक संजय जाधव यांनी व्यक्त केले.

सद्गुरू शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने नळदुर्ग जवळील हॉटेल दिल्ली दरबारच्या समोर पोदार शाळेची उभारणी केली जात आहे याचे भुमिपुजन पोलिस अधीक्षक संजय जाधव यांच्या हस्ते झाले. उमाकांत मिटकर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलतांना मिटकर यांनी म्हटले की, मी लहानपणापासुन नळदुर्ग मध्ये राहतो पण इथे आंतरराष्ट्रीय स्तरावरील दर्जाची शाळा अद्यापही सुरू झाली नाही अनेक पालकांची मुले ही महानगरामध्ये शिक्षणाला जातात.

यावेळी पोदार शाळेचे प्रतिनिधी प्राचार्य श्रीकांत वारुळे यांनी पोदार शाळेची माहिती दिली.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.डॉ. संतोष पवार यांनी केले. यावेळी सद्गुरु शिक्षण प्रसारक मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांच्या हस्ते आज जिल्हा युवा पुरस्काराचे वितरण

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१६ सप्टेंबर -

धाराशिव जिल्ह्यातील युवा विकासाच्या कार्यात केलेल्या योगदानाची दखल घेऊन दरवर्षी युवकांना आणि युवकांच्या नोंदणीकृत संस्थांना जिल्हा युवा पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाचे औचित्य साधून क्रीडा विभागाच्या वतीने १७ सप्टेंबर रोजी पालकमंत्री प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित मुख्य शासकीय ध्वजारोहणानंतर जिल्हा युवा पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे.

जिल्हास्तरीय युवा पुरस्कारासाठी सन २०१९-२० वर्षाकरिता संजय भुतेकर (थोडसरवाडी ता.जि. धाराशिव), सन २०२०-२१ च्या पुरस्कारासाठी अनिल भोसले (मु.पो. गावसुद), सन २०२१-२२ च्या पुरस्कारासाठी दीपक कारकर मु.पो.जवळा (ता.परंडा) येथील दीपक कारकर आणि सन २०२२-२३ च्या जिल्हास्तरीय युवा पुरस्कारासाठी अजिंक्य वराळे (मुळेवाडी पो. किनी) यांची तर संस्थेचे जिल्हास्तरीय युवा पुरस्कार सन २०१९-२० चा पुरस्कार नवयुवक क्रांती बहुउद्देशीय सामाजिक संस्था मुळेवाडी (ता.जि.धाराशिव), सन २०२०-२१ चा जिल्हास्तरीय युवा पुरस्कार लोककल्याण बहुउद्देशीय सामाजिक संस्था काटेवाडी (ता.उमरगा) आणि सन २०२२-२३ चा जिल्हास्तरीय युवा पुरस्कार वात्सल्य सामाजिक संस्था नळदुर्ग यांना पालकमंत्री प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे.

पुरस्काराचे स्वरूप जिल्हास्तरावर दरवर्षी एक युवक आणि एक युवती तसेच एका नोंदणीकृत संस्था यांना गौरवपत्र, सन्मानचिन्ह व १० हजार रुपये (प्रति युवक आणि युवती) आणि संस्थेसाठी गौरवपत्र, सन्मानचिन्ह व रोख ५० हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

संविधान मंदिराचा उद्घाटन समारंभ संपन्न...

भक्कम लोकशाही करिता संविधानाचा जागर घरोघरी व्हावा : संतोष राऊत

तभा वृत्तसेवा
शिराढोण, दि.१६ सप्टेंबर -

भक्कम लोकशाही करिता संविधानाचा जागर घरोघरी व्हावा, असे प्रतिपादन कौशल्य विकास व नाविन्यता विभागाचे सहाय्यक आयुक्त संतोष राऊत यांनी शासकीय औद्योगीक प्रशिक्षण संस्था कळंब येथील संविधान मंदिराच्या उद्घाटन कार्यक्रमात केले.

सामाजिक न्यायाची खरी शिकवण ही भारताच्या संविधानातुन प्राप्त होत असल्यामुळे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग अंतर्गत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील राज्यातील सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व शासकीय तांत्रिक विद्यालयामध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षनार्थींना सामाजिक न्यायाची खरी शिकवण मिळावी यासाठी मंगल प्रभात लोढा, मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांच्या संकल्पनेतून राज्यातील ४३४ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व शासकीय तांत्रिक विद्यालयामध्ये संविधान मंदिराची स्थापना करण्यात आलेली आहे.

या संविधान मंदिराचे उद्घाटन उपराष्ट्रपती जयदीप धनखड यांच्या हस्ते दि.१५ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता ऑनलाइन पद्धतीने झाले. कार्यक्रमास प्रमूख पाहुणे म्हणून डी.एस. लांडगे, उपशिक्षणाधिकारी, आयमसी सदस्य जी.बी. करडे, पी.बी. झोरी, आर.एम. कापसे, श्रीकांत खारके, वैभवराज फाटक, आशा राऊत, सूरज भांडे, महादेव आडसुळ, सुभाष घोडके, सी.आर. घाडगे, बंडू ताटे, प्रकाश भडंगे, अविनाश घोडके, नवनाथ भंडारे, माधवसिंग राजपूत उपस्थित होते.

युवराज नळे 'रौशन' लिखित तिच्या कविता या काव्यसंग्रहाचे प्रकाशन

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१६ सप्टेंबर -

कलाविष्कार अकादमी, साहित्य भारती आणि म.सा.प. यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तिच्या कविता या युवराज नळे रौशन लिखित काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा संपन्न झाला.

स्त्रीमनाचे हळवे भावविश्व उलगडणाऱ्या, नाती मैत्री प्रीतीच्या नाजूक रेशीमगाठी जपणाऱ्या आणि प्रसंगी सामाजिक जाणीवांनाही प्रखरतेने मांडणाऱ्या 'तिच्या कविता.... या काव्य संग्रहाच्या प्रकाशनाला केंद्रस्थानी ठेऊन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रकाशन सोहळा सुवर्णा पवार (उपआयुक्त महिला व बालकल्याण विभाग महाराष्ट्र शासन) यांच्या हस्ते व जेष्ठ लेखिका कमल नलावडे, शास्त्रज्ञ डॉ. हेमा शिराळ होगाडे, भरोसा सेल प्रमुख पोलिस उपनिरीक्षक अनघा गोडगे आणि सौ वर्षा नळे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

श्री नृसिंह गणेश मंडळाच्या वतीने विविध स्पर्धेचे बक्षीस वितरण

तभा वृत्तसेवा
येरमाळा, दि.१६ सप्टेंबर -

येथील श्री नृसिंह गणेश मंडळाच्या वतीने घेण्यात रविवारी (ता.१५) घेण्यात आलेल्या लहान मुलांच्या नृत्य स्पर्धेला चांगला प्रतिसाद मिळाला.या नृत्य स्पर्धेत चाळीस स्पर्धकांनी सहभागी होऊन काना सोजा रे, दैवत छत्रपती, गाडी घुंगराची, मंगळागौर, येडाई गरबा खेळाया निघाली, लुंगी डांस लुंगी डान्स रिमिक्स गाण्यांवर नृत्य सादर करताना प्रेक्षकांना नृत्याचा तालावर ठेका धरायला लावला.

स्पर्धेचे उद्घाटन येडाई व्यसनमुक्ती केंद्राच्या संचालिका डॉक्टर पल्लवी संदीप तांबारे,प्रणिता सोमनाथ बेदरे, आरती कवडे, जगन्नाथ जनार्दन बारकुल यांच्या हस्ते करण्यात आले. ही स्पर्धा दोन गटात घेण्यात आली.

मोठ्या गटात प्रथम क्रमांक श्वेता पांडुरंग बेदरे द्वितीय रोशनी औदुंबर बारकुल तर तृतीय क्रमांक स्वराज दत्तात्रय बारकुल यांनी मिळविला तर उत्तेजनार्थ वैष्णवी दत्तात्रय बारकुल हीला बक्षिस देण्यात आले.

लहान गटामध्ये प्रथम क्रमांक गौरी सुरज भालेराव द्वितीय क्रमांक प्रांजल अमोल बारकुल तर तृतीय क्रमांकाचे देवांश औदुंबर बारकुल यांने बक्षिसे मिळवले तर उत्तेजनार्थ गौरी सुरेश भालेराव हीला बक्षीस देण्यात आले.

या स्पर्धेतील प्रत्येक स्पर्धकाला मंडळाकडून विजेत्यांना अनुक्रमे रोख रक्कम ट्रॉफी, तर सहभागी स्पर्धाकांना प्रमाणपत्र, भेटवस्तू देण्यात मान्यवारांच्या हस्ते देण्यात आल्या.

मंडळाच्या वतीने रवीवारी (ता. १५) आयोजित ५ वी ते १२ वी स्पर्धा परीक्षेमध्ये प्रथम क्रमांक सिद्धांत मारुती बारकुल द्वितीय क्रमांक शुभम राजेश शिरसट तृतीय क्रमांक धनश्री बालाजी बारकुल यांचेही या कार्यक्रमात सन्मान करण्यात आले.

यावर्षी मंडळाने डीजेसह इतर खर्च टाळून विविध उपक्रम घेतल्यामुळे मंडळाचे ग्रामस्थांतुन कौतुक होत आहे.

जिल्हा संघटक सुधीर पाटील यांच्या हस्ते शिवसेना शाखांचे उद्घाटन

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१६ सप्टेंबर -

हिंदू हृदय सम्राट तथा शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा वारसा घेऊन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून पालकमंत्री तानाजीराव सावंत यांच्या मार्गदर्शनाने धाराशिव जिल्हा संघटक सुधीर पाटील यांनी धाराशिव जिल्ह्यामध्ये विविध ठिकाणी शिवसेना शाखा उद्घाटनाचा सपाटा लावला असून त्यांच्या पुढाकारातून व संकल्पनेतून जुनोनी येथे शिवसेना शाखेचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी गावातील ज्येष्ठ मंडळी, पक्ष पदाधिकारी व गावातील मंडळी उपस्थित होते. यावेळी गावातील नागरिकांनी मूलभूत अडचणी अण्णांना सांगितल्या व त्या सोडण्याचे आश्वासन ग्रामस्थांना त्यांनी दिले. यावेळी गावातील नागनाथ पाटील, अकबर शेख, राजा मामू शेख, अण्णा पाटील व इतर ग्रामस्थ उपस्थित होते. तसेच वलगुड येथेही शिवसेना शाखेचे उद्घाटन अण्णांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी गावकऱ्यांनी रस्त्याची अडचण अण्णा जवळ काही कामांच्या अडचणी व्यक्त केली. त्यासाठी नक्की पाठपुरावा करू असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. याप्रसंगी गावातील बिभिषण जाधव, भारत जाधव भोंग, शिवसेनेचे पदाधिकारी कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तसेच सुर्डी या ठिकाणी शिवसेना शाखेचे उद्घाटन त्यांनी केली. यावेळी गावातील गावकऱ्यांनी धोंडेबुवा महाराज मंदिराच्या सभा मंडपाचे बऱ्याच दिवसापासून रखडलेले काम शासन दरबारी मार्गी लावण्याची मागणी केली हे काम शासन दरबारी लवकरात लवकर मंजूर करून पूर्ण करण्याच्या आश्वासन त्यांनी दिले.

यावेळी नाना पाटील, श्रीकांत देशमुख, गावातील मनोज चोपाटे, रमेश शेलार, माळी पांडागळे, कांबळे, लोभे, माने, जोगाडे व गावातील असंख्य नागरिक व शिवसैनिक उपस्थित होते.

तसेच बेगडा या ठिकाणीही अण्णांच्या व ज्येष्ठ ग्रामस्थांच्या हस्ते शाखेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी गावाकडे गावकऱ्यांनी बऱ्याच दिवसापासून रखडलेले विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या सभामंडपाचे काम व गावातील दोन मंदिर बांधून द्यावी अशी मागणी गावकऱ्यांनी अण्णांकडे केले.

याप्रसंगी पोपट साळुंखे, दीपकराव देशमुख, नाना शेंदारकर, रमेश साळुंखे, कसबे, क्षीरसागर व गावातील असंख्य नागरिक उपस्थित होते.

गांधी यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याला धाराशिवात भाजपाकडून जोडे मारो आंदोलन

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१६ सप्टेंबर -

डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक धाराशिव या ठिकाणी भारतीय जनता पार्टी, भारतीय जनता युवा मोर्चा, अ.जा.मोर्चा व भारतीय जनता पार्टी सर्व मोर्चे, आघाडी धाराशिव यांच्या वतीने आरक्षण विरोधी राहुल गांधी यांच्या आरक्षण संपवण्याबाबतच्या वक्तव्यामुळे त्यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याला जोडे मारून आंदोलन करण्यात आले.

अमेरिकेतील वॉशिंग्टन या ठिकाणी प्राध्यापक व संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांसमोर लोकसभेचे विरोधी पक्ष नेते तथा काँग्रेसचे सर्वोसर्वा राहुल गांधी यांनी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वंचित घटकांना दिलेले आरक्षण आम्ही सत्तेत आल्यानंतर कालांतराने संपवून टाकू अशा पद्धतीचे बेजबाबदारपणाचं आणि सर्व वंचित शोषितांना चीड आणणारे वक्तव्य केले. इंडी आघाडीने व काँग्रेसने मागील लोकसभेच्या निवडणुकीमध्ये भाजपा सत्तेत आल्यानंतर राज्यघटना बदलणार आहे. आरक्षण संपवणार आहे अशा पद्धतीचे संभ्रम तयार करणारे वक्तव्य करून लोकांमध्ये भीती निर्माण करून खासदार निवडून आणले आणि तेच आता आरक्षण संपवण्याची भाषा करत वक्तव्यातून त्यांनी त्यांचा खरा चेहरा सर्वांसमोर आणलेला आहे.आरक्षणाला हात घालण्याचा प्रयत्न केला तर भारतीय जनता पार्टी कदापी माफ करणार नाही अशा पद्धतीचा सज्जड दम देखील आंदोलनावेळी दिला. या वक्तव्याच्या निषेधार्थ धाराशिव येथे राहुल गांधी यांच्या विरोधात घोषणाबाजी करत त्यांच्या प्रतीकात्मक पुतळ्याला जोडे मारून आंदोलन करण्यात आले. यावेळी माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष राजसिंहा राजेनिंबाळकर, प्रकास. प्रवीण पाठक, युवराज नळे, सरचिटणीस, दीपक आलुरे, इंद्रजित देवकते, सुनील काकडे, विक्रमसिंह देशमुख, किसान मोर्चाचे राम दास कोळगे, गुलचंद व्यवहारे, राजाभाऊ पाटील, संतोष बोबडे, अभय इंगळे, विद्या माने यांच्यासह आदिंनी आपल्या मुलाखतीतून तीव्र शब्दात राहूल गांधी यांचा निषेध व्यक्त केला.

याप्रसंगी भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भारतीय बौद्ध महासभेची लोहारा तालुका कार्यकारिणी जाहीर, अध्यक्षपदी तानाजी माटे

तभा वृत्तसेवा
लोहारा, दि.१६ सप्टेंबर -

भारतीय बौद्ध महासभेची लोहारा तालुका कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असुन अध्यक्षपदी तानाजी माटे यांची निवड करण्यात आली आहे. भारतीय बौद्ध महासभेच्या तालुका कार्यकारिणीची मुदत संपल्याने नुतन कार्यकारिणी गठित करण्यासाठी जिल्हाध्यक्षा राजश्री कदम यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हा कोषाध्यक्ष कुमार ढेपे, पर्यटन उपाध्यक्ष विश्वास पांडागळे, महीला उपाध्यक्षा शिला चंदनशिवे, विजयकुमार बनसोडे, डॉ.प्रा. विवेकानंद वाहूळे, ब्रम्हानंद गायकवाड, केराबाई कांबळे, बाळासाहेब बागडे, प्रा. सुधाकर गायकवाड, रत्नदीप मस्के, अजय सितापुरे, डॉ. आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या सिनेटर मेंबर निकिता गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

ग्रा.पं. सदस्य जयमाला करंडे यांचे सदस्यत्व रद्द

जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंम्बासे यांचे आदेश....

तभा वृत्तसेवा
नळदुर्ग, दि.१६ सप्टेंबर -

सरकारी जागेवर पतीने केलेले अतिक्रमण सिंदगाव (ता.तुळजापुर) येथील महिला ग्राम पंचायत सदस्याला चांगलेच महागात पडले असुन धाराशिवचे जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांनी याप्रकरणी सिंदगाव ग्रा.पं.च्या ग्रा.पं. सदस्या जयमाला शिवानंद करंडे यांचे सदस्यत्व रद्द केले आहे. त्यामुळे नंदगाव पाठोपाठ सिंदगाव येथील महिला ग्राम पंचायत सदस्यांलाही पदावरून पायउतार व्हावे लागले आहे.

सिंदगाव येथील माजी ग्रामपंचायत सदस्य चांदपाशा नदाफ यांनी सिंदगावच्या ग्रामपंचायत सदस्या व विद्यमान उपसरपंच जयमाला शिवानंद करंडे यांचे पती शिवानंद आप्पाशा करंडे यांनी सरकारी जागेत अतिक्रमण केल्याची तक्रार जिल्हाधिकाऱ्यांकडे दाखल केली होती. जिल्हाधिकाऱ्यांनी या तक्रारीची दखल घेऊन याप्रकारणी तुजाळपुर तहसिदारांना चौकशी करण्याचे आदेश देऊन अहवाल सादर करण्यास सांगितले होते.

यानंतर तहसिलदार यांनी चौकशी करून शिवानंद आप्पाशा करंडे यांनी अतिक्रमण केले असल्याचा अहवाल जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर केला. या अहवालानुसार जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १४ अन्वये सिंदगावच्या ग्रामपंचायत सदस्या जयमाला शिवानंद करंडे यांना ग्राम पंचायत सदस्य म्हणुन अपात्र केले आहे. त्यामुळे जयमाला करंडे यांचे ग्रामपंचायत सदस्यत्व रद्द झाले आहे.

पतीने केलेल्या अतिक्रमणामुळे एका महिला ग्रामपंचायत सदस्याला पदावरून पायउतार व्हावे लागले आहे.

हे प्रकरण चांदपाशा नदाफ यांनी लावुन धरल्याने हा निकाल आला आहे. धाराशिव जिल्हाधिकाऱ्यांच्या या आदेशामुळे पदाचा गैरवापर करून सरकारी जागेवर अतिक्रमण केलेल्या अनेकांचे धाबे दणाणले आहेत.

अग्रलेख...

आर्थिक व औद्योगिक आघाडीवरील यश

आनंद, सुख-समृद्धी तसेच ऐश्वर्य, प्रेरणा व ऊर्जा प्रदान करणाऱ्या मंगलमूर्ती विघ्नहर्त्याचा गणेशोत्सव देशभरात सर्वत्र उत्साहात साजरा केला जात आहे. एकीकडे चैतन्य व उत्साहाचे वातावरण असतानाच दुसरीकडे आर्थिक, औद्योगिक आघाडीवरदेखील सकारात्मक व देशाच्या विकासाच्या दृष्टीने अनुकूल बातम्या समोर आल्या आहेत. त्यातील पहिली बातमी ऊर्जा क्षेत्रातील आहे. एनएचपीसी म्हणजे नॅशनल हायड्रोइलेक्ट्रिक पॉवर कॉर्पोरेशनने प्रतिष्ठित नवरत्न दर्जा प्राप्त केला आहे. जगातील आघाडीच्या दहा जलविद्युत कंपन्यांच्या श्रेणीमध्ये सहभागी होण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल सुरू केलेल्या एनएचपीसीची विकास यात्रा १९८१-८२ मध्येच सुरू झाली. केवळ १८० मेगावॅटचा प्रकल्प हाती घेऊन कंपनीची वाटचाल सुरू झाली आणि आता एनएचपीसी ही १०० टक्के हरित ऊर्जा प्राप्त करणारी ७१४४ मेगावॅटची प्रभावशाली कंपनी बनली आहे. दुसरी आनंददायी वार्ता म्हणजे गेल्या चार महिन्यांत भारताच्या कृषी उत्पन्नाची निर्यात वाढली असून त्यात बासमती तांदळाचा मोठा वाटा आहे. सर्वांना आवडणाऱ्या, लोकप्रिय, चवदार, सुगंधी बासमती तांदळाची निर्यात १५ टक्क्यांनी वाढली आहे. विशेष म्हणजे भारत हा जगातील बासमती तांदळाचा मोठा उत्पादक आहे. देशाच्या आर्थिक आघाडीवरील तिसरे महत्त्वाचे सकारात्मक वृत्त म्हणजे २०२७ सालापर्यंत भारत जगातील तिसरी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था बनण्याची शक्यता ख्यातनाम आंतरराष्ट्रीय संस्था 'जेफरीज'ने वर्तविली आहे. तर, २०२४ ते २०३१ या काळात या दशकाच्या अखेरपर्यंत भारताच्या अर्थव्यवस्थेचा वेग ७.६ ते ७.८ टक्के राहणार असल्याचा अंदाज नामवंत क्रेडिट रेटिंग संस्था डेलॉईटने वर्तविला आहे. या सर्व बातम्या समस्त भारतीयांच्या दृष्टीने निश्चितच समाधानकारक आहेत. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात तसेच जागतिक पातळीवर जे बदल होत आहेत, ज्या संधी उपलब्ध होत आहेत, त्याचा फायदा भारताने घेऊन विकसित राष्ट्राच्या दिशेने वेगाने वाटचाल केली पाहिजे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही दिवसांपूर्वी युवकांच्या एका कार्यक्रमाला संबोधित करताना म्हटले होते. पंतप्रधानांच्या या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत भारतातील सळसळत्या चैतन्याची तरुणाई प्रयत्न, सातत्य व इच्छाशक्तीने आपल्या स्वप्नांचा पाठलाग करीत आहे. परिणामी देशातील अनेक तरुण उद्योजक प्रगती व विकासाचे ध्वज उंच फडकवत आहेत. काही दिवसांपूर्वी नीती आयोगाच्या पार पडलेल्या गव्हर्निंग कौन्सिल अर्थात प्रशासकीय परिषदेत मार्गदर्शन करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र करणे ही प्रत्येक भारतीयाची महत्त्वाकांक्षा आहे,' हे प्रामुख्याने अधोरेखित केले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हे उद्गार म्हणजे सामर्थ्यशाली व विकसित भारताचे जणू संकल्पचित्रच आहे. प्रखर इच्छाशक्ती, दुर्दम्य आशावाद, भव्य स्वप्ने व जबरदस्त आत्मविश्वास या साऱ्याच गोष्टींचे प्रतिबिंब पंतप्रधानांच्या प्रत्येक मार्गदर्शनात उमटते. एकीकडे विरोधी पक्ष सातत्याने नकारात्मक व द्वेषमूलक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असताना दुसरीकडे केंद्रातील मोदी सरकार प्रगती व विकासाचे मुद्दे सकारात्मक दृष्टिकोनातून मांडत त्या दिशेने प्रत्यक्ष कृती करीत आहे. याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे अग्निवीर योजना. रालोआ सरकारच्या अग्निवीर योजनेला विरोधी पक्षांनी प्रामुख्याने काँग्रेसने प्रखर विरोध केला होता. या योजनेविषयी गैरसमज निर्माण करण्याची एकही संधी काँग्रेसने सोडली नव्हती. मात्र, आता मोदी सरकारने अग्निवीर योजनेची व्याप्ती मोठ्या प्रमाणात वाढविण्याचा निर्णय घेऊन काँग्रेससह सर्वच विरोधकांचे दात त्यांच्याच घशात घातले आहेत. अग्निवीरचा कार्यकाळ चार वर्षांवरून सात वर्षांपर्यंत वाढणार आहे. याशिवाय त्यांचा एकरकमी पगारही वाढणार आहे. फेब्रुवारी २०२४ नंतर अग्निवीर योजनेंतर्गत भरती झालेल्या सैनिकांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. नवीन योजनेंतर्गत आता 'अग्निवीर' सात वर्षे सैन्यात सेवा करणार असून त्याला २२ लाखांऐवजी ४१ लाख रुपये दिले जाणार आहेत. आता त्यांचे प्रशिक्षण २२ आठवड्यांऐवजी ४२ आठवड्यांचे असेल. ३० दिवसांची रजा ४५ दिवसांपर्यंत वाढणार आहे. तसेच आता २५ टक्के ऐवजी ५० टक्के सैनिक कायम होणार आहेत. म्हणजेच या वाढीव म्हणजे ५० टक्के सैनिकांना लष्करात कायमस्वरूपी नोकरी मिळेल. तिसऱ्यांदा देशाची सत्तासूत्रे हाती घेणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील रालोआ सरकारने अनेक महत्त्वाचे निर्णय आर्थिक व औद्योगिक आघाडीवर घेतले आहेत. २०१४ पूर्वीच्या भारतात म्हणजेच काँग्रेसप्रणीत संपुआ सरकारच्या राजवटीत प्रचंड भ्रष्टाचार, राष्ट्रवादी भावनेचा अभाव, घराणेशाही व राजकीय इच्छाशक्तीचा अभाव यांच्यामुळे देशाच्या विकासात अनेक अडथळे आले. मात्र, याच्या अगदी उलट व कार्यक्षम आणि धडाकेबाज निर्णय घेणारे सरकार अशी मोदी सरकारची प्रतिमा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आगमनानंतर देशातील व्यवस्थेमध्ये चैतन्य निर्माण झाले, ही वस्तुस्थिती असून गेल्या १० वर्षांत अर्थव्यवस्था गतिशील ठेवण्यात सरकारने यश प्राप्त केले आहे. पाच ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने भारत आता वेगाने वाटचाल करीत असून यामुळे देशातील तरुणांसाठी अनेक जागतिक संधी उपलब्ध होत आहेत. जगातील सर्व आधुनिक पायाभूत सुविधा साध्य करण्यासाठी केंद्राचे सर्वच स्तरांवर प्रयत्न सुरू आहेत. कुठेही निव्वळ स्वप्नरंजनात न वावरता उलट त्या स्वप्नांचा यशस्वीपणे पाठलाग करून व त्याला प्रयत्न, सातत्य आणि परिश्रमांची जोड देऊन गेल्या दहा वर्षांपासून मोदी सरकारची वाटचाल सुरू आहे. गतिशीलता आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर हे मोदी सरकारचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. या दहा वर्षांच्या कार्यकाळात केंद्रातील मोदी सरकारने अनेक महत्त्वाचे निर्णय प्रभावीपणे व अतिशय गतीने राबविले. परिणामी २०१४ पासून अनेक मोठमोठ्या व महत्त्वाकांक्षी योजना मार्गी लागल्या. आता तिसऱ्यांदा पुन्हा केंद्रात भाजपाप्रणीत रालोआ सरकार सत्तारूढ झाले आहे. त्यामुळे जनतेच्या आशा-अपेक्षा-आकांक्षा उंचावल्या आहेत. त्यामुळे केंद्र सरकारला शाश्वत व दूरगामी विकासाच्या दृष्टीने सर्व राज्यांना सोबत घेऊन प्रभावी धोरणांची अंमलबजावणी करावी लागणार आहे. आर्थिक व औद्योगिक आघाडीवर नव्याने धोरणे आखण्याचे मोठेच आव्हान केंद्रापुढे आहे. सर्वच स्तरांवर अर्थात आर्थिक, औद्योगिक, सामाजिक, शैक्षणिक व अन्य सर्वच क्षेत्रांत व्यापक व गुणात्मक परिवर्तन करण्याचे केंद्रातील मोदी सरकारचे ध्येय आहे. हे कार्य मुळीच सोपे नसले, तरी पंतप्रधान आणि त्यांच्या सहकाऱ्यांची इच्छाशक्ती व क्रियाशक्ती दांडगी आहे. त्यामुळे व्यापक परिवर्तनाचे हे आव्हान ते निश्चितच आत्मविश्वासाने स्वीकारतील, याची खात्री आहे. मात्र, यासाठी केवळ राजकीय क्षेत्रातील व्यक्तींनी प्रयत्न करून चालणार नाही तर याकरिता नोकरशाही व संबंधित सर्वच घटकांचे सहकार्य आवश्यक आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे विकसित भारताचा संकल्प साध्य होण्यासाठी देशातील तरुण उद्योजक, स्टार्टअप्स यांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. कारण 'विकसित भारत' ही केवळ आकर्षक अथवा लक्षवेधी घोषणा नाही, तर तो आपल्या सर्वांचा समान उद्देश आहे. हे आपणच म्हणजेच देशवासीयांनी स्वत:ला दिलेले एक लक्ष्य आहे. या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी देशवासीयांची सामूहिक इच्छाशक्ती, क्रियाशक्ती एकवटण्याची व त्याचे प्रकटीकरण होण्याची आवश्यकता आहे. विकासाचा हा संकल्प पूर्णत्वास नेण्याची शक्ती आम्हा सर्व देशवासीयांना मिळो, अशी श्रीगणेशाला नम्र प्रार्थना आहे. ■

दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

हरयाणात तिरंगी लढत!

हरयाणा विधानसभेचे निवडणूकपूर्व चित्र स्पष्ट झाले असून राज्यात भाजपा, काँग्रेस व आम आदमी पक्ष यांच्यात तिरंगी लढत होईल. काँग्रेस व आम आदमी पक्ष यांच्यात जागा वाटपाचा समझोता होऊ न शकल्याने तिरंगी लढतीची स्थिती तयार झाली. काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या सूचनेवरून काँग्रेसने आपशी जागा वाटपाची चर्चा सुरू केली. आम आदमी पक्षाने प्रारंभी २० जागांची मागणी केली. नंतर या पक्षाने आपली मागणी १५ जागांवर खाली आणली. मग १० जागांवर समझोता करण्यास हा पक्ष तयार झाला. शेवटी शेवटी तर आप नेत्यांनी ५-७ जागांवरही समझोता करण्याची तयारी दर्शविली. पण, राज्यातील काँग्रेसचे प्रमुख नेते भूपिंदरसिंग हुड्डा यांनी या समझोत्यास जोरदार विरोध केल्याने हा समझोता झाला नाही व आता दोन्ही पक्षांनी आपल्या उमेदवारांची घोषणा केली असून त्यांनी सर्व म्हणजे ९० मतदारसंघांत उमेदवार उभे करण्याचा निर्णय घेतला आहे.

२०१९ ची स्थिती : २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत आपने राज्यातील ४६ मतदारसंघांत आपले उमेदवार उभे केले होते आणि या सर्व उमेदवारांची जमानत जप्त झाली होती. त्यावेळी पक्षाला ०.४८ टक्के मतदान झाले होते. त्या तुलनेत २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस-आप समझोत्यानुसार आपला कुरुक्षेत्रची जागा देण्यात आली होती. भाजपाने याठिकाणी नवीन जिंदल यांना उभे केले होते तर आपने सुशील गुप्ता यांना उमेदवारी दिली होती. याठिकाणी मात्र आपने चांगली लढत दिली. नवीन जिंदल यांना २९ हजार मतांनी निसटता विजय मिळाला होता. आणि 'आप'ला जवळपास ४ टक्के मतदान झाले होते. चार विधानसभा मतदारसंघांत आपला आघाडी मिळाली होती. बहुधा याच आधारे आपने ५-७ जागांची मागणी केली असावी. ती काँग्रेसने फेटाळून लावली. आपला जागा देणे म्हणजे काँग्रेसने आपल्या पायावर कुऱ्हाड मारून घेण्यासारखे आहे, असे प्रतिपादन हुड्डा व इतर नेत्यांनी केले. हुड्डा यांनी तर पक्षाच्या एका बैठकीचा सभात्यागही केला होता, असे समजते. त्यांचा 'आप'शी समझोता करण्यास करडा विरोध होता, असे मानले जाते.

परिणाम : काँग्रेस व आम आदमी पक्ष यांच्यात होऊ न शकलेल्या समझोत्याचा निवडणुकीवर कोणता परिणाम होईल, याचे मूल्यमापन केले जात आहे. पहिला भाग म्हणजे उमेदवारांची घोषणा झाल्यानंतर काँग्रेस व भाजपा दोन्ही पक्षांत बंडखोरी झाली आहे. हे बंडखोर आपापल्या पक्षांना किती व कसे नुकसान पोहोचवतील, याचा अंदाज अद्याप आलेला नाही. आपने या बंडखोरांना उमेदवारी दिल्यास वा बंडखोरांनी स्वत: निवडणूक न लढविता आपच्या उमेदवारांना पाठिंबा दिल्यास त्याचा मतदानावर कसा व कितपत परिणाम होईल, हेही आजच सांगता येणार नाही. आपने राज्यात सर्व जागा लढविण्याचा निर्णय घेतला असून जास्तीत जास्त मतदारसंघांत काँग्रेसला नुकसान पोहोचविण्याची मानसिकता पक्षात आढळून येते. पण, राज्यात आपजवळ प्रभावशाली असे नेते नाहीत. त्यामुळे आपच्या ९० पैकी किती उमेदवारांना आपली जमानत वाचविता येईल, हाच एक प्रश्न सध्या तरी विचारला जात आहे. हरयाणा विधानसभा केवळ ९० सदस्यांची असल्याने ८-१० मतदारसंघांत जरी आपने काँग्रेसने नुकसान पोहोचविले तरी याचा फटका पक्षाला बसू शकतो.

जाट-गैरजाट : हरयाणात काँग्रेसची सारी दारोमदार जाट व शेतकऱ्यांवर आहे. हे दोन्ही घटक भाजपाच्या विरोधात आपल्याला एकगठ्ठा मतदान करतील, असे या पक्षाला वाटते. याशिवाय राज्यात प्रभावी मानला जाणारा वैश्य म्हणजे बनिया समाज काँग्रेसला मतदान करील, असा एक विश्वास काँग्रेसला वाटत आहे. तर, भाजपाने गैरजाटांवर आपले लक्ष केंद्रित केले आहे. मात्र, काही प्रमाणात जाटही आपल्याला मतदान करतील, असे भाजपाला वाटते. आजवरच्या काही निवडणुकीत २० ते २५ टक्के जाटांनी भाजपाला मतदान केले आहे. यावेळीही हे मतदान आपल्याला होईल, असे पक्षाला वाटते. सोबतीला निवडणूक नियोजन - संघटना या आधारे राज्यात भाजपाला पुन्हा एकदा निसटता विजय मिळण्याची आशा भाजपाला वाटत आहे. काँग्रेस-आम आदमी पक्ष यांच्यात जागावाटप न झाल्याने भाजपाला हरयाणात आशेचा किरण दिसू लागला आहे.

मुस्लिम नगण्य : हरयाणा हे एक असे राज्य आहे की, ज्यात मुस्लिम मतदारांची संख्या फार नगण्य आहे. राज्याच्या काही भागात ३-४ टक्के मुस्लिम मतदार आहेत. पण, त्यांच्यात निवडणूक निकालांना प्रभावित करण्याची ताकद नाही.

'इंडिया'वर परिणाम : काँग्रेस व आम आदमी पक्ष यांच्यात कोणत्याही समझोता न झाल्याने इंडिया आघाडीला तडा जाण्याची भीती काही काँग्रेस नेत्यांना वाटत आहे. काँग्रेस पक्ष आपल्या सहयोगी पक्षांना सामावून घेत नाही, असा आरोप पक्षावर होत आला आहे. तो विचारात घेऊनच राहुल गांधी यांनी काँग्रेस-आप युतीची भूमिका घेतली होती. आम आदमी पक्षाला ७-८ तर समाजवादी पक्षाला २-३ जागा देऊन या दोन्ही पक्षांना सोबत घेऊन पक्षाने निवडणूक लढवावी, असे प्रतिपादन त्यांनी केले होते. पण, ते विदेशात निघून जाताच हरयाणातील काँग्रेस नेत्यांनी समझोता हाणून पाडला, असे म्हटले जाते.

आता दिल्लीत : लोकसभा निवडणुकीत पंजाबमध्ये काँग्रेस व आम आदमी पक्ष यांनी परस्परांच्या विरोधात निवडणूक लढविली. त्यात काँग्रेसने आम आदमी पक्षाला मात दिली. त्यानंतर आता हरयाणा विधानसभा निवडणुकीत पुन्हा तीच स्थिती निर्माण झाली आहे. याठिकाणीही काँग्रेस आपला पटकणी देण्याची तयारी करीत आहे. हे दोन्ही पक्ष परस्परांच्या विरोधात निवडणूक लढवीत आहेत. गुजरात व छत्तीसगढमध्ये आम आदमी पक्षाने काँग्रेसला चांगलेच नुकसान पोहोचविले आहे. २०२५ च्या प्रारंभी दिल्ली विधानसभा निवडणूक होत असून त्यावेळी आम आदमी पक्ष काँग्रेसचा हिशेब चुकता करण्याची चिन्हे आहेत. दिल्लीत सध्याची स्थिती पाहता आम आदमी पक्षाला पुन्हा एकदा विजय मिळू शकतो. मात्र, पक्षाच्या जागा कमी होणार, हे ठरलेले आहे. या कमी होणाऱ्या जागा जिंकण्यासाठी काँग्रेस व भाजपात संघर्ष होणार आहे. यात भाजपाने बाजी मारल्यास काँग्रेसला पुन्हा एकदा दारुण पराभवाचा सामना करावा लागेल. यानंतर मग आप आणि काँग्रेस यांच्यातील संबंध जवळपास संपल्याने इंडिया आघाडीत या पक्षाचे स्थान काय असेल, असा प्रश्न स्वाभाविकच विचारला जाणार आहे.

कोणत्याही आघाडीत मित्रपक्षांना महत्त्वाचे स्थान असते, ही बाब काँग्रेसला विसरून चालणार नाही. भाजपाने राष्ट्रीय लोकशाही आघाडी स्थापन केल्यावर संयोजक असे नवे पद निर्माण करून जॉर्ज फर्नांडिस यांना महत्त्वाची जबाबदारी दिली होती आणि निर्माण होणाऱ्या समस्या हाताळण्याचे कामही त्यांनाच दिले होते. विरोधकांच्या आरोपांना उत्तर-प्रत्युत्तर देण्याचे कामही त्यांनी फर्नांडिसांवर सोपविले होते; जे त्यांनी उत्तमपणे पार पाडले होते. सोनाराच्या हातून कान टोचण्याचा हा प्रकार होता. जो वाजपेयी, अडवाणी यांनी योग्यप्रकारे केला होता. ■

वेध

अनिरुद्ध पांडे

बेशरमाचा वृक्ष...!

आपल्या जैवविविधतेत एक 'बेशरम' नावाची वनस्पती प्रजाती आहे. एखाद्या झुडपासारखी असलेली मोठ्या पानांची ही वनस्पती अगदी बेशरमसारखी वाढते. जिथे मूळ धरेल तिथे अस्ताव्यस्त वाढत राहते. कोणताही उपयोग नसलेली ही एक वनस्पती प्रजाती आहे. अशाच 'अमरवेल'सारख्या काही वनस्पती, काही कीटक, डास, झुरळ, माशी किंवा उंदरासारखे काही प्राणी, जे कोणत्याही कामाचे नाहीत पण उपद्रवी मात्र निश्चित. उपद्रवाशिवाय कोणताही कवडीमात्र उपयोग नसलेल्या या जैवविविधतेसोबत त्यांचे उपद्रव झेलतच आपल्याला जगावे लागते. दुर्दैवाने त्यांचे निर्मूलन अजूनही आपल्या विज्ञानाला जमलेले नाही. उलट आपण 'त्यांच्यासह' जगायला शिकलो आहोत. 'तिने त्याला झुरळासारखे झटकून टाकले' किंवा 'तो म्हणजे बेशरमाचे झाडच आहे' असे मानवी जीवनातील उल्लेख या पूर्णपणे निरुपयोगी जीवजंतूंबद्दल आपण करत असतो. बेशरम या झुडपी वनस्पतीचे झाडही कधी होत नसते, म्हणून निर्लज्ज व्यक्तीचा उल्लेख 'बेशरमाचे झाड' असा आपण करतो. पण त्यातही काही लोक बेशरमपणाची परिसीमा ओलांडणारे आपल्याला आजूबाजूला दिसतात; त्यांचा उल्लेख 'बेशरमाचा वृक्ष' असा व्हायला हवा आहे. असाच एक बेशरमाचा वृक्ष आपल्याला दुर्दैवाने आपल्या महाराष्ट्रातच आढळून आला आहे. तीन मोठमोठ्या फांद्या असलेल्या या बेशरमाच्या वृक्षाचे नाव आहे 'खेडकर कुटुंब...!' पूजा खेडकर ही या बेशरमाच्या वृक्षाची मुख्य फांदी असून तिचे वडील दिलीप आणि आई मनोरमा याही मुळीच लहान नसलेल्या फांद्या आहेत.

जसे बेशरमाचे झाड बेशरमसारखे वाढतच असते तसेच या देशात भ्रष्टाचाराचे आहे. तो संपतच नसतो. भ्रष्टाचाराचे झाड छाटा तरी ते संपत नाही, नष्ट तर मुळीच होत नाही. फक्त कुठे कमी तर कुठे जास्त एवढेच असते. या पूजा खेडकर नावाच्या बेशरमाच्या झाडाचा नव्हे वृक्षाचा आकार तर खूपच मोठा आहे. या झाडाला बेशरमपणाची, भ्रष्टाचाराची अनुवंशिक पृष्ठभूमी आहे. कशात काही नसताना आयएएसच्या रोपट्याला फक्त अंकुरच आला असताना पूजा खेडकरने घातलेला उधम म्हणजे बेशरमाचा वृक्षच म्हणता येईल. ही बाई आयएएस झाली खरी; पण तीसुद्धा खूप साऱ्या लांड्यालबाड्या करून...! खूप मोठा खोटारडेपणा करून आयएएस मिळवणाऱ्या या बाईला पहिली नियुक्ती मिळाली आणि तिच्यातील उपजत मग्रुरीला अंकुर नव्हे, तर धुमारेच फुटले, तेही पहिल्याच दिवसापासून. या पूजा खेडकरने आयएएस मिळवण्यासाठी खोटी, बनावट दिव्यांग प्रमाणपत्रे, धादांत खोटे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र, वेगवेगळी नावे दाखवून नियमांत बसत नसतानासुद्धा चक्क नऊ वेळा आयएएसची परीक्षा दिली. नियमांनुसार नऊ परीक्षा देण्याची मर्यादा संपली, पण ही बाई पासच झाली नाही. त्यामुळे स्वत:च्या नावात, आईवडिलांच्या नावात बदल करून तिने अवैधरीत्या परीक्षा दिली. परीक्षेचा अर्ज भरताना फोटो बदलणे, सही बदलणे, पत्ता बदलणे असले उद्योग केल्याचेही सिद्ध झाले आहे. यूपीएससीच्या नियमांत नऊ वेळा ही आयएएसची परीक्षा देता येते. पण या पूजा खेडकरने मोठ्ठी भामटेगिरी करून तब्बल बारा वेळा आयएएसची परीक्षा दिल्याचे उघड झाले आहे.

अनेक उटपटांग धंदे करून 'खरी' आयएएस मिळवणाऱ्या या पूजाबाईने पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात रुजू झाल्यानंतर उधम केला नसता तर सारेकाही 'अळीमिळी गुपचिळी' असे साधून गेले असते. पण तिने माज दाखवला आणि वासे फिरले. याच पूजाला ती मसुरीच्या लालबहादूर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमीतही गैरवर्तणुकीसाठी तब्बल आठ वेळा मेमो बजावण्यात आले होते. महाराष्ट्रात प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी म्हणून रुजू झाल्यानंतर राज्य प्रशासनाने तिची वर्तणूक पाहून पुण्यातून काही दिवसांतच तिला वाशीमला हलवले. दरम्यान, पूजा खेडकरचे एकूणच उद्योग प्रकाशझोतात आले. शेवटी राज्य प्रशासनाने तिला १६ जुलै २०२४ रोजी वाशीममधून कार्यमुक्त केले. वाशीमच्या अल्प मुक्कामात तिने तेथील ओबीसी बांधवांची दिशाभूल करून, 'मला ओबीसी असल्यामुळे नाहक त्रास दिला जात आहे' अशी भूमिका घ्यायला लावली होती. यूपीएससी प्रशासनाने या बाईला लगेचच अकादमीत हजर होण्याचे आदेश दिले. पण ती गेलीच नाही. नियमांनुसार संधी दिल्यानंतर अखेर ३१ जुलै २०२४ रोजी यूपीएससीने पूजा खेडकरची आयएएसच्या उमेदवारीपासून सारीच प्रक्रिया रद्द करून टाकली. या दणक्यासोबतच तिला पुढे अशी कोणतीही परीक्षा देण्यापासून कायमचे प्रतिबंधितही करून टाकले. ही पूजा मुळात डॉक्टर असून तिने २००७ मध्ये वैद्यकीय शिक्षण घेताना आपण तंदुरुस्त असल्याचा अहवाल दिला होता. हीच बाई पुढे दिव्यांग कशी झाली हा यूपीएससीला पडलेला प्रश्न आहे. त्यात अटक होऊ शकणार असल्याने बेपत्ता झालेल्या पूजा खेडकरची अखेर भारत सरकारनेही ७ सप्टेंबर २०२४ ला हकालपट्टी केल्याचा आदेश जारी केला आहे. त्यामुळे येती २०-२५ तरी वर्षे महाराष्ट्रातील प्रशासन आणि जनतेला पोखरू शकणारी ही पूजारूपी 'उधळी' सध्यातरी खरोखरच विकलांग झाली आहे, हे मात्र खरे. ■

९८८१७ १७८२९

कानोसा

अमोल पुसदकर

वक्फच्या मनमानीला लगाम

बिहारमधील फतूहाजवळ असलेले गोविंदपूर येथील नागरिक दहशतीत आहेत. कारण काय तर वक्फ बोर्डाने त्यांना गाव खाली करण्याचा आदेश दिलेला आहे. गोविंदपूरमध्ये ९५ टक्के लोक हिंदू आहेत. ते शेकडो वर्षांपासून तेथे राहत आहेत. परंतु वक्फचे म्हणणे आहे की, गावाच्या पाठीमागे एक मजार आहे आणि हे संपूर्ण गावच त्यांचे कब्रस्तान आहे. याबाबत स्थानीय प्रशासनाला गावकऱ्यांनी विचारले की, जमीन कोणाची आहे तर प्रशासनाने गावकऱ्यांच्या बाजूने निकाल दिला. पाटणा उच्च न्यायालयामध्ये जेव्हा हा खटला पोहोचला त्यावेळेस पाटणा उच्च न्यायालयाने सांगितले की, ही जमीन गावकऱ्यांची आहे. त्यांनी वक्फ बोर्डाला विचारले की, तुमच्याजवळ त्या जमिनीचे कागदपत्र आहेत का? तर, वक्फ बोर्ड म्हणाले की, पूर्वी वक्फ म्हणजे धर्माच्या नावाने जमीन तोंडी दान दिली जायची. सर्व जमिनीची कागदपत्रे दाखविणे शक्य नाही. फक्त आम्ही म्हणतो आहे म्हणून ही जमीन वक्फ बोर्डाची आहे, असे तुम्ही मान्य करा. म्हणून आता नवीन विधेयकामध्ये तोंडी वक्फवर बंदी घालण्यात आलेली आहे. जो काही व्यवहार करायचा तो कायदेशीर करावा लागेल. दान देणाऱ्याला त्याची सगळी कागदपत्रे सादर करीत ती जमीन वक्फ बोर्डाला द्यावी लागेल. वक्फला सर्व कायदेशीर प्रक्रिया करूनच ती जमीन त्यांच्या नावावर करून घेता येईल. सर्वप्रथम १९५४ मध्ये भारताच्या संसदेत वक्फ कायदा पारित करण्यात आला व त्यामध्ये १९९५ मध्ये सुधारणा करून वक्फ बोर्डाला अमर्यादित अधिकार देण्यात आले. २०१३ मध्ये पुन्हा या कायद्यात संशोधन करून हे अधिकार पुन्हा वाढविण्यात आले.

तामिळनाडूमधील एक गाव तिरुचेंदुराई जिथे सुमारे ११०० वर्षांपासून हिंदू समाजाची वस्ती आहे. जेव्हा त्यातील एका व्यक्तीने त्याची जमीन विकण्याचा प्रयत्न केला तर वक्फ बोर्डाने त्यावर आक्षेप घेतला व त्यांना म्हटले की, हे सर्व गाव ही वक्फची जमीन आहे. गुजरातमधील द्वारकेजवळ असलेल्या एका शेतजमिनीवर वक्फ बोर्डाने आपला अधिकार सांगितला. शेतमालक म्हातारा असल्यामुळे तो त्याच्या शेतजमिनीवर जाऊन बघू शकत नव्हता. तिथे लोकांनी एक मजार उभारली व काही दिवसांनी त्यांनी ही संपूर्ण जमीन वक्फची आहे, असे घोषित केले.

गोविंदपुरातील गावकरी असो वा तामिळनाडूतील गावकरी किंवा मग गुजरातमधील हा शेतकरी; हे सगळेच लोक जेव्हा न्यायालयात पोहोचले त्यावेळेला न्यायालयाने वक्फ बोर्डाला जमिनीची कागदपत्रे मागितली. त्यावर वक्फ बोर्ड म्हणतो की, आमच्याजवळ कागदपत्र नसले तरीही जमीन आमची आहे. असे ८५ हजार खटले देशभरातील विविध न्यायालयात सुरू आहेत. लोकांच्या जमिनी बळकावणे, ही गुंडगिरी आहे. हा जमीन जिहादचा एक प्रकार आहे.

वास्तविक पाहता इस्लाम जेव्हा भारतात आला त्यावेळेला आमच्या देशातील अनेक राजांनी त्यांना मशिदी उभारायला जमिनी दिल्या. त्यावेळेस त्याची दानपत्रे केली जायची. त्यामुळे वर्षानुवर्ष ती जमीन अमक्याला दान दिली होती, हा उल्लेख असायचा. तोंडी केलेला हा वक्फ म्हणजे धर्माकरिता दान केलेली वस्तू व संपत्ती म्हणजे वक्फ बोर्डाची शुद्ध बनवाबनवी आहे. भारतामध्ये जवळपास नऊ लाख एकर एवढी मोठी जमीन वक्फ बोर्डाजवळ आहे.

आजपर्यंत वक्फ बोर्डासाठी आम्ही करू तो कायदा अशा पद्धतीचे वातावरण होते. कोणाच्याही जमिनीला ते रातोरात ती वक्फची मालमत्ता आहे, असे घोषित करू शकायचे. परंतु, केंद्र सरकारने मागील महिन्यात जे नवीन वक्फ संशोधन विधेयक आणलेले आहे त्यामध्ये मात्र तोंडी वक्फवर बंदी घालण्यात आलेली आहे. यानंतर जी जमीन वक्फ म्हणेल की आमची आहे, त्या संदर्भातील कागदपत्रे वक्फ बोर्डाला सादर करावी लागतील. कुठलीही नवीन जमीन वक्फ बोर्डामध्ये घेताना त्यासंबंधीची रीतसर नोंदणी जिल्हा मॅजिस्ट्रेटच्या कार्यालयात करावी लागणार आहे. पूर्वी ज्याची जमीन घेतली जायची त्याला कुठलीही सूचना म्हणजे नोटीस न देता ही जमीन घेतली जायची. अनेक वर्षांनंतर त्याला समजायचे की त्याची जमीन ही वक्फ बोर्डाने घेतलेली आहे. परंतु आता तसे चालणार नाही.

भारतामध्ये सगळ्यात जास्त जमिनी या संरक्षण मंत्रालय, त्यानंतर रेल्वे मंत्रालय व त्यानंतर वक्फ बोर्डाच्या आहेत. यावरून आपल्या लक्षात येईल की, वक्फनी किती मोठे साम्राज्य उभारलेले आहे. अनेक ठिकाणी तर रेल्वेच्या जमिनीसुद्धा यांनी वक्फ दाखविलेल्या आहे. पूर्वीच्या नियमानुसार जर कोणाला न्याय मागायचा असेल तर त्याला व वक्फ ट्रिब्युनलमध्ये जावे लागत होते. यामध्ये वक्फचाच माणूस न्यायनिवाडा करण्यासाठी असायचा. बोर्डाच्या सदस्यांमध्ये महिलांचे कोणतेही स्थान नव्हते. त्यामुळे आता नवीन नियमानुसार किमान दोन महिला सदस्य या बोर्डामध्ये असणार आहेत. दोन सदस्य गैरमुस्लिम असावे, असेही नवीन विधेयकात म्हटलेले आहे. शिया, बोहरा व मागासवर्गीय मुस्लिमांना वक्फ बोर्डात स्थान देण्यात येणार आहे. बोहरा व आगाखानी मुस्लिमांसाठी वेगळ्या वक्फ बोर्डाची स्थापना करण्याची परवानगी हे विधेयक देते. वक्फ बोर्डाच्या बेबंदशाही कारभारावर भाष्य करताना न्यायालयाने म्हटले होते की, उद्या तुम्ही ताजमहाल व लाल किल्ला यांनाही वक्फची मालमत्ता घोषित कराल. पूर्वी सरकारी जमिनींना वक्फची मालमत्ता घोषित करण्याचा अधिकार बोर्डाजवळ होता. परंतु, आता त्यांना तसे करता येणार नाही. आता त्यांना प्रत्येक संपत्तीच्या संबंधातील कागदपत्रे सादर करावी लागणार आहेत व स्थानिक जिल्हाधिकाऱ्यांना निर्णय करण्यासंबंधीचे अधिकार देण्यात आलेले आहे. पूर्वी एखादी संपत्ती वक्फ आहे किंवा नाही हे ठरविण्याचा अधिकार बोर्डाला होता. परंतु नवीन विधेयकानुसार हा अधिकार त्यांना राहणार नाही. वक्फचे सर्वेक्षण करण्याचा अधिकार आता जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आलेला आहे. पूर्वी वर्क ट्रिब्युनलचा निर्णय अंतिम राहत होता. त्याच्या विरोधात न्यायालयात जाण्याची अनुमती नव्हती. परंतु आता वर्क ट्रिब्युनलचा निर्णय मान्य नसल्यास ९० दिवसांच्या आत उच्च न्यायालयात अर्ज दाखल करता येऊ शकतो. नवीन विधेयकानुसार केंद्र सरकारला वक्फ बोर्डाचे अंकेक्षण म्हणजे ऑडिट करण्याचा अधिकार प्रदान करण्यात आलेला आहे.

या विधेयकाला विरोध करणाऱ्या लोकांना या विधेयकामुळे पोटशूळ झालेला आहे. अब्जावधी रुपयांची संपत्ती आजपर्यंत वक्फ बोर्ड गिळंकृत करून बसलेले आहे. त्यांच्या घशातून त्या बाहेर काढण्याचा एकमात्र मार्ग हा १९९५ च्या या वक्फ बोर्ड अधिनियमामध्ये संशोधन करणे हा आहे. आज जरी हे विधेयक जेपीसीकडे पाठविण्यात आलेले असले तरीही उद्या हे पारित होईल, अशी आशा करूया. सरकार

CMYK

धाराशिव
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

लोकमंगल माऊली कारखान्याचे रोलर पुजन संपन्न

तभा वृत्तसेवा
लोहारा, दि.१६ सप्टेंबर -
लोहारा तालुक्यातील लोहारा (खुर्द) येथील लोकमंगल माऊली इंडस्ट्रीज लिमिटेड या कारखान्याचे हंगाम सन २०२४-२५ करीताचे रोलर पुजन दि.१५ सप्टेंबर रोजी हभप. महेश महाराज माकणीकर व कारखान्याचे संचालक प्रशांतजी पाटील यांच्या हस्ते संपन्न झाला.

यावेळी वरिष्ठ सर व्यवस्थापक छगन भोगाडे, पंचक्रोशीतील शेतकरी बांधव, ऊस तोडणी वाहतूक ठेकेदार, यांच्यासह मान्यवर विभाग प्रमुख व कर्मचारी बांधवांच्या उपस्थित होते.

लाडक्या बाप्पाला निरोप; गणेश विसर्जन मिरवणुकीसाठी पुरेसा पोलीस बंदोबस्त तैनात...

धाराशिव जिल्ह्यात १९९ गणेश मूर्तींचे आज विसर्जन

जिल्हा पोलीस अधीक्षक संजय जाधव यांची माहिती...

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१६ सप्टेंबर -
धाराशिव जिल्ह्यात यावर्षीच्या गणेशोत्सवात एकूण १४८५ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी गणेश मूर्तींची प्रतिष्ठापना केली होती त्यापैकी ४१० गणेश मूर्तींचे विसर्जन झाले असून अनंत चतुर्दशीच्या दिवशी ९९९ गणेश मूर्तींचे विसर्जन होणार आहे. यासाठी जिल्हा पोलीस दलाने पुरेसा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे, अशी माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक संजय जाधव यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

गणेश विसर्जना दरम्यान ईद-ए-मिलाद जुलूस काढण्यात येणार नसून धाराशिव, नळदुर्ग शहर, लोहारा आणि कळंब येथे १९ सप्टेंबर रोजी तर परंडा येथे १८ सप्टेंबर रोजी जुलूस मिरवणुका काढण्यात येणार आहेत.

ईद-ए-मिलाद आणि गणेशोत्सव शांततेत पार पाडण्यासाठी जिल्हा पोलीस दलाने गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांसोबत ४२१ बैठका, शांतता कमिटीच्या २१८ बैठका, मोहल्ला समितीच्या, १६१ बैठका तसंच इतर विभागांच्या ५४ बैठका घेऊन जिल्ह्यातील सण उत्सव शांततेत आणि वातावरणात पार पडावे या दृष्टीने प्रयत्न केले असून यादरम्यान १५८६ गुंड उपद्रवी समाजकंटक व गुन्हेगारी वृत्तीच्या इसमाविरुद्ध विविध कायद्याप्रमाणे प्रतिबंधात्मक कारवाया करण्यात आले आहेत. मिरवणुकांवर लक्ष ठेवण्यासाठी पोलीस विभागाकडून ड्रोन कॅमेराचा पहिल्यांदाच वापर करण्यात येणार असून नागरिकांनी पोलिसांना सहकार्य करून सण उत्सवाचा आनंद घ्यावा, असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक संजय जाधव यांनी पत्रकार परिषदेत केले. या पत्रकार परिषदेत बोलताना जाधव पुढे म्हणाले की, धाराशिव जिल्ह्यात गणेशोत्सव आणि ईद-ए-मिलाद हे दोन्हीही सामाजिक उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी जिल्हा पोलीस दलाने उपविभागीय अधिकारी स्तरावरील पाच अधिकारी वीस पोलीस निरीक्षक ४७ पोलीस उपनिरीक्षक १३५० पोलीस कर्मचारी, दोन दंगल नियंत्रण पथक दोन जलद प्रतिसाद पथक तसेच राज्य राखीव दलाची एक तुकडी याशिवाय स्ट्राइकिंग फोर्स याची तीन पथके आणि उपविभागीय अधिकारी स्तरावरील पाच पथके सोबतच ७७० होमगार्ड या बंदोबस्तासाठी असणार आहेत.

श्री गणेश विसर्जन आणि ईद-ए-मिलाद अनुषंगाने नागरिकांनी एकमेकांच्या धार्मिक परंपरा आणि रीती रिवाजांचा आदर करून सौहार्दपूर्ण वातावरणात सण उत्सव शांततेत पार पाडावेत, नागरिकांनी अफवांवर आणि सोशल मीडियावर प्रसारित होणाऱ्या संदेशावर विश्वास न ठेवता सण उत्सव शांततेत पार पाडावेत यादरम्यान डीजे अथवा मोठ्या आवाजाच्या स्पीकर लावू नये, गणेश विसर्जन मिरवणुका दिलेल्या वेळेत आणि त्यापूर्वीच संपवाव्यात, मिरवणुकीमध्ये गुलाला ऐवजी फुलांच्या पाकळ्यांचा वापर करावा, श्री गणेश विसर्जन मिरवणुका डीजे डॉल्बी व दारूमुक्त साजरा कराव्यात, असे आवाहन पोलीस अधीक्षकांनी यावेळी केले.

प्लाजमा बिमलाईट, लेझर बीम लाईटला बंदी...

मिरवणूकीदरम्यान प्लाजमा बिमलाईट आणि लेझर बीम लाईटचे प्रखर प्रकाशामुळे मिरवणुकीमध्ये सहभागी झालेले आणि मिरवणूक पाहण्यास आलेले लहान मुले, वयोवृद्ध, ज्येष्ठ नागरिक, सामान्य नागरिक यांच्या डोळ्यास इजा होऊन त्यांचे आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे धाराशिवच्या जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी अशा लाईट वापर करण्यास मनाई केली आहे. गणेश मंडळाच्या अध्यक्ष आणि पदाधिकाऱ्यांनी प्लाजमा भीम लाईट आणि लेझर बीम लाईट चा वापर करू नये अन्यथा सक्त कारवाई करण्याचा इशाराही जिल्हा पोलीस अधीक्षकांनी या पत्रकार परिषदेत दिला.

भटके विमुक्त विकास प्रतिष्ठानच्या अध्यक्षपदी काळे यांची निवड

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१६ सप्टेंबर -
भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान (यमगरवाडी सोलापूर) च्या कार्यकारी मंडळाची बैठक नुकतीच पुणे येथे संपन्न झाली. भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान मार्फत यमगरवाडी येथे भटके मुक्त समाजाकरिता निवासी शाळा प्रकल्प चालवला जातो. तसेच महाराष्ट्रा मध्ये विविध जिल्ह्यातभटक्या विमुक्त समजाकरिता सामाजिक उपक्रम तसेच पालावरच्या शाळा चालविल्या जातात.

पुणे येथील बैठकीमध्ये नाशिक येथील सामाजिक कार्यकर्ते उद्धव काळे यांची भटके विमुक्त विकास प्रतिष्ठानच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली.

प्रतिष्ठानचे उपाध्यक्षपदी धाराशिव येथील सुप्रसिद्ध बालरोग तज्ञ डॉ. अभय शहापूरकर यांची नियुक्ती करण्यात आली. नवनियुक्त कार्यकारिणी खालील प्रमाणे उद्धव काळे अध्यक्ष, डॉ. अभय शहापूरकर उपाध्यक्ष, विवेक अयाचित कार्यवाह (लातूर), नरेश पोटे (मुंबई) कोषाध्यक्ष, तसेच सदस्य पदी परेशशकांत मांगलिक (मुंबई), अभय कुलकर्णी (पुणे), संतोष शिर्के (सोलापूर), विजय गिजर (पुणे), अशोक संकलेचा (सोलापूर), डॉ. संजय पुरी (परतूर), गोविंद जी पुरोहित (मुंबई), पर्णाद मोकाशी (मुंबई), ॲड. प्रदीपसिंग राजपूत (सोलापूर), डॉ. प्रणिता गडेकर (तुळजापूर), ॲड. जनक पाटील (तुळजापूर) यांची प्रतिष्ठानच्या संचालक पदी नियुक्ती करण्यात आली.

युवकाने साकारलाय गणपतीसमोर शेतकरी राजाचा देखावा

तभा वृत्तसेवा
नळदुर्ग, दि.१६ सप्टेंबर -
नळदुर्ग येथील सुजय सुधीर विश्वास या युवकांने आपल्या घरातील गणपतीसमोर शेतकरी राजा हा शेतकऱ्यावरील अतिशय सुंदर असा देखावा सादर केला आहे. या देखाव्याच्या माध्यमातुन सुजय विश्वास याने कितीही संकटे आली तरी शेतकरी हा राजाच असतो हे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

सुजय सुधीर विश्वास हा युवक मुळचा पश्चिम बंगाल राज्यातील आहे. मात्र सध्या याचे कुटुंब नळदुर्ग शहरात स्थायिक झाले आहे. गणेशोत्सवात दरवर्षी आपल्या घरातील गणपतीसमोर सुजय हा वेगवेगळ्या ज्वलंत विषयांवर देखावे सादर करतो. गेल्या दहा वर्षात सुजय विश्वास यांने आपले वडील, आई व पत्नीच्या सहकार्याने वेगवेगळ्या विषयांवर वेगवेगळे देखावे सादर केले आहेत. याबद्दल त्याला अनेक पुरस्कारही मिळाले आहेत. यावर्षी सुजय विश्वास याने आपल्या घरातील गणपतीसमोर शेतकरी राजा हा देखावा अतिशय सुंदरपणे सादर केला आहे. शेतकरी व शेतकऱ्यांचे जोडधंदे काय, काय असतात हे दाखविण्याचा प्रयत्न सुजयने देखाव्यातुन केला आहे. हा देखावा पाहण्यासाठी दररोज नागरीक विशेषता महिला मोठी गर्दी करत आहेत.

मराठवाडा मुक्ती संग्राम दिन विशेष...

मराठवाडा मुक्ती संग्रामात लढले आलुरचे वसंतराव बळीराम पोतदार...

मराठवाडा मुक्ती संग्रामात आलुर येथील स्वातंत्र्य सैनिकांचा देखील सहभाग होता.

आलुर हे गाव मराठवाड्यातील महाराष्ट्राच्या अगदी टोकाचे महाराष्ट्र कर्नाटक सिमेवरील गाव आहे आणि या गावच्या अगदी जवळच भारतीय सेनेची व निजाम सरकारच्या चौक्या होत्या. जाता येता रझाकारांचे अत्याचार व लुट आलुर व परिसरातील गावांमध्ये होत होती अशांमध्येच आलुरपासुन वीस किलोमीटरवर असलेल्या नंदगाव गावातील रझाकारांनी केलेल्या जाळपोळीच्या घटनेमुळे दहशत होती. या काळात आलुर येथील स्वातंत्र्य सैनिक देवेंद्र कासार, शिवराया भालके, निलप्पा बोळदे, वसंतराव पोतदार, खंडेराव इंगळे या स्वातंत्र्य सैनिकांनी कुणी भुमिगत तर कुणी प्रत्यक्षपणे स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. चळवळीत कोण काम करेल त्यांना रझाकार त्रास देत असत म्हणुन ते भुमिगत पणे स्वातंत्र्य लढ्यात काम असत. मराठवाडा मुक्ती संग्राम चळवळ चालू असताना पत्री सरकारमध्ये सक्रिय सहभाग असलेले क्रांतिसिंह नाना पाटील यांनी आलुरला भेट दिली होती आणि त्यांचे मार्गदर्शन आम्हाला मिळाले, आम्ही भुमीगतपणे सैन्याला बित्तंबातमी पुरवायचो असे मत वसंतराव पोतदार व्यक्त केले. आम्ही काम करत असताना भविष्यात आम्हाला शासनाकडून काही मिळेल या भावनेने कधीच काम केले नाही असेसुद्धा त्यांनी सांगितले.

जलतरण स्पर्धेत आश्वेता मराठवाड्यात तिसरी

तभा वृत्तसेवा
नळदुर्ग, दि.१६ सप्टेंबर -
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने घेण्यात आलेल्या मराठवाड्यातील महाविद्यालयीन जलतरण स्पर्धेमध्ये नळदुर्ग येथील कला. विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील बी.एस.सी. प्रथम वर्षात शिकत असलेले आश्वेता शिवाजी गायकवाड यांनी मराठवाड्यात तिसरा क्रमांक मिळवला आहे.

दि.१५ सप्टेंबर रोजी आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते सत्कार करून तीचा गौरव करण्यात आला आहे.

यावेळी शहर भोई समाजाचे अध्यक्ष सुनील उकंडे, नय्यर जहागिरदार, विलास पुदाले, पाडुरग पुदाले, सुशांत भुमकर, पद्माकर घोडके, दिपक डुकरे, धिमाजी घुगे, सतोष पुदाले, एस.के. बागवान, शतनु डुकरे उपस्थित होते.

एक हजार विद्यार्थ्यांना घडविले तारांगण दर्शन; श्री माऊली तरुण गणेश मंडळाचा उपक्रम

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१६ सप्टेंबर -
शहरातील माऊली चौक येथील श्री माऊली तरूण गणेश मंडळाच्यावतीने यंदा वेगवेगळ्या शाळांतील एक हजार विद्यार्थ्यांना आकाशातील गृह, तारांगणाचे दर्शन घडविण्यात आले. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना खगोलशास्त्राची माहिती देण्यात आली. त्यामुळे विद्यार्थ्यांमधील अंधश्रध्दा कमी होवून वैज्ञानिक दृष्टिकोन रूजविण्यास मदत होणार आहे.

धाराशिव प्रशालेत शनिवार, १४ सप्टेंबर रोजी सकाळी या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक माढेकर, पत्रकार उपेंद्र कटके, बाबुराव चव्हाण, शितल वाघमारे, धाराशिव प्रशालेचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. मागील तीन दशकांपासून श्री

माऊली तरूण गणेश मंडळाच्यावतीने दरवर्षी विविध सामाजिक, वैज्ञानिक उपक्रमांचे आयोजन केले जाते.

यंदा विद्यार्थ्यांमध्ये खगोलशास्त्रातील विविध संकल्पना, अवकाशातील ग्रह, तारे, ग्रहण, सूर्यमंडळ यांची माहिती थ्रीडी तंत्रज्ञानामध्ये उभारलेल्या डोममध्ये दाखविण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी पोलाद या कंपनीच्या सहकार्याने विविध शाळांतील एक हजार विद्यार्थ्यांना मंडळाच्यावतीने मोफत तारांगण राबविण्यात आले.

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी मंडळाचे अध्यक्ष नितीन किशोर मुंडे, उपाध्यक्ष अनिल बाळासाहेब मुंडे, सचिव ॲड. मंगेश गाजरे, कोषाध्यक्ष विनोद मुंडे, रवि मुंडे, संताजी मुंडे, कार्याध्यक्ष अभिजीत मुंडे, प्रथमेश पाटील, हरिओम मुंडे, वैभव प्रवीण मुंडे, सुनील मुंडे, प्रशांत मुंडे यांनी परिश्रम घेतले.

महायुती सरकार महिला शेतकरी युवक यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी : मुख्यमंत्री शिंदे

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१६ सप्टेंबर -
कांदा निर्याती संदर्भात मोठा निर्णय आम्ही घेतला असून जे निर्यात शुल्क रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. कांद्यावरची निर्यात बंदी उठवल्याबद्दल आपण केंद्र शासनाचे आभार मानतो. सोयाबीन वरील आयात शुल्क वाढवले आहेत. त्यामुळे सोयाबीनला चांगला भाव मिळेल. शेतकऱ्यांच्या वीजेचं बील माफ करण्याचा निर्णय महायुती सरकारने घेतला असून शेतकऱ्यांना १ रुपयात पीक विमा प्रिमीअम भरण्याचा निर्णय घेतला आहे.राज्यातील शेतकऱ्यांना केंद्र सरकारचे ६ हजार रुपये आणि राज्य सरकारचे ६ हजार रुपये असे १२ हजार रुपये महायुती सरकार देवून शेतकऱ्यांचा सन्मान करत आहे. राज्यात महायुतीचे सरकार आल्यामुळे विकास कामांना गती मिळाली आहे हे सरकार महिला युवक शेतकरी कष्टकरी कामगार आणि सर्वसामान्यांसाठी काम करणारे सरकार असून महायुती सरकारने राबवलेल्या योजना शिवसैनिक पदाधिकारी यांनी प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवण्यासाठी काम करावे. जेवढ्या योजना आम्ही सुरू केल्या तेवढ्या योजना कायम सुरूच राहतील असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी धाराशिव येथे शिवसेना मेळाव्यात केले.

यावेळी व्यासपीठावर आमदार ज्ञानराज चौगुले, जिल्हा संपर्कप्रमुख अनिल खोचरे, जिल्हा संघटक सुधीर पाटील, जिल्हाप्रमुख सुरज साळुंखे, नितीन लांडगे, अजित लाकाळ, शिवसेना जिल्हाप्रमुख मोहन पनुरे आणि शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री शिंदे पुढे म्हणाले की, आम्हाला बहिणींना लखपती झालेले बघायचे आहे. लाडकी बहीण, लाडका भाऊ, जेष्ठ मंडळी व विद्यार्थी शेतकरी सर्वांचे हे सरकार आहे. मुलींचे शिक्षण मोफत केले आहे. सरकारने मुलींना उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलीची १०० टक्के फी भरण्याचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्राला उद्योग व्यवसायात आम्ही अव्वल केले आहे. ५४ टक्के वाटा महाराष्ट्राचा आहे. तुम्ही बळ दिले तर दीड हजाराची रक्कम दोन हजार, अडीच हजार करू ही रक्कम वाढत जाईल. लाडक्या भावांसाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरू केली आहे. लाडक्या भावासाठी मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजना आणली आहे. सुशिक्षित बेरोजगारांना महिन्याला त्यांना मानधन देण्याची व्यवस्था केली आहे. अशा प्रकारची व्यवस्था भावांसाठी करणारी देशातले हे पहिले शासन आहे. तीन सिलेंडर मोफत देणारी योजना सुरू केली आहे. लेक लाडकी योजना सुरू केली आहे. भगिनींना एसटीमध्ये ५० टक्के सवलत दिली आहे. ५० टक्के सवलत दिल्यामुळे आता महिलांची सोय झाली आहे. लेक लाडकी योजना मुलींसाठी सुरू केली. महिलांना एस टीच्या प्रवासात ५० टक्के सवलत देत आहे.

या शिवसेना पदाधिकारी मेळाव्यात धाराशिव शहरातील लिंबराज डुकरे मित्र मंडळाच्या सर्व शाखा प्रमुखांनी आणि स्वतः लिंबराज डुकरे यांनी मुख्यमंत्र्यांचे हस्ते शिवसेनेत प्रवेश केला.

या शिवसेना मेळाव्याचे प्रास्ताविक सुधीर पाटील यांनी केले. त्यात त्यांनी येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत कळंब-धाराशिव विधानसभा मतदारसंघातून शिवसेनेचा कोणताही उमेदवार निवडून आणण्यासाठी निर्धार करण्याचे आश्वासन दिले. तसेच आगामी काळात धाराशिव जिल्ह्यात शिवसेनेची ताकद वाढवण्यासाठी आणि सरकारच्या योजना घरोघरी जाऊन पोहोचवण्यासाठी शिवसैनिकांनी काम करण्याचे आवाहन त्यांनी केले.

संक्षिप्त वृत्त...

आ. पाटील यांनी केली त्रिविक्रम मंदिराची पहाणी

तेर, दि.१६ सप्टेंबर -
धाराशिव तालुक्यातील तेर येथील पुरातन त्रिविक्रम मंदिराची आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी १५ सप्टेंबरला पहाणी केली. राज्यात सर्वात पुरातन असलेले त्रिविक्रम मंदिर असून गर्भगृहाच्या समोरील लाकडी मंडप पडण्याच्या स्थितीत होता. आ. पाटील यांनी यांची दखल घेऊन सांस्कृतिक विभागाच्या वतीने दोन कोटी नव्वद लाख रुपये निधी मंजूर केला आहे. पुरातत्व विभागाच्या वतीने त्रिविक्रम मंदिराच्या गतवैभवास प्रारंभही झालेला असून आ. पाटील यांनी वामन जयंती निमित्ताने त्रिविक्रम मंदिरास भेट देऊन दर्शन घेतले व मंदिर कामाची पहाणी केली. यावेळी श्री संत गोरोबा काका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष पद्माकर फंड, उपसरपंच श्रीमंत फंड, नवनाथ नाईकवाडी, विठ्ठल लामतुरे, अजित कदम, संजय धाकपाडे, विजयकुमार बडवे, कल्याण कानडे, बाळकृष्ण बडवे, अभिजित करंडे, अर्शाद मुलांनी आदी उपस्थित होते.

दहिटणा ग्रामपंचायत उपसरपंचपदी माधुरी पाटील यांची बिनविरोध निवड

जळकोट, दि.१६ सप्टेंबर -
तुळजापूर तालुक्यातील दहिटणा ग्रा.पं.च्या उपसरपंचपदी माधुरी पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली. याप्रसंगी सरपंच शिवकांता कांबळे, विस्तार अधिकारी आगतराव कावळे, ग्रामसेवक मोकाशी, आप्पासाहेब पाटील, सोमनाथ गुड्डे, संजय कदम, शंकर कांबळे, केरणाथ वाघमारे, शंकर चव्हाण, परमेश्वर कांबळे, राजेंद्र नागरसे, राजेंद्र कदम, सुभाष पाटील, नंदकुमार पाटील, विश्वनाथ कुंभार, श्रीपती पाटील, हनुमंत बिराजदार, सिद्धाराम पाटील, प्रशांत पाटील, रोहित नागरसे, सागर सुरवसे, मेजर गोकुळ वाघमारे यांच्या ग्रामस्थ उपस्थित होते.

शासकीय तंत्र प्रशालेत संविधान मंदिर उद्घाटन सोहळा

धाराशिव, दि.१६ सप्टेंबर -
धाराशिव जागतिक लोकशाही दिनानिमित्त आज दि.१५ सप्टेंबर रोजी महाराष्ट्रातील औद्योगिक प्रशिक्षण संस्था व शासकीय तंत्र प्रशालेत संविधान मंदिराचे उद्घाटन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या हस्ते (अभासी पध्दतीने) करण्यात आले. शासकीय तंत्र प्रशाला केंद्र, धाराशिव येथील संविधान मंदिराचे उद्घाटन धाराशिव जिल्हा व्यवसाय व शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी प्रवीण जे. औताडे यांच्या हस्ते व प्रमुख पाहुणे अविनाश पोफळे यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. यावेळी धाराशिव नगरीतील ज्येष्ठ नागरीक माने, देशमुख, जाधव आणि धाराशिव प्रशिक्षण तथा अनुषंगिक सुचनाकेंद्राचे का. अधिक्षक एम.जी.पिसे यांची उपस्थिती होती. सदरील कार्यक्रमास शासकीय तंत्र प्रशाला, केंद्र धाराशिव व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय धाराशिव येथील सर्व कर्मचारी सहभागी झाले होते. तसेच विविध शाळामधील विद्यार्थी देखील उपस्थित होते.

बावी आश्रमशाळा कबड्डी स्पर्धेत धाराशिव तालुक्यात अव्वल

धाराशिव, दि.१६ सप्टेंबर -
जय हिंद विद्यालय तडवळे येथे दि.१३ व १४ सप्टेंबर रोजी शालेय तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा संपन्न झाल्या. यामध्ये वसंत प्राथमिक आश्रमशाळा बावी मुले वय वर्षे १४ गटातील विद्यार्थ्यांनी प्रतिस्पर्धी संघ जय हिंद विद्यालय तडवळे यांच्यावर अंतिम सामन्यांमध्ये १२ गुणांनी विजय मिळवून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र झाला. त्याचबरोबर १९ वर्षे मुले वयोगटाच्या अंतिम सामन्यात जवाहर कनिष्ठ महाविद्यालयाचा संघ प्रतिस्पर्धी येडशीच्या संघावर तब्बल २३ गुणांनी विजय मिळवून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र झाला. त्याचबरोबर १४ वर्षे वयोगटामध्ये मुलींचा संघ द्वितीय आला. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष विदयानंद राठोड, प्राचार्य दयानंद राठोड यांनी अभिनंदन केले. या विजयासाठी कृष्णा राठोड, धिरज राठोड, अभिजित राठोड, अमर राठोड, या विद्यार्थ्यांनी चमकदार कामगीरी केली.

समग्र मागोवा

अर्जुनसिंगांच्या निवेदनातील दुसरा बिंदू असा की, गांधीजी आणि गोळवलकर यांच्या आदर्शांमध्ये मूलभूत फरक आहे. तो फरक कोणता, हे त्यांनी सांगितले पाहिजे. गोळवलकरांनी नित्य 'राष्ट्रा'चीच गोष्ट केली. 'राज्याची' नाही. शहाण्या माणसांना तरी 'राष्ट्र' आणि 'राज्य' यातला फरक कळला पाहिजे. गोळवलकरांनी 'पंथीय राज्य'चा पुरस्कार केला, याचा पुरावा देणारे एक तरी वाक्य अर्जुनसिंगांनी दाखवून द्यावे. रा. स्व. संघ, हिंदू राष्ट्राचे ध्येय घेऊन उभा आहे, हे जगजाहीर आहे. त्याने ते लपविलेले नाही. त्याचबरोबर त्याने हिंदूची व्याख्या आणि परिभाषाही केली आहे. त्याला 'हिंदू' या शब्दात कोणत्याही संकुचिततेचा, सांप्रदायिकतेचा गंध येत नाही, जसा स्वामी विवेकानंदांना आला नाही. ज्यांना तो येतो, त्यांनी खुशाल त्या शब्दाचा परित्याग करावा. स्वत:ला मुस्लिम म्हणवून घ्यावे अथवा ख्रिस्ती, अथवा अज्ञेयवादी अथवा सेक्युलर. आमची त्याला हरकत नाही.

संघ आणि काँग्रेस

गुजरात सरकारने, सरकारी नोकरांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमात भाग घेण्यावर प्रतिबंध असणारा नियम दूर केल्याच्या क्षणापासून सुरू झालेला विवाद संपलेला नाही. प्रधानमंत्री अटलबिहारी वाजपेयी आणि गृहमंत्री लालकृष्ण अडवाणी यांची स्पष्टीकरणे प्रकाशित झाल्यानंतरही विवाद चालूच आहे. राष्ट्रपती के. आर. नारायणन् यांच्याकडे काँग्रेस पक्षाने काही विचारणा केली होती. ते पत्र त्यांनी प्रधानमंत्र्यांकडे पाठविले. प्रधानमंत्री म्हणाले की, राष्ट्रपतींचे समाधान होईल, असे उत्तर त्यांच्याकडे पाठविले जाईल. परंतु, त्या उत्तराने, समजा राष्ट्रपतींचे समाधान झाले, तरी काँग्रेसचे समाधान होईल, असे नाही. कारण, समाधान करून घेण्यासाठी काँग्रेसने राष्ट्रपतींकडे तक्रार केलीच नाही. काँग्रेसनेत्यांचा उद्देश, मरू घातलेल्या आपल्या पक्षाला, या निमित्ताने जीवदान प्राप्त करून देण्यासाठी, आंदोलन उभे करण्याचा आहे. संघ या आंदोलनाचे स्वागत करील. पण एक अट आहे. काँग्रेसने खरे बोलले पाहिजे. जे आहे ते सांगितले पाहिजे. त्यांनी आपल्या मनात गेल्या पाऊणशे वर्षांपासून जे पूर्वग्रह कुरवाळून ठेवले आहेत आणि 'ते म्हणजेच सत्य आणि बाकी सारे असत्य' हा जो भाव त्यांच्या मनात त्यांनी ठसवून ठेवला आहे, त्याचा निरास त्यांनी केला पाहिजे. असे ते करतील, तर त्यांच्या आंदोलनाला काही तात्त्विक आधार मिळू शकेल. अन्यथा, 'एक उठवळ आंदोलन' याशिवाय, त्याला किंमत राहणार नाही.

खरे बोला

काँग्रेसचे वरिष्ठ नेते अर्जुनसिंग यांचे एक निवेदन, आजच्या काही वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित झाले आहे. त्यांनी प्रश्न केला आहे की, लोकांसमोर पर्याय हाच आहे की, राष्ट्राने गांधीजींचा आदर्श मानावा की मा. स. गोळवलकर यांचा? अर्जुनसिंगांच्या प्रश्नात अंतर्हित मुद्दे दोन आहेत. एक हा की, त्यांचा पक्ष गांधीजींच्या आदर्शानुसार चालला आहे. एवढेच नव्हे, तर सुमारे ४५ वर्षे त्यांच्या पक्षाने जे राज्य केले, ते गांधीजींच्या आदर्शानुसार केले. आम्हाला वाटते, काँग्रेसच्या या दाव्याचा एकदा सोक्षमोक्ष झाला पाहिजे. गांधीजींना राजकारण व धर्म यांची फारकत मान्य नव्हती. अर्जुनसिंगांपासून तो दिग्विजयसिंगांपर्यंत कुणीही सांगावे, हे खरे की खोटे? मी गांधीजींची शंभर वचने उद्धृत करू शकेन आणि दाखवून देईन की, गांधीजींना राजकारण धर्मानुकूल हवे होते. काँग्रेसने राजकारण धर्मानुकूल केले, असा दावा काँग्रेसवाले करू शकतात? गांधीजींनी एकदाही समाजवादी राज्याची कल्पना अंगीकारली नाही. गांधीजींना 'समाजवाद' शब्द माहीत नव्हता? १९१७ पासूनच त्या शब्दाचे चलनमूल्य वाढले होते. पण गांधीजींनी एकदाही समाजवादी राज्याचा पुरस्कार केला नाही. त्यांनी 'रामराज्या'चीच गोष्ट केली. अर्जुनसिंगजी, छातीवर हात ठेवून सांगा, हा कोणता 'राम' होता? तोच ना अयोध्येचा राम! की आणखी कोणता आयाराम-गयाराम?

हे म्हणे गांधीभक्त?

गांधीजींना साधेपणा अपेक्षित होता. चैन, भपका यांचा त्यांना तिटकारा होता. गांधीजींचे वारसदार म्हणविणाऱ्यांनी या साधेपणाची एकशंभरांश तरी बूज राखली काय? गांधीजी थोर नेते होते. यांना पुत्रही होते. देवदास गांधी विद्वान होते. गांधीजींनी, आपला वारसदार म्हणून देवदास गांधींची निवड केली नाही. इंदिरा गांधींनी मात्र, प्रथम अननुभवी अशा आपल्या संजय नावाच्या पुत्राला आणि त्याचे अपघाती निधन झाल्यानंतर विमानाचा साधा चालक असलेल्या आपल्या राजीव गांधी नावाच्या ज्येष्ठ पुत्राला आपला वारसदार नेमले. १९८४ साली स्वत: अर्जुनसिंग, पी. व्ही. नरसिंहराव, प्रणव मुखर्जी, सरदार झैलसिंग असे राजकारणाचा सघन अनुभव असलेले अनेक नेते काँग्रेस पक्षाजवळ होते. इंदिराजींनंतर त्यांच्यापैकी कुणी का प्रधानमंत्री बनला नाही? त्यांची योग्यता राजीव गांधींपेक्षा कमी होती काय? आणि राजीव गांधी यांच्यानंतर त्यांच्या पत्नीला तुम्ही पक्षाचाच केवळ अध्यक्ष नव्हे, तर संसदीय दलाचाही प्रमुख बनविले, हे त्यांच्या कोणत्या योग्यतेच्या आधारावर? अर्जुनसिंगजी, तुम्ही लोकशाहीच्या केवळ गप्पा मारणारे आहात, तुम्हाला राजेशाही आणि घराणेशाहीच पसंत आहे, असे कोणी म्हटले तर तुम्हाला राग येईल. पण हे खोटे आहे काय? गांधीजी राजेशाहीच्या आणि घराणेशाहीच्या विरुद्ध होते. अन्यथा त्यांनी आपल्या मुलालाच काँग्रेसचा अध्यक्ष बनविले असते की नाही? गांधीजींचे तुम्ही फक्त एका बाबतीत अनुकरण करीत आहात आणि ती बाब म्हणजे मुसलमानांचा अनुनय. यासाठी गांधीजींजवळ निदान एक भव्य लक्ष्य तरी होते आणि ते म्हणजे इंग्रजांची सत्ता हटविणे. इंग्रजांची सत्ता हटली. पण हिंदू-मुसलमानांचे ऐक्य झाल्यामुळे नव्हे, तर हिंदुबहुल भारत आणि मुस्लिमबहुल पाकिस्तान अशी फाळणी करून. इंग्रजांनी फाळणी केली, असे समर्थन तुम्हाला करता येणार नाही. कारण, तुम्ही ती फाळणी मान्य केली. पर्यायाने तुम्ही द्विराष्ट्रवाद मान्य केला. संप्रदायाच्या आधारावर राष्ट्र बनते हे तुम्ही स्वीकारले. तुमच्या इतके सांप्रदायिक द्विराष्ट्रवाले या भारतात फक्त मुस्लिम लीगवालेच आहेत. वर म्हटले की, मुसलमानांच्या अवास्तव अनुनयासाठी गांधीजींच्या पुढे एक मोठे लक्ष्य तरी होते, तुमच्यापुढे तेही नाही. तुमचा अनुनय केवळ सत्तेसाठी आहे. जे एकेका संप्रदायाचा विचार करून राज्य करतात, ते सांप्रदायिक की, जे आपण सारे एक आहोत, आपले पंथसंप्रदाय (रिलिजन्स) भलेही भिन्न भिन्न असोत, पण आपली संस्कृती एक आहे, आणि म्हणून हे एक राष्ट्र आहे, असे मानतात, तसे बोलतात आणि अशा व्यवहाराचा आग्रह धरतात, ते सांप्रदायिक?

संघाचे वास्तव

अर्जुनसिंगांच्या निवेदनातील दुसरा बिंदू असा की, गांधीजी आणि गोळवलकर यांच्या आदर्शांमध्ये मूलभूत फरक आहे. तो फरक कोणता, हे त्यांनी सांगितले पाहिजे. गोळवलकरांनी नित्य 'राष्ट्रा'चीच गोष्ट केली. 'राज्याची' नाही. शहाण्या माणसांना तरी 'राष्ट्र' आणि 'राज्य' यातला फरक कळला पाहिजे. गोळवलकरांनी 'पंथीय राज्य' (theocratic state) चा पुरस्कार केला, याचा पुरावा देणारे एक तरी वाक्य अर्जुनसिंगांनी दाखवून द्यावे. रा. स्व. संघ, हिंदू राष्ट्राचे ध्येय घेऊन उभा आहे, हे जगजाहीर आहे. त्याने ते लपविलेले नाही. त्याचबरोबर त्याने हिंदूची व्याख्या आणि परिभाषाही केली आहे. त्याला 'हिंदू' या शब्दात कोणत्याही संकुचिततेचा, सांप्रदायिकतेचा गंध येत नाही, जसा स्वामी विवेकानंदांना आला नाही. ज्यांना तो येतो, त्यांनी खुशाल त्या शब्दाचा परित्याग करावा. स्वत:ला मुस्लिम म्हणवून घ्यावे अथवा ख्रिस्ती, अथवा अज्ञेयवादी अथवा सेक्युलर. आमची त्याला हरकत नाही. पण अख्ख्या दुनियेत 'सेक्युलर' शब्दाला जो अर्थ नाही, तो काँग्रेसवाल्यांनी त्याला अर्पण केला आहे. येथे वेगळ्या संप्रदायासाठी वेगळा कायदा असणे हा सेक्युलॅरिझम आहे. येथे ख्रिस्ती व मुस्लिम संप्रदायाच्या लोकांनी काढलेल्या शाळांसाठी वेगळे नियम, आणि हिंदूंनी काढलेल्या शाळांसाठी वेगळे नियम, अशी व्यवस्था असणे हा सेक्युलॅरिझम आहे. आम्हाला हा सेक्युलॅरिझम मान्य नाही. कारण, हा लेक्युलॅरिझम नव्हे, ही सांप्रदायिकता आहे. विषाच्या बाटलीवर अमृताचे लेबल लावल्याने विषाचे गुणधर्म बदलत नाहीत.

अर्जुनसिंगांनी संघाच्या प्रतिज्ञेसंबंधी प्रश्न उपस्थित केला आहे. १९४९ साली पं. नेहरूंच्या सरकारनेही असाच प्रश्न केला होता. त्या सरकारच्या एका आयसीएस सचिवाने तर संघात जी आजन्म प्रतिज्ञा असते, तिलाच आक्षेप घेतला होता. ते विद्वान म्हणाले होते की, गुप्त संस्थांमध्येच फक्त आजन्म प्रतिज्ञेची व्यवस्था असते. त्यांच्या या आक्षेपाला मा. स. गोळवलकरांनी जे उत्तर दिले, ते लक्षात घेण्यासारखे आहे. गोळवलकरांनी त्यांना लिहून कळविले की, ''आजन्म प्रतिज्ञा हे गुप्त संस्थेचे लक्षण असेल, तर संपूर्ण हिंदू समाजच एक गुप्त संस्था आहे, असे मानावे लागेल. सरकार चूप बसले आणि संघाच्या लिखित संविधानाला त्याने आक्षेप घेणे बंद केले.

वैचारिक सुसंगतीसाठी

अर्जुनसिंगांनी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला एक 'वंशीय अंत:स्वर'(overtone) असून, तो भारताची संस्कृती, भारताचे तत्त्वज्ञान आणि भारताची मूल्यव्यवस्था यांच्याशी पूर्णत: परकीय आहे, असे म्हटले आहे. आमची अशी समजूत आहे की, अर्जुनसिंग शिकले-सवरलेले गृहस्थ असावेत. त्यांना 'वंश' (race) म्हणजे काय, हे समजत असले पाहिजे. त्यांनी एवढे अज्ञान प्रकट करावे, हे आश्चर्य आहे. हिंदू हा एक वंश नाही. सर्व हिंदूंचे डोळे, नाकाची ठेवण, कातडीचा रंग, कवटीचे माप समान नाही. अनेक वंशांचे बनलेले हिंदू हे एकात्म रसायन आहे. तो एक संप्रदाय नाही; सर्व संप्रदायांना जेथे सन्मानाने राहता येते असा तो एक 'धर्म' आहे. अशी ती एक संस्कृती आहे. त्या आधाराने येथे एक विशिष्ट मूल्यव्यवस्था स्थिरावली आहे. ती मूल्यव्यवस्था, स्त्रियांना मातेसमान मानते. त्यांना लढाईतील लूट समजत नाही. ती मूल्यव्यवस्था सर्व पंथांचे अस्तित्व मानते. इतरांच्या मूर्ती व प्रार्थनास्थळे फोडणे धर्म्य मानीत नाही. बाबरी ढाचा पाडल्याचा संताप अर्जुनसिंगांना पहिल्या दिवसापासून आहे. खरे म्हणजे, ते खरे हिंदू असतील, तर बाबराने मंदिर पाडल्याबद्दल त्यांना संताप यायला हवा. त्यांच्या पूर्वजांना नक्कीच हिंदू मंदिर पाडून मशीद बनविल्याबद्दल दु:ख झाले असेल. परंतु, आपल्या बापजाद्यांच्या भावनांचा आदर करण्याची सक्ती कुणावरच करता येणार नाही. अर्जुनसिंगांना बाबराने मंदिर पाडल्याचा आनंद आणि अत्याचाराचे ते चिन्ह नष्ट झाल्याबद्दल दु:ख मानण्याचा अधिकार आहे. पण त्याचबरोबर, सोमनाथचे कबरस्थान नष्ट करून तेथे मंदिर उभे केल्याबद्दलही त्यांनी दु:ख व्यक्त केले पाहिजे आणि डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्यापासून तो सरदार वल्लभभाई पटेल यांच्यापर्यंत सर्व मान्यवरांचा निषेध करून त्याबद्दल क्षमा मागण्याचा ठरावही काँग्रेस कार्यसमितीत पारित करून घेतला पाहिजे. कारण श्रेष्ठ माणसाचे वर्तन, त्याच्या विचारांशी सुसंगत असले पाहिजे आणि अर्जुनसिंग काँग्रेसचे श्रेष्ठ नेते आहेत.

स्वातंत्र्य आंदोलनातील संघाचा सहभाग आणि नाथुराम गोडसे, या चावून चोथा झालेल्या मुद्यांचाही अर्जुनसिंगांनी उल्लेख केला आहे. अर्जुनसिंगजी, आपल्या पिताश्रींनी स्वातंत्र्य आंदोलनात कोणता भाग घेतला होता, हे आपण सांगाल काय? संघ ज्यांनी स्थापन केला, ते डॉ. हेडगेवार काँग्रेसचे कार्यकर्ते होते. एका प्रांतिक काँग्रेस कमेटीचे सेक्रेटरी होते. सरसंघचालक असतानाही १९३० च्या जंगल सत्याग्रहात त्यांनी भाग घेऊन कारावासही भोगला होता. डॉ. हेडगेवारांची ही राजकीय पृष्ठभूमी बघता, मी म्हटले की, काँग्रेसनेच संघाची स्थापना केली, तर ते चुकेल काय? आणि ते जर चुकीचे असेल, तर ज्याने संघाचा परित्याग केला आणि संघाच्या मिळमिळीतपणाबद्दल त्याची सतत चेष्टा केली, त्या नाथुरामच्या कृत्याबद्दल संघ जबाबदार कसा? ३० जानेवारी १९४८ ला, संघाविरुद्ध काहूर उठविण्यात तुम्हा लोकांना यश आले. तुम्ही वीस हजार लोकांना संशयावरून तुरुंगात डांबले. त्यांच्या घरांच्या झडत्या घेतल्या. संघाला, त्या पापकृत्यात गुंतविण्यासाठी जिवाचा आटापिटा केला. खोटेनाटे आरोप लावले. नाथुरामच्या सर्वव्यापित्वाच्या कंड्याही पिकविल्या. पण तुम्हाला काडीचाही पुरावा मिळाला नाही. म्हणून तर संघावरील बंदी उठली आणि काँग्रेस वर्किंग कमिटीला, संघाच्या लोकांनी काँग्रेसमध्ये प्रवेश घ्यावा, असा ठराव पारित करता आला.

अर्जुनसिंग आणि मसूद अजहर

मी या लेखात अर्जुनसिंगांच्या वक्तव्याचा विचार केला आहे. कारण, मी, ते काँग्रेसचे प्रातिनिधिक वक्तव्य मानतो. काँग्रेसने संघाविरुद्ध जे प्रचार-आंदोलन सुरू करावयाचे ठरविले आहे, आणि जे केवळ निवडणुकीमुळे तूर्त सुरू झालेले नाही, त्याची वैचारिक इयत्ता आणि गुणवत्ता कोणत्या प्रकारची राहील, हे अर्जुनसिंगांच्या वक्तव्यावरून स्पष्ट झाले आहे, म्हणून त्याची दखल घेतली आहे. काँग्रेसजनांनी हे आंदोलन अवश्य सुरू करावे. त्यांना भारतीय जनतेची किती साथ मिळेल, हे आपण कसे सांगणार? परंतु ज्या आतंकवाद्यांच्या सुटकेसाठी, भारतीय विमानाचे अपहरण करण्यात आले होते, त्या मौलाना मसूद अजहर याचे साह्य मात्र काँग्रेसला नक्की मिळेल. कारण, त्यानेही पाकिस्तानातून संघाला धडा शिकविण्याचा मनसुबा व्यक्त केला आहे. मी मुद्दाम मसूद अजहर याचे नाव घेतले आहे. तशी अर्जुनसिंगांना, लीगी बनातवाला, समाजवादी आझमी, सोझ आदी देशभक्तांचीही साथ मिळेलच. पण हत्तीच्या पावलात ज्याप्रमाणे इतर सर्व प्राण्यांची पावले समाविष्ट होऊ शकतात, त्याप्रमाणे मौलाना मसूद अजहर यांच्या ध्येयात इतरांचीही ध्येये समाविष्ट होतात. मसूद अजहरचाही रोष बाबरी ढाचा पाडल्याबद्दलच आहे आणि अर्जुनसिंगही त्याबद्दलच गेल्या ७-८ वर्षांपासून रुष्ट आहेत. मौलाना मसूद अजहर आणि अर्जुनसिंग यांची दोस्ती कशी दिसेल? मला तरी ती खूप छान दिसेल. या दोस्तीचे भव्यदिव्य आविष्कार या महिनाअखेर विधानसभांच्या निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर दिसू लागतील. तेवढी वाट पाहण्याची कळ आपण सोसलीच पाहिजे.

पण काँग्रेसच्या आंदोलनाचा एक चांगला फायदा होईल. या आंदोलनात भाग घेणारे अर्जुनसिंगासारखे बुद्धिमान नेते, संघाचे साहित्य वाचून काढतील. मा. स. गोळवलकरांचे 'वुई' ही शोधून काढतील. इतरही साहित्य वाचतील. संदर्भ सोडून वाक्ये उद्धृत करावयाची म्हटले तरी मूळ वाचावेच लागेल की नाही? संघसाहित्याचा खपही त्यामुळे वाढेल आणि शक्य आहे की, ते वाचून त्यांचे काही भ्रमही दूर होतील. म्हणून, आम्ही आरएसएसवाले, काँग्रेसला 'नवजीवन' देणाऱ्या या आंदोलनाचे स्वागत करू. त्यांची सर्व मुक्ताफळे सोशीकपणे ऐकून घेऊ. मौलाना मसूद आणि काँग्रेसचे नेते यांचे वैचारिक साम्य बघून स्वतःला धन्य समजू.

पूर्वप्रकाशित : दि. ११-२-२०००
(लाखे प्रकाशन, नागपूरने प्रकाशित केलेल्या मा. गो. वैद्य यांच्या 'ठेवणीतले संचित' या पुस्तकावरून साभार)

शब्दसरिता 75



आडवी विधाने :– 1) ढगाला दूत समजून त्याच्याद्वारे आपल्या प्रेयसीला निरोप धाडणारा महाकवी 4) मध्य प्रदेशमध्ये असलेले एक राष्ट्रीय उद्यान 7) हिंदी सिनेसृष्टीतील एक प्रसिद्ध दिवंगत अभिनेता यांचे मूळ नाव वसंत कुमार शिवशंकर पादुकोण होते 9) चंदीगढजवळील प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय मैदान 11) 'शोले'तील धर्मेन्द्र 13) भारताचा सर्वोच्च सैन्य पुरस्कार 15) अभिनेता राज कपूरचा एक मुलगा 17) मुस्लीम विद्यार्थ्यांना इस्लामिक व धार्मिक शिक्षण देणारी शाळा 19) इस्लामी कालगणनेनुसार येणारा 9 वा महिना 21) पृथ्वी 22) कुप्रसिद्ध असलेला जर्मनी देशाचा नाझी पक्षाचा हुकूमशहा 24) कस्तुरबा गांधी यांचे प्रचलित नाव 25) हिंदू धर्मातील एक वेद 27) सूर्य, भास्कर 30) हिंदीत हेतू, इच्छा 31) हुगळी नदीच्या काठावर वसलेले एक मोठे शहर 33) ताठा, गुर्मी 34) करंजी या पदार्थात भरावयाचा मसाला 35) आपला देश 36) रोजची नियमीत खुराक 37) साने गुरुजींनी लिहिलेली एक कादंबरी 40) पाप 42) मेहरबानी, दया 43) एक श्वास रोग 44) नवीन 46) लोकसभेची खासदार झालेली एक अभिनेत्री 48) पंतप्रधान नरेन्द्र मोदींच्या मंत्रिमंडळातील केंद्रीय संरक्षण मंत्री 51) नावेत बसून निसर्गात फिरण्याचा आनंद घेणे 52) महाराष्ट्र राज्यातील पहिला मेगा फूडपार्क या शहरात उभारण्यात आला आहे. 54) नवरदेव 55) हिंदीत अधिकार 56) लोकसभा 57) पश्चिम बंगाल राज्यातील ऐतिहासिक ब्रिटिशकालीन पूल हावडा ब्रिज या नदीवर बांधण्यात आलेला आहे. 58) अमर्याद 60) वर्तुळाची मर्यादा दाखविणारी वक्ररेषा 61) अमर अकबर अंथोनी या चित्रपटातील एक हास्य अभिनेता 62) संगननत, कारस्थान 64) बारा राशींपैकी एक 65) रक्षा, राखड 66) रिसर्च अँन्ड अँनालिसीस विंग संस्थेचे संक्षिप्त नाव 67) 2022 मध्ये झालेल्या फुटबॉल वर्ल्ड कप (फिफा) स्पर्धेचे यजमानपद या आखाती देशाकडे होते 69) दरवर्षी 14 नोव्हेंबर या नावे साजरा केला जातो 73) राजस्थानातील एक प्रख्यात लोकनृत्यप्रकार 74) मुस्लिमांनी केलेली मक्का–मदिन्याची यात्रा 75) द्रव पदार्थ मोजण्याचे एक माप 76) कटाळलेला 77) भारताच्या हिमाचल प्रदेशाची राजधानी 78) सह्याद्री पर्वतराजीतील मुंबई–नाशिक महामार्गावरील एक घाट

उभी विधाने :– 1) 21 एप्रिल 1932 ला नाशिकच्या या मंदिराचे दरवाजे सर्वांसाठी खुले करण्यात आले. 2) श्रीकृष्णाचे एक नाव 3) राज्यसभेच्या एका खासदाराचा कार्यकाल इतके वर्षांचा असतो 5) धर्मेन्द्र, जीतेन्द्र यांचा एक चित्रपट 6) सनी देओल, अमिषा पटेलचा एक चित्रपट 7) सूर्यमालेतील पाचवा ग्रह 8) आचार्य बाळ शास्त्री जांभेकर यांनी मराठी भाषेतील हे पहिले साप्ताहिक सुरु केले. 10) इंग्रजी कालगणनेत ज्यावर्षी फेब्रुवारीत 29 दिवस असतात ते वर्ष 11) भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार 12) 19 व्या शतकात इंग्रजांना प्रखर विरोध करुन मुंडा आदिवासींची संघटना तयार करणारा आदिवासी जननायक 14) हेर, खंदक 15) विमानाची धावपट्टी (इं.) 16) धैर्य, सोशिक 18) राजा बढेद्वारा रचित महाराष्ट्राचे राज्याभिमान गीत 'जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा...' या गीताचे मूळ गायक 20) जामदार खान्यावरील अधिकारी 23) रामायणात उर्मिलेचा पति 26) भारतात इतक्या वर्षांनंतर जनगणना करण्यात येते 28) लहान शहरातील स्थानिक स्वराज्य संस्था 29) तीन देशांच्या सीमा या राज्याला जोडल्या गेल्या आहेत. 32) एक ऋतु 37) जनसंघ या राजकीय पक्षाचे संस्थापक 38) या देशाने सर्वप्रथम कागदी चलनाचा वापर सुरु केला. 39) राज कपूरच्या एक चित्रपट 40) 1950 ते 1960 दशकातील प्रसिद्ध ॲथलीट धावपटू जो मूळ गावातील जमिनीच्या तंटाबाबरून तो डाकू झाला. 41) बारा राशींपैकी एक 43) कीव,45) अनेक मुस्लीम राष्ट्रात चालणारे एक चलन 46) आणिबाणी नंतर जनता दलात सामील झालेला एक राजकीय पक्ष 47) देणारा 49) समीपता 50) विनाकारण 51) भारतीय सैन्याचा एक विभाग 53) महाराष्ट्रातील या ठिकाणी महात्मा फुले कृषी विद्यापीठाची स्थापना करण्यात आली 59) निष्णात, पटाईत 60) महामार्गावर परिवहन करणाऱ्या चारचाकी वाहनांवर आकारण्यात येणारा सरकारी कर 63) रायगडावरील एक प्रसिद्ध कडा 68) ठाणे जिल्ह्यात असलेले अभयारण्य 69) इंडोनेशिया सारख्या मुस्लिम राष्ट्रात हिंदू संस्कृती टिकवून ठेवणारा प्रदेश 70) गुंतागुंत झालेल्या केसांची बट 71) नायट्रोजनचे मराठी रुप 72) इटली देशाची राजधानी (उत्तर पुढील अंकी)

मागील शब्दसरिताचे उत्तर

Uday Munde - Nagpur

इतिहास

पल्लव : दक्षिण भारतातील एक प्राचीन वंश

पल्लव वंश हा दक्षिण भारतातील एक प्राचीन वंश आहे. त्याच्या मूलस्थानाविषयी तसेच वंशाच्या उत्पत्तीसंबंधी विद्वानांत मतैक्य नाही. पल्लव कांचीजवळच्या तोंडमंडलमवर राज्य करीत होते. तोंडै याचा अर्थ अंकुर असल्याने त्या वंशाला पल्लव असे नाव असावे, ही उपपत्ती जास्त ग्राह्य वाटते.

पल्लव राजा सिंहवर्मा (तिसरे शतक) याचा सर्वांत प्राचीन लेख गुंतूर जिल्ह्याच्या पालनाड तालुक्यात सापडला आहे. त्यानंतर शिवस्कंदवर्म्याचे दोन ताम्रपट गुंतूर व बेल्लारी जिल्ह्यांत आढळले आहेत. हे सर्व लेख प्राकृतात आहेत. हे राजे सातवाहनांच्या अस्तानंतर तिसऱ्या शतकाच्या उत्तरार्धात पुढे आले असावेत.

पल्लवांचे गोत्र भारद्वाज होते. शिवस्कंदवर्म्याने अग्निष्टोम, वाजपेय आणि अश्वमेध हे श्रौत याग करून

धर्ममहाधिराज ही पदवी धारण केली होती. यानंतर पल्लव राजांचे संस्कृत भाषेतील अनेक ताम्रपट सापडले आहेत पण त्यांचा कालानुक्रम निश्चितपणे लावता येत नाही. ते सुमारे पाचव्या शतकाच्या अखेरपर्यंत राज्य करीत असावेत. त्यापैकी विष्णुगोप हा समकालीन असून कांची येथे राज्य करीत होता. समुद्रगुप्ताने त्याचा पराभव केल्यावर त्याचे राज्य त्यास परत केल्याचा प्रयाग प्रशस्तीत उल्लेख आहे. सहाव्या शतकाच्या शेवटच्या पादात सिंहविष्णु कांची येथे राज्य करीत होता. तेव्हापासून पल्लवांचा सुसंगत इतिहास उपलब्ध होतो. सिंहविष्णूने चोल प्रदेशावर आक्रमण करून कृष्णा ते कावेरीपर्यंतचा मुलूख काबीज केला. त्याचा पुत्र याने मामल्लपुरम् (महाबलीपुर) येथे मोठमोठ्या एकसंध पाषाणांतून देवळे (रथ) खोदून काढविली आणि मत्तविलास- प्रहसन नावाचे कापालिकांच्या जीवनावर प्रहसन लिहिले. तो स्वतः संगीतात निष्णात होता. बादामीच्या दुसऱ्या पुलकेशीने त्याचा पराभव करून त्याच्या राज्याचा उत्तरेचा भाग जिंकून घेतला. या काळापासून पल्लवांचे बादामीच्या चालुक्यांशी जे हाडवैर उत्पन्न झाले, ते पुढे कित्येक पिढ्या टिकले व नंतरच्या राष्ट्रकूटांशीही चालू राहिले. महेंद्रवर्म्याचा पुत्र पहिला नरसिंहवर्मा (सु. ६३०-□६६८) याने चालुक्यांची दुसरी स्वारी परतविली एवढेच नव्हे, तर स्वतः ६४२ मध्ये वातापी (बादामी) वर आक्रमण करून ती घेतली. तेथील युद्धात पुलकेशी मारला गेला. नंतर नरसिंहवर्म्याने वातापिकोंड (वातापी घेणारा) अशी पदवी धारण केली. यापुढे सु. बारा वर्षे चालुक्यांच्या राज्यात अराजक माजले. नरसिंहवर्म्याने श्रीलंकेचा राजा मालवर्मा याला आश्रय देऊन त्याच्या साहाय्यार्थ स्वारी केली. यानंतर दुसऱ्या पुलकेशीचा पुत्र पहिला विक्रमादित्य याने नरसिंहवर्मा आणि त्याचा पुत्र दुसरा महेंद्रवर्मा (६६८- ६७०) आणि नातू पहिला परमेश्वरवर्मा (६७०- ७००) यांचा अनेक युद्धांत पराजय केला पण परमेश्वरवर्म्याने पुन्हा बादामीवर स्वारी करून विक्रमादित्याचा पराभव केला. पल्लवांच्या व चालुक्यांच्या परस्परांच्या प्रदेशांवर अशा अनेक स्वाऱ्या झाल्या व त्यांत दोघांनाही विजयश्री चंचल असल्याचा प्रत्यय आला.

परमेश्वरवर्म्याचा पुत्र दुसरा नरसिंहवर्मा (७००-७२८) याचे नाव इतिहासात अनेक कारणांनी संस्मरणीय झाले आहे. त्याच्या काळात चालुक्य वास्तुकला पद्धती प्रचारात आली. त्याने कांची येथे कैलासनाथ अथवा राजसिंहश्वरनामक शिवालय बांधले. संस्कृत कवी दंडी याला आश्रय दिला आणि चीनला आपला राजदूत पाठविला.

दुसऱ्या परमेश्वरवर्म्याला पुत्र नसल्यामुळे त्याच्या मृत्यूनंतर प्रमुख लोकांनी दुसऱ्या शाखेतील दुसरा नंदिवर्मानामक कुमाराला पल्लव गादी दिली. तो पल्लवमल्ल या बिरुदाने प्रसिद्ध आहे. याच्याही काळी पांड्य व चालुक्य घराण्यांशी पल्लवांची युद्धे चालू राहिली. ७५० च्या सुमारास चालुक्यांचा उच्छेद करून राष्ट्रकूट दंतिदुर्गाने सत्ता बळकाविली आणि त्यांचा पल्लवांशी असलेला हाडवैराचा वारसा घेतला. दंतिदुर्गाने कांचीवर स्वारी करून पल्लवांचा पराभव केला. दंतिवर्मानामक नृपतीचा राष्ट्रकूट व पांड्य यांनी पराभव केला. त्याचा उत्तराधिकारी तिसरा नंदिवर्मा याने मलाया द्वीपकल्पावर आक्रमण करून तेथे आपल्या नावे विष्णूचे देवालय बांधले आणि तलाव खोदविला.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

अंगणवाडी सेविका, आशा वर्कर यांचे प्रश्न शासन दरबारी मांडणार- आ. मुटकुळे

उत्कृष्ट काम करणाऱ्या अंगणवाडी सेविका, आशा वर्कर यांचा गौरव

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १६ सप्टेंबर

महायुती शासनाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली व त्याची जबाबदारी अंगणवाडी सेविका मदतनीस अशा वर्कर व गटप्रवर्तकावर टाकली. या सर्व सेविका योजनेची घोषणा झाली त्या दिवशीपासून सर्वसामान्य बहिणींना योजनेचा लाभ घेता यावा म्हणून घरोघरी जाऊन माहिती सांगून त्यांचे अर्ज भरून घेत आहेत. यासाठी अंगणवाडी सेविका, आशा वर्कर यांचे मानधनासंबंधीचे तसेच इतर प्रश्नांचा शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचे आश्वासन भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी दिले.

या सर्व सेविकांच्या कार्याचा गौरव करण्याकरिता आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांनी दि १६ सप्टेंबर रोजी अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा वर्कर व गटप्रवर्तक यांना विशेष पुरस्कार देऊन केला. आ. मुटकुळे यांच्या यमुना निवासस्थानी भव्य असा कार्यक्रम घेऊन या सर्व बहिणींना गौरवण्यात आले. यावेळी सर्व अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा वर्कर व गटप्रवर्तक यांचे यथोचित स्वागत करून उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिलांचा सत्कार साडीचोळी व पुरस्कार देऊन केला. यावेळी हिंगोली व सेनगाव तालुक्यातील सर्व पुरस्कार विभागून देण्यात आले. हिंगोली विभागातून ११ भाग्यवान महिला रंजना आसाराम भिसे, अलका परसराम जाधव, महानंदा नथुजी काळे, सुनिता भागवत काळे, अनिता जनार्दन कल्याणकर, सुरेखा दत्ता भोयर, भगीरथी किशन चिलगर, दुर्गा नागोराव जगताप, सरस्वती विष्णू दवंड, रंजना प्रल्हाद चाटसे, रमाबाई कुंडलिक पंडित या आहेत तर ५१ हजार रुपये मानधन, पुरस्कार केसापूर येथील अनिता सुदाम इंगोले यांना प्रदान करण्यात आला. तसेच सेनगाव विभागातील ११ भाग्यवान महिला अनुसयाबाई शिकारे, आशा प्रकाश अंभोरे, रंजना नामदेव जाधव, रामकौर बबन टोंचर, पंचफुला निवृत्ती ठोके, मंगलाबाई काकडे, दशरथ धाबे, विद्या हांडे, सुनिता सरकटे, गणेश काचकुंडे, बबीता धाबे यांना ११ हजार रुपये देऊन गौरवण्यात आले तसेच उत्कृष्ट कार्याबद्दल विजयकांता कच्छवे यांना ५१ हजार तसेच पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

यावेळी महिला गटप्रवर्तक यांनी सुद्धा आपले विचार मांडले. जो भाऊ आमच्या पाठीमागे उभा आहे तोच भविष्यात पुढील आमदार राहील अशी घोषणा सुद्धा केली. यावेळी कार्यक्रमासाठी महिला जिल्हाध्यक्ष सौ उज्वलाताई तांबळे, जिल्हा अध्यक्ष फुलाजी मामा शिंदे, ज्येष्ठ नेते के के शिंदे, भाजपाचे भीष्माचार्य दुर्गादास साकळे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, सौ जिजाबाई मुटकुळे, सौ. राजामती मुटकुळे, मिलिंद यंबल, शिवाजीराव मुटकुळे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आरएसएसच्या बाल संगमात ३५० स्वयंसेवकांचा सहभाग

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १६ सप्टेंबर

येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्यावतीने बाल संगम २०२४ चे आयोजन १५ सप्टेंबर रोजी करण्यात आले होते. या बाल स्वयंसेवकामध्ये १२ ते १७ वयोगटातील ७ वी ते १२ वीचे बाल स्वयंसेवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने इयत्ता ७ वी ते १२ वीच्या बाल स्वयंसेवकांनी १५ सप्टेंबर रोजी सकाळी ११.१५ वाजता विविध भागातून मुख्य मार्गावरून पथसंचलनला सुरूवात करण्यात आली. यावेळी बाल स्वयंसेवकांच्या पथसंचलना वेळी अतिषबाजी व रांगोळी विविध मार्गावर काढण्यात आली. तसेच पथसंचलनावर नागरिकांनी अनेक ठिकाणी पुष्पवृष्टी केली.यावेळी बहुविध जिल्हा परिषद मैदानावर एकत्रित येत बाल स्वयंसेवकांना मार्गदर्शन करण्यात आले.

हिंगोली येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्यावतीने बाल सगम पथसंचलनाचे १५ सप्टेंबर रोजी आयोजन करण्यात आले होते. यावेळी बाल स्वयंसेवक हे जिल्हा परिषद प्रशालेच्या मैदानावर एकत्रित येवुन स्वातंत्र्य विर सावरकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, श्री अष्टविनायक चौक, भारतीय विद्या मंदिर समोरील भट्ट कॉलनी, जुन्या पोलीस अधिक्षक कार्यालय, आरामशिन रस्ता, अंबिका टॉकीज चौक, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, महात्मा गांधी चौक, महाराणा प्रताप चौक, जुने नगर परिषद कार्यालय, पिपल्स बँक यासह विविध मार्गानी बाल स्वयंसेवकांनी पथसंचलन केले. यावेळी या बाल स्वयंसेवकांना मार्गदर्शन करत पवित्र भगवा ध्वज उंचावून मानवंदना देण्यात आली. याप्रसंगी ३५० बाल सगम संचलनात सहभागी झाले होते.

आ. मुटकुळे यांचेकडून सेवासदनला ५१ हजारांची मदत

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १६ सप्टेंबर

विधानसभेचे आमदार तानाजी मुटकुळे यांनी सेवासदन मुलांचे वसतिगृह येथे सदिच्छा भेट दिली. सेवासदनची शिस्त , सेवासदनमध्ये मीरा कदम आणि धनराज कदम मुलांसाठी घेत असलेली मेहनत, त्यांच्यासाठी उपलब्ध असणाऱ्या विविध सुविधा, कदम दाम्पत्याची या कामातील तळमळ हे सर्व खरोखरच खूप कौतुकास्पद आहे. कुठलीही शासकीय किंवा राजकीय मदत नसताना हे सेवासदन चालवणे हे फार जिकरीचे काम आहे. गेल्या साडेपाच वर्षापासून सेवासदन अतिशय उत्कृष्टपणे काम करत आहे. सेवासदन मधील मुले विविध क्षेत्रात आपले नाव उंचावत आहेत, असे उद्गार आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी काढले.

यावेळी सेवासदनसाठी आ.मुटकुळे यांनी ५१ हजार रुपयाची आर्थिक मदत दिली. तसेच सेवासदनच्या दाम्पत्यांना त्यांच्या कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

सेवासदन मध्ये प्रवेश घेणाऱ्या मुलांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. यासाठी ही जागा अपुरी पडत आहे तसेच याचे भाडे सुद्धा द्यावे लागत आहे, अशी व्यथा मीरा कदम यांनी मांडल्यानंतर लवकरच आपण सेवासदनसाठी लागणाऱ्या जागेचा प्रश्न सोडवू असे आश्वासन आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांनी दिले. धनराज कदम व मीरा कदम यांनी तानाजी मुटकुळे यांच्या आभार व्यक्त केले. यावेळी सेवासदन परिवाराच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

हिंगोली- नवसाला पावणारा गणपती म्हणून ओळख असणारा श्री चिंतामणी विघ्नहर्ता गणपतीच्या दर्शनासाठी सोमवारपासूनच मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येत आहेत. मंदिर संस्थानाकडून भाविकांचे दर्शन सुलभ व्हावे यासाठी जय्यत तयारी करण्यात आली आहे. ठिकठिकाणी स्वयंसेवकांसह चोख पोलिस बंदोबस्त लावण्यात आला आहे. छाया- सुनील पाठक

पूर्णा कारखान्याच्या सर्वसाधारण सभेत अध्यक्षांची मनमानी

तभा वृत्तसेवा
वसमत, १६ सप्टेंबर

पुर्णा सहकारी साखर कारखान्याच्या ४६ वी वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन पुर्णा सहकारी साखर कारखाना वसमत येथे आयोजित करण्यात आली होती. यावेळी सभेमध्ये विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. परंतु सभासद आपले प्रश्न मांडत असताना कारखान्याचे अध्यक्ष जयप्रकाश दांडेगावकर यांनी सभासदांचे म्हणने ऐकून न घेता आपली मुजोरी करत मनमानी ठराव पारित केले. व संचालक, सभासद, शेतकरी आपले म्हणने मांडीत असताना त्यांना खाली बसण्यास सांगण्यात आले. बायोगॅस प्रकल्प उभारुन सभासदांचे पैसे घेवुन त्या सभासदांना कुठलाही नफा भेटणार नसल्याचे अनेक सभासद या सभेत सांगत होते. परंतु त्यांना बोलण्यास मज्जाव करुन आपल्या मर्जीने मनमानी ठराव केले. जवळाबाजार परिसरातील ऊस पुर्णा सहकारी कारखाण्याचे सभासद असताना सुध्दा पुर्णा कारखान्याम ध्ये आणत नसल्याने सभासदाचे नुकसान होत आहे. पुर्णा कारखान्याच्या सभासदांचे ऊस स्व मालकीच्या कारखान्यात नेण्यासाठी मुजोरी केल्या जात आहे, असे सभासदांनी या सभेच्या वेळी सांगण्याच्या प्रयत्न केला असता त्यांच्यावर मुजोरी करत त्यांना खाली बसण्यास सांगितले.

खुदद पुर्णा सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळाला झालेल्या वार्षिक सभेमध्ये जयप्रकाश दांडेगांवकर संचालकांना सुध्दा बोलु दिले नाही. यामुळे सभासद नाराज झाले असल्याचे दिसुन आले.कारखाना क्षेत्रात खुप मोठे प्रकल्प चालु आहेत. त्यामधुन येणारा नफा सभासदांना भेटत नसल्याने नवीन प्रकल्प आणुन सभासदांकडुन शुल्क आकारुन घेवु नये यासाठी सभासद बोलत असताना त्यांना मज्जाव करण्यात आला. यावेळी विद्यमान आ. राजु नवघरे आणि जयप्रकाश दांडेगावकर यांचे समर्थकांनी एकमेकांविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. सभेच्या शेवटी राष्ट्रगीतालाही अध्यक्ष जयप्रकाश दांडेगावकर थांबले नसल्याचे दिसून आले.

संक्षिप्त वृत्त

मिशन साहसीतर्फे स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबीर

हिंगोली- अखिल भारतीय विद्यार्थी परिषद हिंगोली, मिशन साहसी हिंगोली व डॉ. हेडगेवार दंत महाविद्यालय हिंगोली संयुक्त विद्यमाने एकदिवसीय विद्यार्थिनींसाठी स्वसंरक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते. मिशन साहसी उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थिनींना आत्मरक्षणाचे धडे देण्यात आले. ज्यातून त्यांना स्वतःचं रक्षण कशा पद्धतीने करता येईल यासाठी प्रशिक्षण देण्यात आले. हिंगोली अप्पर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की मिशन साहसी हा युवतींना सक्षम करण्यासाठी एक आगळा वेगळा उपक्रम अखिल भारतीय विद्यार्थी परिषद करते आहे. प्रविण पांडे यांनी मिशन साहसीच्या माध्यमातून हिंगोली जिल्ह्यातील प्रत्येक शाळा, महाविद्यालयात विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे धडे देण्यात येतील आणि हा उपक्रम यशस्वीपणे राबवण्यासाठी कटीबद्ध आहे. यावेळी अधिष्ठाता डॉ. विवेक चौकसे, अभाविप देवगिरी प्रदेश सहमंत्री प्रविण पांडे, जिल्हा सहसंयोजक सोनल चौधरी, शहर मंत्री विजय दराडे, शहर सहमंत्री आविष्कार गिरिकर, जिल्हा मेडीव्हिजन संयोजक दर्शन पाटील, शहर विद्यार्थिनी प्रमुख सेजल चव्हाण, यश जयनाईक, अक्षद पुरोहित, कराटे प्रशिक्षक बजरंग कदम, इसावे, अचल बेंगाळ व अन्य विद्यार्थी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कोनाथा येथे मतदार जनजागृती

वसमत- तालुक्यातील कोनाथा येथे निवडणुक विभागाच्यावतीने मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी ईव्हीएम मशीन आणि व्हीव्हीपॅट मशीनची माहीती देत मतदान कसे करायचे याबाबत ग्रामस्थांना प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी मंडळ अधिकारी श्रीमती राखेवार, तलाठी तनपुरे, सरपंच राजरत्न कुंटे, श्रीनिवास बेंडे, बापूराव बेंडे, विठ्ठल बेंडे, शामराव पौळ, मारोती बेंडे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

भाजपच्या मोफत आरोग्य शिबीर, मार्गदर्शन शिबीरास उत्स्फूर्त प्रतिसाद

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १६ सप्टेंबर

प्रभाग क्र.२ येथे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना व इतर योजना त्याचबरोबर महिलांचा मार्गदर्शन मेळावा व आरोग्य शिबिर आयोजित केले होते. या मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्य ामार्गदर्शनाखाली माझी लाडकी बहिण योजना व इतर योजनांच्या लाभापासून ज्या महिला वंचित राहिल्या अशा महिलांना योग्य मार्गदर्शन करून सोबतच आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलतांना आ. मुटकुळे म्हणाले की, महायुती सरकार महिलांच्या हिताचे निर्णय धेत असून महिलांना सक्षम करण्यासाठी कटीबध्द आहे. या कार्यक्रमाचे मुख्य आयोजक हमीदभाई प्यारेवाले हे होते. या ठिकाणी उपस्थित समस्त महिला भगिनींनी भरभरून प्रतिसाद दिला. या ठिकाणी हिंगोली शहरातील नामांकित डॉक्टर्स उपस्थित होते. यावेळी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, बळीराम मुटकुळे, शहराध्यक्ष कैलास काबरा, महिला शहराध्यक्ष सौ अलका लोखंडे, कल्पना चव्हाण, सौ रमा कळमनुरीकर, नंदकिशोर खिल्लारे, सचिन शिंदे आदींची उपस्थिती होती.

संत भगवान बाबांचे भव्य मंदिर उभारणार- आ. मुटकुळे

तभा वृत्तसेवा
हिंगोली १६ सप्टेंबर

येथील राष्ट्रीय संत भगवान बाबा उद्यान एन टी सी हिंगोली येथे आ. तान्हाजीराव मुटकुळे साहेब यांच्या स्थानिक निधी तसेच जिल्हा नियोजन मधून एक कोटी स्थानिक निधीतुन ८० लक्ष विकास कामे व श्री संत भगवान बाबा यांच्या मंदिराची भूमिपूजन व उद्यानाचा उदघाटन सोहळा पार पडला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी आ. गजाननराव घुगे होते तर उद्घाटक म्हणून आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांची उपस्थिती होती. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बि डी बांगर, जिल्हाध्यक्ष फुलाजी शिंदे, लोकसभा प्रमुख रामदास पाटील, आयोजक माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर , श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठानचे अध्यक्ष मेजर पंढरीनाथ घुगे, एकनाथराव कूटे प्रकाश बांगर, विश्वासराव बांगर, विश्वनाथ घुगे, ॲड के के शिंदे, नारायणराव खेडकर, प्रा दुर्गादास साखळे, गोवर्धन वीरकुवर आदींची उपस्थिती होती. प्रास्ताविक करताना बाबाराव बांगर य म्हणाले की उद्यानाच्या निधीतून विकासाबरोबर राष्ट्रसंत भगवान बाबा यांचे भव्य मंदिर लोकवर्गणीतून उभारणार आहे.

यावेळी आ. मुटकुळे यांनी विकास कामासाठी लागणारा निधी कमी पडू दिला जाणार नाही तसेच लोक वर्गणीतून होणाऱ्या भव्य मंदिरासाठी शुभारंभ करिता वर्गणी देत कार्यक्रमाचे उद्घाटन केले.

माजी आमदार गजाननराव घुगे यांनी अध्यक्ष समारोप केला. मंदिर तांत्रिकदृष्ट्या योग्य होण्यासाठी सहकार्य करण्याचे अभिवचन दिले. मुख्याधिकारी रामदास पाटील यांनी सामाजिक काम करत असताना अडचणी सोडवण्याचे व तांत्रिक गोष्टीत सल्ला देण्याचे मान्य करत या सोबतच इतर प्रत्येक समाजाच्या भावना ज्या ठिकाणी जोडलेले आहेत त्या ठिकाणी उत्तम काम होईल हा विश्वास व्यक्त केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मेजर पंढरीनाथ घुगे यांनी तर आभार प्रदर्शन संजय बांगर यांनी केले. यावेळी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

गणेशमूर्ती विसर्जनासाठी पालिकेकडून अमृतकुंड

तभा वृत्तसेवा
हिंगोली, १६ सप्टेंबर

शहरातील गणेश मंडळाच्या सोयीसाठी हिंगोली नगर पालिकेच्यावतीने सहा ठिकाणी अमृत कलशकुंड उभारण्यात आले आहेत. बाजूलाच निर्माल्य संकलन देखील केले जाणार आहे.

शहरात आज गणेश विसर्जनाची तयारी सुरू असून शहरातील गणेश मंडळांकडून गणेश मूर्तींचे विसर्जन केले जाणार आहे. याशिवाय घरोधरी गणेश मूर्तींची स्थापना करण्यात आली आहे. गणेशमूर्तींच्या विसर्जनासाठी नगरपालिकेच्यावतीने अमृत कलशकुंडांची व्यवस्था करण्यात आली आहे. आदर्श महाविद्यालय, छत्रपती शिवाजी नगर येथील दत्त मंदिर, नवीन पालिका कार्यालय, अग्रीशमन कार्यालय, एनटीसी परिसर, तिरूपती नगर येथे अमृत कलशकुंड उभारण्यात आले आहेत. नागरिकांनी घरगुती गणेश मुर्तींचे विसर्जन या कुंडांमध्ये करावे असे आवाहन मुख्याधिकारी अरविंद मुंडे यांनी केले आहे.

दरम्यान, इतर गणेश मंडळांच्या गणेश विसर्जनासठी सिरेहकशाहबाबा तलाव,कयाधू नदी, जलेश्वर तलाव याठिकाणी गणेश विसर्जन करण्यात येते. पालिकेने विसर्जन मिरवणुक मार्गावरील अडथळे दूर केले असून याठिकाणी निर्माल्य संकलन केले जाणार आहे.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

जनावरे चोरणाऱ्या टोळीला अटक

तभा वृत्तसेवा
नांदेड, दि. १६ सप्टेंबर -

जनावरे चोरणाऱ्या टोळीला सोनखेड पोलिसांनी अटक केली असून, त्यांच्याकडून जनावरे विक्री केल्याची ४ लाख २० हजार रुपये रोख रक्कम व वाहने जप्त करण्यात आली आहेत. हि कारवाई १५ सप्टेंबर रोजी करण्यात आली.

मागील काही दिवसापासून सोनखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीत तसेच परिसरातून जनावरे चोरी होण्याच्या घटनांमध्ये वाढत झाली होती. यामुळे यावर विशेष लक्ष देवून सोनखेड पोलिसांनी विशेष तपासाला सुरुवात केली. यात सोनखेड पोलिसांना मिळालेल्या माहितीवरुन पोलिसांनी रघुनाथ किशन मगरे, निखिल बालाजी कोल्हे, निलेश आनंदा हणवते, अरविंद भिमराव हाटकर, आकाश वसंत गजभारे व महंमद अल्ताफ महंमद आयुब कुरेशी यांना

ताब्यात घेवून चौकशी केली असता त्यांनी सोनखेड पासून ५० किलोमीटरच्या परिसरात आजपर्यंत ४० जनावरे चोरी केल्याची कबुली दिली. तसेच सोनखेड हद्दीमधील सात जनावरे चोरी केल्याचे सांगितले. या आरोपीकडून चोरी करण्यासाठी वापरण्यात येणारे वाहने व जनावरे विक्री केल्याची रोख रक्कम ४ लाख २० हजार रुपये जप्त करण्यात आले आहेत. या आरोपीकडून सोनखेड पोलीस स्टेशन अंतर्गत आठ गुन्हे व मुदखेड पोलीस स्टेशन अंतर्गत तीन गुन्हे असे एकूण ११ गुन्हे उघड झाले आहेत. पोलिसांनी या आरोपीकडे सखोल चौकशी केली असता मागील एक ते दिड महिन्यापासून हे आरोपी दोन पिकअप व मोटारसायकलच्या माध्यमातून जनावरे चोरी करीत होते. हि जनावरे चोरी करण्यासाठी महंमद अल्ताफ कुरेशी हा त्यांना चोरी करणे, टेहळणी करणे व मोटारसायकलवर फिरण्यासाठी पैश्यांचा पुरवठा करुन चोरी केलेली जनावरे खरेदी करत होता, अशी माहिती पोलिसांनी दिली.

हि कारवाई सहायक पोलीस निरीक्षक पांडूरंग माने, महिला पोलीस उपनिरीक्षक वैशाली कांबळे, सहायक पोलीस उपनिरीक्षक गणपत गिते, पोहेकॉ. विश्वनाथ हंबर्डे, वामन नागरगोजे, अंगद कदम, शाम बनसोडे, रमेश वाघमारे, त्रिशूल शंकरे, महेश शंकरे, दिगंबर कवळे, संतोषी मल्लेवार, केशव मुंडकर, उत्तम देवकत्ते यांनी केली

आ. राजेश पवार यांच्या पुढाकारातून

नागपूर येथील दीक्षा भूमी तिर्थयात्रा दर्शन सहलीसाठी भाविक रवाना

तभा वृत्तसेवा
नायगाव, दि. १६ सप्टेंबर -

नायगाव विधानसभेचे आमदार राजेश पवार यांच्या पुढाकारातून व डॉ कागडे यांच्या नेतृत्वाखाली नायगाव मतदार संघातील बौद्ध समाजातील बाराशे च्या वर नागरिकांना नायगाव येथून नागपूर येथे मोफत दीक्षा भूमी तिर्थयात्रा दर्शन सहलीसाठी दिडशे खाजगी क्रुझर गाडीने पाठविण्यात आले.

दि. १४ सप्टेंबर २०२४ रोजी शनिवारी नायगाव येथून नागपूर येथे मोफत दर्शन यात्रेसाठी खासगी क्रुझर गाडीने बाराशे च्या वर बौद्ध समाजातील महिला, पुरुषांना आमदार राजेश पवार यांच्या पुढाकारातून पाठविण्यात आले असून या गाडीला सोडण्यासाठी आमदार राजेश पवार, जि.प. सदसया पुनमताई पवार, डॉ. कागडे, माजी प्राचार्य मनोहरराव पवार, बालाजीराव मदेवाड, दत्ता पाटील ढगे, सोपान कदम आदींनी हिरवी झेंडी दाखवून रवाना केले.

या खासगी गाडीने बौद्ध समाजातील महिला, पुरुषांना बाराशे च्या वर सहलीसाठी गेलेल्या भाविकांसाठी आरोग्य सुविधा, सुरक्षा, चहा , नाष्टा, जेवण , पुरवले जाणार असल्याचे आमदार राजेश पवार यांनी सांगितले आहे. प्रत्येकांनी आयुष्यात येऊन एकवेळ तरी नागपूर येथील दिक्षा भुमी पहावे व दर्शन घ्यावे असे स्वप्न पाहणाऱ्या महीला , पुरुष, व्यक्तींना नायगाव विधानसभेचे आमदार राजेश पवार, पुनमताई पवार यांनी साकार केल्यामुळे बौद्ध समाजातील भाविकांनी आमदार राजेश पवार व पुनमताई पवार यांचे आभार मानले.

या कार्यक्रमाला पु.भन्ते शिलरत्न थेरो, पु.भन्ते रेवतबोध्दी, पु.भन्ते संघप्रिय, जि.प. सदस्या पुनमताई पवार, डॉ. कागडे, मनोहर पवार, बालाजीराव मदेवाड, गंगाधर गायकवाड, देविदास बोंमनाळे, पत्रकार कदम, अवकाश धुपेकर, माधव पाटील कुष्णूरकर, माया बळेगावकर, राहुल शिंदे, यासह भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते बौद्ध समाजातील बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बौद्ध समाजासाठी घरकुल देण्याची मागणी

यावेळी डॉ कागडे यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा नायगाव शहरात बसवावे, बौद्ध समाजातील बांधवांसाठी घरकुल तसेच प्रत्येक गावात बौद्ध समाजासाठी समशान भूमी, देण्यात यावी अशी मागणी केली.

संक्षिप्त वृत्त

किनाळा येथील असंख्य कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षात प्रवेश

नायगाव- नांदेड येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या कार्यालयात नायगाव, बिलोली,धर्माबाद,तालुक्यातील विविध पक्षातील कार्यकर्त्यांनी जिल्हाध्यक्ष भगवानराव आलेगावकर यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षात प्रेवश केला त्यात किनाळा येथील असंख्य कार्यकर्तेही पक्ष प्रवेश केले आहे. बिलोली तालुक्यातील किनाळा येथील अनेक कार्यकर्त्यांनी दिनांक १६ रोजी नांदेड येथे जिल्हाध्यक्ष भगवानराव आलेगावकर,प्रा डी बी जांभरुणकर ,सुभाष गायकवाड,गजानन पापटवार,डॉ वरपडे,प्रा मजरोदिन ,विश्वनाथ बडुरे,अंकुश पाटील रातोळीकर, बाळू गायकवाड,दिलीप कदम,पुंडलिक नवारे आदींचा प्रमुख उपस्थितीमध्ये सोसायटीचे सदस्य बालाजी वामनराव पाटील, शिवकुमार मोहिते,रविकुमार उपलवार, सय्यद कासिम मीरासाब, सय्यद मैनोदीन हुसेनसाब,गुणवंत पांचाळ, बालाजी शेळगावे, सय्यद शादुल महबूब, विकास पाटील भोसले, हनमंत उस्केटवाड, ओमकार भोसले, ओमकार रिजितवाड, देवानंद पाटील शेळगावे,माधव वडमिले, सय्यद खाजामिया महंमदसाब, गोपाळ वडमिले, ज्ञानेश्वर गायकवाड, विनायक उप्पलवार, बालाजी खराटे,देविदास गवळे, माधव धानोरे,आदींनी पक्ष प्रवेश केला आहे.या पक्ष प्रवेशाचे सर्व स्तरातून स्वागत करण्यात येत आहे.

हाणेगाव येथील एकता व्यापारी गणेश मंडळाच्या वतीने सलग अकरा दिवस अन्नदान

हाणेगाव -हाणेगाव येथील आडतलाईन येथे एकदा व्यापारी गणेश मंडळाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही सलग अकरा दिवस वेगवेगळ्या प्रकारचे महाप्रसाद बनवून अन्नदानाचा उपक्रम राबविण्यात आला.यावेळी गावातील व परिसरातील असंख्य लोकांनी याचा लाभ घेताना दिसतात तर या उपक्रमातून समता बंधुता एकतेचा संदेश दिसून येत आहे या ठिकाणी मोठी बाजारपेठ असल्यामुळे इतर गावाहून लोक ये-जा करत असतात या ठिकाणी मोठी बाजारपेठ असल्यामुळें खरेदी विक्री करण्यासाठी लोकांची या ठिकाणी मोठी वर्दळ असते बाजारपेठेच्या मुख्य ठिकाणी गणपती बसविण्यात आल्यामुळे लोकांना अन्नदानाचा लाभ मिळत आहे. याच्यातून असा बोध होतो की भुकेल्यांना अन्न व तहानलेल्या तहानलेल्यांना पाणी द्यावं या म्हणी प्रमाणे 'सर्वात श्रेष्ठ दान अन्नदान' समजून एकता व्यापारी गणेश मंडळाचे पदाधिकारी याच्यात भाग घेऊन सलग अकरा दिवस वेगवेगळ्या प्रकारचे अन्न बनवून महाप्रसादाच्या स्वरूपात लोकांना अन्नदान करत असतात त्यांच्या या कार्याला गावातील व परिसरातील असंख्य लोकांनी कौतुक केले आहेत हा अन्नदानाचा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी दानशूर व्यक्तिमत्व मुन्ना सावकार होडगे ,संदीप रेड्डी, बालाजी पोकलवार ,रमेश राणे ,वैजीनाथ बत्तीनवार, प्रदीप भाये, संतोष माळगे ,बालाजी एकम्बेकर ,संतोष बत्तीनवार, चांद पटेल ,प्रकाश रेड्डी, आताऊल्ला पठाण ,आनंद पंचगले, दीपक हिबाने, संतोष गंगथडे ,देवराव मामा,नयुम चौधरी,गनेश पंदरगे, बालाजी काडगे,अजय पडकंठवार, शंकू मामा जिरगे ,शिवाजी निंबाळे ,रेवनप्पा,ज्ञानेश्वर कुडले आदी जणांनी परिश्रम घेतले आहे.

अनंत चतुर्दशी निमित्त दत्ता पाटील कोकाटे यांच्यावतीने उद्या महाप्रसादाचे आयोजन

नांदेड-अनंत चतुर्दशी निमित्त शिवसेना सह संपर्कप्रमुख दत्ता पाटील कोकाटे यांच्या वतीने आज दिनांक १७ सप्टेंबर रोजी आसन टी पॉइंट सांगवी बु. येथे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे . सकाळी नऊ वाजता नाही खा. नागेश पाटील आष्टीकर, जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश कुमार ,आयुक्त महेश डोईफोडे यांच्या हस्ते या महाप्रसाद वाटपाच्या कार्यक्रमाचे उद्घाटन होणार आहे . भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक तथा सह संपर्कप्रमुख दत्ता पाटील कोकाटे यांनी केले आहे. अनंत चतुर्दशी निमित्त गेल्या वीस वर्षापासून सह संपर्कप्रमुख दत्ता पाटील कोकाटे यांच्या वतीने सांगवी बू. आसना टी पॉईंट येथे महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. अकरा क्विंटल तांदळाचा महाप्रसाद वाटपाचा कार्यक्रम सातत्याने दरवर्षी आयोजित केला जातो . हजारो भावीभक्त दरवर्षी महाप्रसादाचा लाभ घेत असतात.याही वर्षी हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. यावर्षी आयोजित करण्यात आलेला महाप्रसादाचा सोहळा उद्या दिनांक १७ सप्टेंबर रोजी सकाळी नऊ वाजता सुरू होणार आहे. या सोहळ्याचे उद्घाटन खा. नागेश पाटील आष्टीकर, जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, महापालिकेचे आयुक्त महेश डोईफोडे यांच्या हस्ते करण्यात येणार असून यावेळी शिवसेनेचे नेते धोंडू पाटील, भुजंग पाटील , जिल्हाप्रमुख बबन बारसे, जिल्हाप्रमुख बंडू खेडकर आदींची उपस्थिती राहणार आहे. आयोजित करण्यात आलेल्या महाप्रसाद वाटपाच्या सोहळ्यास शिवसेनेच्या सर्व आजी माजी पदाधिकाऱ्यांनी, शिवसैनिकांनी आणि भाविक भक्तांनी उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक तथा सह संपर्कप्रमुख दत्ता पाटील कोकाटे यांनी केले आहे.

मोटारसायकल चोरी करणाऱ्या टोळीस अटक

तभा वृत्तसेवा
नांदेड, दि. १६ सप्टेंबर -

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नांदेड जिल्ह्यात मोटारसायकल चोरी करणाऱ्या टोळीस अटक केली असून, त्यांच्याकडून ४ लाख ६० हजार रुपये किंमतीच्या ११ मोटारसायकली जप्त केल्या आहेत.

स्थानि गुन्हे शाखेला दि.१६ सप्टेंबर रोजी मिळालेल्या गुप्त माहितीवरुन स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अर्धापूर तालुक्यातील गणपूर येथील विकास ग्यानबा घाटगे यास ताब्यात घेवून विचारपूस केली असता विकास

घाटगे व त्यांच्या अन्य दोन साथीदारांनी नांदेड शहर, अर्धापूर, लिंबगाव, बारड परिसरातून मोटारसायकली चोरी केल्याची कबुली दिली. पोलिसांनी त्यांच्याकडून चार लाख ६० हजार रुपये किंमतीच्या ११ मोटारसायकली जप्त केल्या आहेत. या मोटारसायकल चोरी प्रकरणी लिंबगाव, विमानतळ, बारड, अर्धापूर, भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत. हि कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे, पोलीस अंमलदार माधव केंद्रे, रवी बामणे, बालाजी तेलंग, विठ्ठल शेळगे, बालाजी यादगीरवाड, सायबर सेलचे राजू शिटीकर, दिपक ओढणे यांनी पार पाडली.

स्मशानभुमी - दफनभुमिसाठी आ. राजेश पवारांनी दिला सव्वा कोटीचा निधी

तभा वृत्तसेवा
उमरी, दि. १६ सप्टेंबर -

उमरी शहरात स्माशभुमी - दफनभुमिसाठी जागा उपलब्ध होताच नायगाव मतदार संघाचे विकास कार्यसम्राट आमदार राजेश पवार यांनी स्मशानभुमि - दफनभूमि साठी तब्बल १ कोटी २१ लाख रुपयाचा निधी दिला आहे.

विकास रुकेगा नही छप्पर पाड के विकास निधीचा वर्षाव आमदार राजेश पवार यांनी उमरी शहरावर करून ऐतिहासीक नोंद केली आहे . परवाच उमरी शहराच्या पाणी पुरवठासाठी २६ कोटी ३४ लक्ष निधी दिला आहे . उमरी शहरातील रेल्वे पट्टरी च्या पलिकडील भाग व्यंकटेश नगर , इसलामपुरा , आनंदीनगर , आंबेडकर नगर , नागझरी परिसर या भागातील नागरिकांना एखादया व्यक्तीचा मृत्यू झाला तर अंत्यसंस्काराठी एक ते दीड किमी अंतरावर रेलवे पटरी क्रास करून उमरी ग्रामिन रुग्णालय जवळील स्मशानभुमित (वैकुंट) येथे जावे लागत होते उमरी गोरठा रोड वरिल रेल्वे गेट दिवसातून ये जा - करणारे रेल्वे एक्सप्रेस असो , पॅसेजर असो की मालगाडी किवां साहेबांचे लॉडीस ३२ वेळा रेल्वे गेट फाटक पडते अशा परिस्थित प्रेत अंतयांत्रा आली तर त्यांना ताटकळत थांबावे लागत होते असा त्रास नागरीकाना सहन करावे लागत होते . नगर परिषदेने व्यंकटेश नगर इस्लापूर इतर नगराच्या भागातील नागरीचा त्रास कमी करण्यासाठी स्मशानभुमि - दफन भूमिसाठी जागा उपलब्ध करून द्या अशी मागणी नगरसेवक प्र सोनू वाघमारे मुख्यधिकारी यांच्याकडे केली होती आणि उपोषणाचा इशारा दिला होता . यापूर्वी संदिप गोंवदे अशीच मागणी आमदार राजेश पवार कडे केली असा विडीओ व्हायरस होत आहे . त्या अनुषंगाने नगरपरिषद व आमदार राजेश पवार , शासकीय गुतेदार संजीव विठ्ठलराव सवई ,म . खाजा सेठ यांनी विचार विनमय झाल्याने .उमरी शहराती एक दानदूर व्यक्ती तथा प्रसिद्ध व्यापारी म .खाजा म . सज्जन सेठ यांनी स्वतःची २५ गुंठे जमिन रस्शानभुमि - दफनभुमिसाठी दान दिल्यावर त्या भागातील नागरीकांचा खरा प्रश्नाचा तिडा सुटला आहे मागणी अनेकाच्या असल्या तरी जागा देणे निधी उपलब्ध करून देणे हा महत्वाचा भाग ठरतो . म .खाजा सेठ जागा दान देताच आमदार राजेश पवार यांनी १ कोटी २१ लाखाचा भरिव निधी दिला आहे यावेळी उमरी शहरवाशी यांच्या वतिने आमदार राजेश पवार यांचे व म .खाजा सेठ यांचे स्वागत करण्यात आले यावेळी राष्ट्रवादी अजीत पवार गट डॉ .विक्रम देशमुख , शासकीय गुतेदार संजीव सवई , भाजपा चे बापुसाहेब पाटील कौडगावकर , रेल्वे बोर्ड सदस्य पारस सेठ दर्डा , नगरसेवक प्र सोनू वाघमारे आदी नागरीक उपस्थित होते . अखेर त्या स्मशानभूमी - दफनभुमि चा प्रश्न मिटल्याने नागरीकांनी समाधान व्यक्त केले आहे .

किनवट येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

तभा वृत्तसेवा
किनवट, दि. १६ सप्टेंबर -

देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस सेवा पखवाडा रक्तदान अभियान म्हणुन सर्वत्र राबविण्यात येत असून किनवट येथील साईबाबा मंदिरात आमदार भीमराव केराम यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजपा युवामोर्चाच्या वतीने भव्य रक्तदान शिबिर आयोजित केले होते.या शिबिरात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर प्रेम करणाऱ्या एकूण ८९ रक्तदात्यांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान केले.

देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आज वाढदिवस असून भारतीय जनता पक्षाच्या वतीने त्यांचा वाढदिवस सेवा पखवाडा रक्तदान अभियान म्हणून सर्वत्र राबविण्यात येत आहे. भाजपा युवा मोर्चा किनवट तालुक्याच्या वतीने १६ सप्टेंबर रोजी साईबाबा मंदिरात आमदार भीमराव केराम यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष स्वागत आयनेनीवार यांच्या नेतृत्वाखाली युवा मोर्चा तालुका अध्यक्ष आशुतोष बेद्रे यांनी भव्य रक्तदान शिबीर आयोजित केले होते. या शिबिरात ८९ रक्तदात्यांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान करून नरेंद्र मोदी यांना दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.या कार्यक्रमास जिल्हा नियोजन समितीचे नवनियुक्त सदस्य दिनकर चाडावार माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार शहराध्यक्ष संतोष चनमनवार, युवामोर्चाचे माजी तालुका अध्यक्ष उमाकांत कराळे, सतीश नेमानीवार,प्रदीप एडके, सतीश बिराजदार,माजी नगरसेवक शिवा आंधळे,बाबू जाटवे, बाबू तकलवार निकेतन सुरवसे, कृष्णा इटकेपेल्लीवार शहराध्यक्ष अक्षय पावडे शुभम काळे ऋषिकेश चौधरी बबलू नाईक सुमित नरवते सुरेश साकपेल्लीवार विक्रम जाधव राज नाईक यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी तसेच युवा मोर्चाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

डॉ. मनेश कोकरेंच्या कार्यकाळात एसजीजीएस महाविद्यालयाची प्रगती कडे वाटचाल

तभा वृत्तसेवा
नवीन नांदेड, दि. १६ सप्टेंबर -

डॉ. मनेश बबनराव कोकरे यांची श्री गुरुगोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था, विष्णुपुरी, नांदेड यांच्या संचालक पदी नियुक्ती झाल्यानंतर त्यांनी दिनांक २ मे २०२३ रोजी आपल्या पदाचा पदभार स्वीकारला. पदभार स्वीकारताच त्यांनी पहिल्या दिवसापासूनच महाविद्यालयातील विविध विभागातील विविध कार्याचा अभ्यास करून त्या अभ्यासानुसार संस्थेतील गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेले विद्यार्थी अधिकारी कर्मचारी यांच्या सोयीसुविधानांचे कार्याचे चक्र अतिशय क्रियाशील करून प्रलंबित असलेल्या विविध क्षेत्रातील प्रश्न सोडविण्याचा पाठपुरावा करून आगरी अन्यायग्रस्तांना न्याय मिळवून देण्याचे कार्य करत आहेत.

श्री गुरुगोविंद सिंगजी तंत्रशास्त्र महाविद्यालय विष्णुपुरी येथील विद्यार्थ्यांची शैक्षणिक विकासासाठी संस्थेतील रिक्त शिक्षक पदे भरण्याबाबत तंत्र शिक्षण संचालनालय व महाराष्ट्र शासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा करून शासनाकडून ४० पदे भरण्यासाठी ची मान्यता मिळवली. सदरील मान्यता पारदर्शकपणे प्रक्रिया राबवत अवघ्या काही महिन्यातच सर्व कायदेशीर बाबीची पूर्तता करून (बिंदू नामावली मान्यता, जाहिरात, मुलाखत समिती, परीक्षा पद्धती, निकाल, मुलाखती, व नियुक्तीपत्र) पारदर्शकपणे ३२ शिक्षक कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली. ज्यामध्ये बहुसंख्य कर्मचारी हे विविध एन.आय.टी. व आय.आय.टी. मधून पदवी , पद्युत्तर पदवी , (संशोधन) पीएच.डी., पदवी तसेच पोस्ट डॉक पदवी प्राप्त आहेत. अशा कर्मचाऱ्यांची निवड करून संस्थेला पुढील अनेक वर्षासाठी उत्कृष्ट शिक्षक वृंदाची उपलब्धता करून दिली. याचबरोबर संस्थेतील इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट (साधनसामुग्रीचा विकास) लक्षात घेऊन त्यांनी विभागीय इमारत बांधकामासाठी पाठपुरावा करून विभागीय इमारतीच्या भूमिपूजन करून अवघ्या काही महिन्यातच दिनांक १५ फेब्रुवारी२०२४ रोजी यशस्वीपणे संपन्न केला. सदर इमारतीचे काम आज प्रगतीपथावर आहे.

नवीन शैक्षणिक धोरण अमलात आणायचे ठरवले त्यानुसार सन २०२३-२४ मध्ये प्रथम वर्षासाठी व २०२४-२५ मध्ये प्रथम व द्वितीय वर्षासाठी या संस्थेने नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्याचे कार्य चालू आहे. नवीन शैक्षणिक धोरनात विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडी प्रमाणे ईतर शाखेतील विषय शिकता येत असल्यामुळे विद्यार्थ्यांना उच्च गुणवत्ता राखण्यासाठी मदत होईल. आठवडी व मासिक आढावा घेऊन विद्यार्थ्यांची ७५ टक्के उपस्थिती असणे बंधनकारक आहे .येथील विद्यार्थ्यांना उत्तम क्रीडा व व्यायाम प्रकारासाठी इंडोर गेमची सोय इंडोर गेम्स फॅसिलिटी उपलब्ध करून देण्यासाठी विविध प्रशासकीय मान्यता मिळण्याच्या मार्गावर आहे. याचबरोबर अनेक दिवसापासून शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा जिव्हाळ्याचा व प्रलंबित असलेला १२ व २४ वर्षानंतर ची आश्वासित प्रगती योजना लागू करण्याचा विषय प्रलंबित होता. याबाबत वेळोवेळी तंत्र शिक्षण संचालनालय व महाराष्ट्र शासन याकडे पाठपुरावा केला. महाराष्ट्र शासनाने १८ डिसेंबर २०२४ रोजी १२ व २४ वर्षानंतर ची आश्वासित प्रगती योजनेबाबत शासन निर्णय निर्गमित केला व त्याच दिवशी संस्था स्थरावरील समिती गठीत करून या शासन निर्णयाची अंमलबजावणी होण्यासाठी पावले उचलली. तसेच संस्थेतील कर्मचाऱ्यांना याचा फायदा मिळवून देण्यासाठी त्यांनी तंत्र शिक्षण विभागीय कार्यालयाकडे सुद्धा वेळोवेळी पाठपुरावा करून मंजुरी मिळवलेली आहे.

संस्थेतील माजी विद्यार्थी संघटना काही कारणास्तव सक्रिय नसल्याने त्यांचे बँकेतील खाते पण बंद पडले होते ते पण चालू मार्गी लावण्यात आले. डॉक्टर मनीष कोकरे यांच्या प्रयत्नातून सद्भावना शिष्यवृत्ती पण आता वाटप करण्यात येणार आहे. परिस्थितीने गांजलेल्या होतकरू विद्यार्थ्यांना संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांकडून मदत मिळवून व गरीब विद्यार्थ्यांना दत्तक घेऊन त्यांचा शिक्षणाचा व राहण्या खाण्याचा खर्च माजी विद्यार्थ्यां उचलणार असल्याचेही सांगितले. तसेच निसर्गाचा समतोल राखण्यासाठी चौकी महाकाय त्या गावी प्राध्यापक व कर्मचाऱ्यांच्या मार्फत दहा कमी रस्त्याच्या दुतर्फा ७० हजार बिया पावसाळ्यात अगोदर रोपन करण्यात आल्या. नांदेड जिल्यातील १२ वी पास विद्यार्थी व पालकापर्यंत नवीन शैक्षिणक धोरण विद्यार्थ्यांना व पालकांना अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेची माहिती उपलब्ध करून दिली. सन २०२४-२५ प्रथम वर्ष अभियांत्रिकी प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी या संस्थेस पसंती देवून प्रथम वर्ष अभियांत्रिकीच्या १०० टक्के जागा भरल्या गेल्या आहेत. संस्थेकडून सामाजिक उपक्रम म्हणून विष्णुपुरी येथील जि. परिषद शाळा दत्तक घेतली. महाराष्ट्र शासनाच्या विविध समित्या मध्ये डॉ. मनेश कोकरे यांचा समावेश केला गेला व त्यांनी तेथे चांगले काम केलेले आहे.संस्थेमध्ये महिला व युवतीसाठी (संस्थेतील विद्यार्थिनी) आरोग्य तपासणी शिबिराचे संस्थेच्या वतीने आयोजन करण्यात आलेले होते. या शिबिरामध्ये संस्थेतील विद्यार्थिनी व संस्थेत काम करणारे कुशल व अकुशल महिला कामगार यांची मोठ्या प्रमाणामध्ये आरोग्य तपासणी करण्यात आलेली असून या मधून त्यांना तज्ञ डॉक्टरकडून विविध आजरा विषयी काय काळजी घ्यायची व त्यांच्यामध्ये कोणकोणते दोष आहेत हे दाखवून दिले. याचा फायदा संस्थेमधील महिला कर्मचारी व विद्यार्थिनीना झाला आहे.संस्थेतील विद्यार्थ्यांना सर्व क्रीडा सुविधा संस्थेमार्फत पुरविण्यात येतात.

यामध्ये संस्थेने चमकदार कामगिरी करून अनेक क्रीडा प्रकारांमध्ये गोल्ड मेडल, सिल्वर मेडल व ब्रांझ मेडल पटकावलेले आहेत. विविध वाहने व रोबोट कॉम्पिटिशनमध्ये मोठ्या प्रमाणात देश पातळीवर पारितोषक पटकावले आहे

डॉ. मनेश बबनराव कोकरे यांनी संचालक श्री गुरुगोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था, विष्णुपुरी, नांदेड पदाचा पदभार स्वीकारल्या पासून वेगाने कामास सुरवात करून गेल्या एक ते दिड वर्षाच्या काळात विविध क्षेत्रात संस्थेच्या प्रगतीस चालना देलेली आहे.

त्यांच्या प्रेरणेतून अलीकडील काळात अनेक प्राध्यापकांची विविध समित्यावर निवड झालेली आहे. विविध प्राध्यापकांना त्यांनी सादर केलेल्या शोध निबंधास पुरस्कार मिलेले आहेत. गेल्या एक वर्षात ३ प्राध्यापकाने पी. एच. डी. पदवी मिळविली आहे. चार ते पाच प्राध्यापकांना पटेंट मंजूर झालेले आहेत. संस्थेत विविध कार्यशाळेचे, अल्प कालावधी प्रशिक्षण वर्गाचे, आयोजन करण्यात आलेले आहेत.